श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित

## के. जी. कॉलेज ऑफ आर्टस् अ‍ॅण्ड कॉमर्स, अहिल्यानगर

# पालवी

**नववा अंक** वार्षिक अंक २०२६-२७




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त, ISO मानांकनप्राप्त, NAAC मान्यताप्राप्त

college website : kgcollege.in Email ID : kg.college2007@gmail.com
पंडित नेहरू हिंदी विद्यालय कॅम्पस, अहिल्यानगर फोन नं. ०२४१-२३२६९६०

# ✽ के.जी.महाविद्यालय परिवार ✽

## संस्थेचे अध्यक्ष
## मा.श्री.हस्तीमलजी मुनोत
## यांच्या वाढदिवसांनिमित्त
## प्रकाशित


श्री.हस्तीमलजी मुनोत
अध्यक्ष


श्री.किशोरजी मुनोत
विश्वस्त संचालक


डॉ.स्वाती मुनोत
परिसर संचालक


डॉ.वर्षा कीर्तने
कला शाखा प्रमुख


डॉ.प्रशांत खोपटीकर
वाणिज्य शाखा प्रमुख


प्रा.स्नेहल बोरावके
बी.बी.ए.(सी.ए.) प्रमुख


श्री.संतोष मुनोत
कार्यालयीन अधिक्षक


प्रा.सीमा मुनोत
सहाय्यक प्राध्यापक
वाणिज्य विभाग


प्रा.हर्षाली रासकर
ग्रंथपाल


डॉ.प्रा.राहुल थोरात
सहाय्यक प्राध्यापक


श्री.मनोज म्हंकाळे
सेवक


सौ.सविता केदारे
सेवक

# पालवी

## के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय

श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित

## के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय
## अहिल्यानगर

An ISO 9001:2015 College

**Green Compliance / NAAC accridiated**

# पालवी

* नववा वार्षिक अंक *

सन २०२६-२७

* संपादक *

श्री.किशोरजी मुनोत

(विश्वस्त)

प्रा.डॉ.स्वाती मुनोत

(परिसर संचालक)

* कार्यकारी संपादक *

प्रा.डॉ.वर्षा कीर्तने

*संपादक मंडळ*

प्रा.सीमा मुनोत
प्रा.स्नेहल बोरावके

श्री.संतोष मुनोत
प्रा.प्रशांत खोपटीकर


# पालवी

## के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय

## वार्षिक नियतकालिक २०२६-२७

### दि प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स नियम,

### ८ प्रमाणे आवश्यक माहिती



पुणे विद्यापीठ गीत

ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

पुण्यमयी दे आम्हा अक्षर वरदान
ज्ञान बनो कर्मशील, कर्म ज्ञानवान

जातिभेद, धर्मभेद, वंशभेद दूर
लाख लाख कंठांतुनि हाच एक सूर
करुणेच्या चरणांशी नत हो विज्ञान

माणुसकी धर्माचा अर्थ जाणतों
श्रमनिष्ठा हे पवित्र तीर्थ मानतों
हृदयांतुनि समतेचा निर्भय अभिमान

सेवेतच मुक्ती ही मंगल दीक्षा
ध्यासातून जागृति ही सत्वपरीक्षा
हे विश्वचि घर अमुचे मंत्र हा महान

मंगेश पाडगांवकर




प्रकाशन स्थळ : श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित **के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय, अहिल्यानगर**

प्रकाशन काळ : वार्षिक

प्रकाशक व संपादक : प्रा.डॉ.स्वाती मुनोत (परिसर संचालक)
श्री.किशोरजी मुनोत (विश्वस्त संचालक)
के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय, अहिल्यानगर

कार्यकारी संपादक : प्रा.डॉ.वर्षा कीर्तने

राष्ट्रीयत्व : भारतीय

मालकी : श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित **के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय, अहमदनगर**

मुद्रक : जय शंकर डि.टी.पी.वर्क अॅण्ड स्टेशनरीज्
हातमपुरा, जुने कलेक्टर ऑफीस रोड,
अहमदनगर मो.९२७०३५१००४

मुख पृष्ठ : प्रा.डॉ.स्वाती मुनोत

प्रकाशन दिनांक : १८/०७/२०२६



सदर अंकात व्यक्त करण्यात आलेल्या साहित्यातील मतांशी संपादक मंडळ व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.
आम्ही डॉ.स्वाती मुनोत व श्री.किशोर मुनोत असे जाहिर करतो की, वर दिलेली माहिती आमच्या समजुतीप्रमाणे बरोबर आहे.

श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित

# के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय

फोर्ट रोड, एल.आय.सी.ऑफीसजवळ, अहिल्यानगर

## -: विश्वस्त / संचालक समिती :-

| | |
|---|---|
| श्री.हस्तीमल चांदमल मुनोत | अध्यक्ष |
| श्री.लालचंद चंदनमल मुनोत | सेक्रेटरी |
| श्री.मोहन नेमिचंद मुनोत | सदस्य |
| श्री.प्रकाश धनराज मुनोत | सदस्य |
| श्री.शरद प्रेमराज मुनोत | सदस्य |
| श्री.किशोर हस्तीमल मुनोत | सदस्य |

## -: स्थानिक व्यवस्थापन समिती :-

| | |
|---|---|
| श्री.हस्तीमल मुनोत | अध्यक्ष |
| श्री.किशोर मुनोत | सेक्रेटरी |
| श्री.महेंद्र मुनोत | सदस्य |
| प्राचार्य खासेराव शितोळे | सदस्य |
| प्रा.डॉ.वर्षा कीर्तने | सदस्य शिक्षक प्रतिनिधी |
| श्री.संतोष मुनोत | सदस्य शिक्षक प्रतिनिधी |
| डॉ.स्वाती मुनोत | सदस्य सचिव |

श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित
के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय
फोर्ट रोड, एल.आय.सी.ऑफीसजवळ, अहिल्यानगर

# IQAC Composition

| Member Name | Designation |
|---|---|
| Mr. Kishor Munot | Management Director |
| Dr.Swati Munot | Conveyor |
| Mr. Gautom Munot | Industrialist |
| Mr.Rajiv Gujar | Industrialist |
| Mr. Puranik S.B. | C.E.O. A.M.C.Bank |
| Mr.Ajay Mutha | CA |
| Mr. Pallod | Advocate |
| Mr. Sunil Munot | Industrialist |
| Prin K.H.Shitole | L.M.C.Member |
| Dr.P.A.Khoptikar | Teacher Representative |
| Dr. V.S.Kirtane | Teacher Representative |
| Mrs. Komal Gandhi Shingi | Alumni |
| Mr.Vaibhav Pupaal | Alumni |
| Mr. Krishan Pandhare | Student Representative |
| Prof. Snehal Borawade | IQAC Coordinator |

श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित
के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय
फोर्ट रोड, एल.आय.सी.ऑफीसजवळ, अहिल्यानगर

# Vision and Mission

**Vision**

**"Improving Lives, Through Learning "**

- Education to the minority section of the society belonging to the society, educationally and economically weaker sections.
- To educate is to empower.
- K G College will foster a positive learning and working environment and provide support services for student's success.

**Mission**

- K.G. College promotes excellence in Life Long Learning, focused on student's success and community development.

**Goal**

- Aim to serve the students in a Noble way

**OBJECTIVES**

K.G. College imparts education amongst the students at all level of our society with a specific attention towards the downtrodden and adds knowledge to develop the goal of nation at large. Our objective is to provide access to the eligible, meritorious and needy students of economically underprivileged background students to higher education.

1. To impart knowledge, expertise, guidance and positive motivation to the students.
2. To help the 'Slow Learners' and encourage the advanced learners.
3. To impart value education to develop moral uprightness.
4. To develop self confidence among the students to face the challenges of life.
5. To bring forth competent and employable graduates for suitable job placements.
6. To provide opportunities for academic excellence and encourage innovations.
7. To make the students ambitious in life and mold them into responsible global citizens.

**के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय**

# श्रध्दांजली......

या शैक्षणिक वर्षात जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ,
कलावंत, साहित्यिक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत,
धुरंधर राजकारणी, संस्थेवर मनःपूर्वक प्रेम करणारे,
स्नेही, हितचिंतक, महाविद्यालयातील
शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, त्यांचे आप्तेष्ट,
विद्यार्थी दिवंगत झाले, अशा
लाखो निष्पाप जीवांना संस्थेच्या वतीने
भावपूर्ण श्रध्दांजली.......





### विश्वस्त मनोगत

**स्त्री सक्षमीकरण : प्रगत समाजाचा पाया**
**श्री किशोर मुनोत**

समाजाच्या विकासाचा इतिहास पाहिला तर स्त्रियांच्या योगदानाशिवाय कोणत्याही संस्कृतीची किंवा राष्ट्राची प्रगती शक्य झालेली नाही. स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधारस्तंभ नसून समाज परिवर्तनाची प्रभावी शक्ती आहे. ती संस्कारांची जननी, कुटुंबाला एकत्र बांधून ठेवणारी, मूल्यांची जपणूक करणारी आणि समाजाला योग्य दिशा देणारी प्रेरणाशक्ती आहे. म्हणूनच स्त्री सक्षमीकरण ही केवळ सामाजिक गरज नसून प्रगत, समृद्ध आणि सुसंस्कृत राष्ट्रनिर्मितीचा भक्कम पाया आहे.

माझ्या आयुष्यात स्त्रीचा सन्मान, तिचे कर्तृत्व आणि तिचे महत्त्व मला सर्वप्रथम माझी आई स्वर्गीय इचरजबाई हस्तीमल मुनोत, म्हणजेच आमच्या सर्वांच्या लाडक्या "जीजी", यांच्याकडून शिकायला मिळाले. त्यांचे औपचारिक शिक्षण जरी केवळ चौथीपर्यंत झाले होते, तरी जीवनातील खरे शिक्षण, संस्कार आणि मूल्यांची शिदोरी त्यांनी आम्हाला दिली. माझ्यावर आणि माझ्या बहिणीवर त्यांनी उत्तम संस्कार केले. मूल्यांची जपणूक कशी करावी, नातेसंबंधांचा सन्मान कसा राखावा, प्रत्येक व्यक्तीशी प्रेमाने आणि आदराने कसे वागावे, तसेच कुटुंबातील ऐक्य आणि जिव्हाळा कसा टिकवावा, हे त्यांनी आपल्या कृतीतून शिकवले. माझे वडील अर्थकारण आणि व्यवसायाच्या जबाबदाऱ्यांमध्ये नेहमी व्यग्र असत. त्यामुळे घरातील सर्व बाबींवर लक्ष ठेवणे, आमच्या शिक्षणाची काळजी घेणे, शिस्त, संस्कार आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास घडविणे ही संपूर्ण जबाबदारी माझ्या आईने अत्यंत समर्पितपणे पार पाडली. त्यांनी आमचे संपूर्ण कुटुंब अत्यंत प्रेमाने, संयमाने आणि दूरदृष्टीने सांभाळले. घरातील प्रत्येक व्यक्तीला समान सन्मान देणे, नातेसंबंध जपणे, कुटुंबात एकोपा निर्माण करणे आणि प्रत्येकाला निर्णय प्रक्रियेत सहभागी करून घेणे, ही त्यांची जीवनशैली होती. त्यांनी आम्हाला समानता, परस्पर आदर, जबाबदारी आणि संवेदनशीलतेचे संस्कार दिले. आजही आमच्या कुटुंबातील महिलांविषयीचा आदर, त्यांना दिले जाणारे स्थान आणि निर्णय प्रक्रियेमधील त्यांचा सहभाग हे सर्व त्यांच्या विचारांचे आणि संस्कारांचेच प्रतिबिंब आहे. त्यामुळे आमच्या केजी कला व वाणिज्य महाविद्यालयातर्फे अहिल्यानगर मधील आर्थिक, वैद्यकीय, सामाजिक तसेच व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांना स्वर्गीय इचरजबई हस्तीमलजी मुनोत यांच्या नावे 2025 पासून पुरस्कार देणे सुरू केले आहे.

माझी पत्नी सौ. सुजाता किशोर मुनोत यांनीही या संस्कारांचा वारसा अत्यंत समर्थपणे

पुढे नेला आहे. त्यांनी कुटुंबाची जबाबदारी प्रेमाने, समर्पणाने आणि सक्षमपणे सांभाळली आहे. कुटुंबातील प्रत्येक सदस्याला एकत्र ठेवणे, नातेसंबंध अधिक दृढ करणे, मूल्यांची जोपासना करणे आणि प्रत्येकाच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रेरणा देणे, ही त्यांची मोठी ताकद आहे. कुटुंबाच्या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी माझी खंबीर साथ दिली असून, त्यांच्या सहकार्यामुळे घरात शिक्षण, संस्कार, समानता आणि परस्पर सन्मानाचे वातावरण अधिक बळकट झाले आहे. स्त्री ही केवळ घर सांभाळणारी नसून कुटुंबाला दिशा देणारी आणि पुढील पिढी घडविणारी शक्ती असते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे माझी पत्नी सुजाता आहे.

आमचे कुटुंब पारंपरिक व्यावसायिक क्षेत्राशी संबंधित असले तरी काळानुरूप बदल स्वीकारत महिलांच्या शिक्षणाला आणि प्रगतीला नेहमीच प्रोत्साहन दिले आहे. याच वातावरणात माझ्या कन्या अभिलाषा आणि पूजा यांचे संगोपन झाले. त्यांनी शिक्षण, सामाजिक जबाबदारी आणि व्यावसायिक क्षेत्रामध्ये स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या यशामुळे आम्हाला अभिमान वाटतो. त्यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे की योग्य संधी, विश्वास आणि प्रोत्साहन मिळाल्यास महिला कोणत्याही क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करू शकतात. त्यांच्या यशामध्ये कुटुंबातील संस्कार, महिलांविषयीचा आदर आणि समानतेची मूल्ये यांचा महत्त्वाचा वाटा आहे.
भारतीय संस्कृतीत स्त्रीला शक्ती, ज्ञान आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. माता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर आणि रमाबाई रानडे यांसारख्या महान महिलांनी समाजाला नवी दिशा दिली. आजही विज्ञान, शिक्षण, उद्योग, प्रशासन, न्यायव्यवस्था, क्रीडा, संरक्षण आणि सामाजिक क्षेत्रात महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. हे यश स्त्रीच्या सामर्थ्याची आणि तिच्या अमर्याद क्षमतेची साक्ष देणारे आहे.

स्त्री सक्षमीकरणाचा खरा अर्थ केवळ आर्थिक स्वावलंबन नसून आत्मविश्वास, निर्णयक्षमता, नेतृत्वगुण, सामाजिक सहभाग, शिक्षण आणि स्वतःच्या अधिकारांविषयीची जागरूकता यांचा समतोल विकास हा आहे. प्रत्येक मुलीला गुणवत्तापूर्ण शिक्षण, सुरक्षित वातावरण आणि समान संधी मिळाल्या पाहिजेत. कुटुंब, समाज आणि शैक्षणिक संस्था यांनी यासाठी सकारात्मक भूमिका बजावणे आवश्यक आहे.

के. जी. कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सच्या "पालवी" या वार्षिक अंकासाठी "स्त्री सक्षमीकरण" हा विषय निवडण्यात आला आहे, ही अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. शिक्षण संस्था या केवळ ज्ञान देणाऱ्या नसून समाजपरिवर्तनाची केंद्रे असतात. विद्यार्थ्यांमध्ये समानता, संवेदनशीलता आणि स्त्री सन्मानाची जाणीव निर्माण करण्यासाठी अशा विषयांवर चिंतन होणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमधून समाजात सकारात्मक विचारांचा प्रसार होईल आणि महिला सक्षमीकरणाची चळवळ अधिक बळकट होईल, असा मला विश्वास आहे.

आजची स्त्री प्रत्येक क्षेत्रात नवे यश संपादन करत आहे. तिच्या क्षमतेवर विश्वास ठेवून तिला योग्य संधी, शिक्षण आणि प्रोत्साहन दिल्यास ती केवळ स्वतःचेच नव्हे तर संपूर्ण कुटुंब, समाज आणि राष्ट्राचे भविष्य घडवू शकते. स्त्री सशक्त असेल तर कुटुंब सशक्त होईल, कुटुंब सशक्त असेल तर समाज सक्षम बनेल आणि समाज सक्षम असेल तर राष्ट्र निश्चितच प्रगत, समृद्ध आणि संस्कारित बनेल.

**सशक्त महिला, सक्षम भारत!**

- **नारीशक्तीचा सन्मान, प्रगतीशील भारताची शान!**

### कॅम्पस डायरेक्टर मनोगत

**प्रा.डॉ.स्वाती मुनोत**

ज्ञान, विचार आणि संस्कार यांचा संगम घडविणारे माध्यम म्हणजे साहित्य. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणारे, त्यांच्या विचारांना दिशा देणारे आणि समाजातील समकालीन प्रश्नांवर चिंतन करण्याची संधी उपलब्ध करून देणारे व्यासपीठ म्हणजे आपल्या महाविद्यालयाचा "पालवी" हा वार्षिक अंक होय. आपल्या संस्थेचे प्रेरणास्थान, अध्यक्ष आदरणीय श्री हस्तीमलजी मुनोत यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षी हा अंक प्रकाशित करण्याची सुंदर परंपरा आपल्या महाविद्यालयाने जपली आहे. ही परंपरा केवळ एक प्रकाशन नसून विचारांची, संस्कारांची आणि सामाजिक बांधिलकीची परंपरा आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून के. जी. कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स समाजाला दिशा देणारे आणि विद्यार्थ्यांच्या विचारविश्वाला समृद्ध करणारे विविध विषय "पालवी"च्या माध्यमातून मांडत आले आहे. पर्यावरण संवर्धन, महात्मा गांधी यांचे विचार, आरोग्य व व्यक्तिमत्त्व विकास, युवकांसाठी व्यवसाय व नोकरीच्या संधी, कोविड-१९ च्या काळातील आव्हाने आणि संधी, विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी, "अहमदनगर @५३२" या ऐतिहासिक टप्प्याचे स्मरण करून देणारा विशेषांक, आजी-माजी विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाविषयी अनुभव, लोकशाही आणि निवडणुका तसेच "Challenges and Opportunities for the Students" अशा विविध विषयांवर प्रकाशित झालेले अंक विद्यार्थ्यांना सामाजिक जाणीव, वैचारिक समृद्धी आणि सकारात्मक दृष्टिकोन देणारे ठरले आहेत.

या वर्षी "महिला सक्षमीकरण" हा विषय निवडण्यात आला आहे. आजच्या बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक परिस्थितीमध्ये हा विषय अत्यंत महत्त्वाचा आणि काळाची गरज असलेला आहे. महिला सक्षमीकरण ही केवळ महिलांच्या विकासाची संकल्पना नाही, तर ती समाजाच्या सर्वांगीण प्रगतीची मूलभूत अट आहे. ज्या समाजामध्ये महिलांना समान संधी, सन्मान आणि स्वातंत्र्य मिळते, तो समाज अधिक सक्षम, समृद्ध आणि प्रगत बनतो.

मानवी संस्कृतीच्या इतिहासात स्त्रीने प्रत्येक टप्प्यावर महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. जगातील अनेक प्राचीन संस्कृतींमध्ये स्त्रीला ज्ञान, शक्ती आणि सृजनाचे प्रतीक मानले गेले. परंतु कालांतराने सामाजिक बंधने, रूढी आणि असमानतेमुळे महिलांचे स्थान दुय्यम होत गेले. त्यानंतर अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात युरोप व अमेरिकेमध्ये महिलांच्या शिक्षणासाठी, मतदानाच्या अधिकारासाठी, समान संधींसाठी आणि सामाजिक न्यायासाठी विविध चळवळी सुरू झाल्या. या चळवळींनी आधुनिक महिला सक्षमीकरणाचा पाया घातला.

संयुक्त राष्ट्र संघाने १९७५ हे वर्ष "आंतरराष्ट्रीय महिला वर्ष" म्हणून घोषित केले आणि त्यानंतर महिलांच्या विकासासाठी अनेक जागतिक उपक्रम सुरू झाले. आज शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये (Sustainable Development Goals) महिलांची समानता आणि सक्षमीकरणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान देण्यात आले आहे. यावरून हे स्पष्ट होते की कोणत्याही राष्ट्राच्या विकासामध्ये महिलांचा सक्रिय सहभाग अनिवार्य आहे.

भारतात महिला सक्षमीकरणाची वाटचाल समाजसुधारकांच्या कार्यातून सुरू झाली. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणाचा पाया घातला. समाजाचा तीव्र विरोध सहन करूनही त्यांनी शिक्षणाची ज्योत विझू दिली नाही. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्याय आणि शिक्षणामध्ये समानतेसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महिला शिक्षणासाठी संपूर्ण आयुष्य वाहिले. पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, आनंदीबाई जोशी आणि अहिल्याबाई होळकर यांसारख्या महान व्यक्तींनी आपल्या कार्यातून भारतीय समाजाला नवी दिशा दिली.

भारतीय राज्यघटनेने स्त्री-पुरुष समानतेचा अधिकार प्रत्येक नागरिकाला दिला आहे. शिक्षण, रोजगार, मतदान, मालमत्ता, न्याय आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार महिलांना संविधानाने बहाल केला आहे. शासनाच्या विविध योजना, स्वयं-सहाय्यता गट, महिला उद्योजकता, डिजिटल साक्षरता आणि कौशल्य विकास कार्यक्रमांमुळे महिलांच्या प्रगतीला मोठी चालना मिळत आहे.

आज विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन, उद्योग, प्रशासन, न्यायव्यवस्था, संरक्षण, क्रीडा, वैद्यकीय क्षेत्र, साहित्य आणि उद्योजकता अशा प्रत्येक क्षेत्रामध्ये महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आहे. कल्पना चावला, डॉ. टेसी थॉमस, किरण बेदी, पी. व्ही. सिंधू, मेरी कोम, फाल्गुनी नायर, निर्मला सीतारामन अशा अनेक महिलांनी आपल्या कार्यातून जगभरात भारतीय स्त्रीचे सामर्थ्य सिद्ध केले आहे.

आजच्या काळात महिला सक्षमीकरणाचा अर्थ केवळ आर्थिक स्वावलंबन नाही. स्वतःचे निर्णय घेण्याची क्षमता, आत्मविश्वास, नेतृत्व, शिक्षण, सुरक्षितता, सामाजिक सहभाग आणि स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करण्याची संधी मिळणे, हा खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरणाचा पाया आहे. प्रत्येक मुलीला तिच्या गुणवत्तेनुसार संधी मिळाली पाहिजे आणि तिच्या स्वप्नांना बळ देणे ही समाजाची जबाबदारी आहे.

शिक्षण हे महिला सक्षमीकरणाचे सर्वात प्रभावी साधन आहे. एक शिक्षित स्त्री केवळ स्वतःचे जीवन घडवत नाही, तर संपूर्ण कुटुंब, समाज आणि पुढील पिढी घडवते. शिक्षणामुळे विचार करण्याची क्षमता वाढते, आत्मविश्वास निर्माण होतो आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची ताकद मिळते. म्हणूनच प्रत्येक मुलीपर्यंत गुणवत्तापूर्ण शिक्षण पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे.

आज कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञान आणि माहितीच्या युगामध्ये जग झपाट्याने बदलत आहे. या बदलामध्ये महिलांचा सहभाग जितका वाढेल तितका समाज अधिक सक्षम होईल. महिलांनी तंत्रज्ञानाचा स्वीकार करून नवीन कौशल्ये आत्मसात करणे आणि ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेमध्ये सक्रिय भूमिका बजावणे ही काळाची गरज आहे.

महाविद्यालयीन शिक्षण हे केवळ पदवी मिळविण्यापुरते मर्यादित नसते. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, संवेदनशीलता, चिकित्सक विचारसरणी आणि जबाबदार नागरिकत्व विकसित करणे हे शिक्षणाचे खरे उद्दिष्ट आहे. त्यासाठी "पालवी"सारखा वार्षिक अंक अत्यंत प्रभावी माध्यम ठरतो.

आजच्या डिजिटल युगामध्ये माहिती सहज उपलब्ध होत असली तरी वाचन आणि लेखनाची सवय कमी होत चालली आहे. विद्यार्थी मोबाईल आणि सोशल मीडियावर अधिक वेळ घालवत असताना स्वतःचे विचार मांडण्याची क्षमता कमी होत असल्याची खंत अनेक शिक्षणतज्ज्ञ व्यक्त करतात. अशा वेळी "पालवी"सारखे व्यासपीठ विद्यार्थ्यांना स्वतः विचार करण्यास, संशोधन करण्यास आणि लेखन करण्यास प्रेरणा देते.

लेखन ही केवळ भाषेची अभिव्यक्ती नसून ती व्यक्तिमत्त्व विकासाची प्रक्रिया आहे. जे विद्यार्थी नियमित वाचन आणि लेखन करतात, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, विश्लेषणात्मक विचार, सर्जनशीलता आणि प्रभावी संवादकौशल्य अधिक विकसित होते. म्हणूनच प्रत्येक विद्यार्थ्याने अशा उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभागी व्हावे, ही अपेक्षा आहे.

या अंकामध्ये विद्यार्थी आणि शिक्षक आपले अनुभव, निरीक्षणे, संशोधन, कविता, कथा, लेख आणि सामाजिक प्रश्नांवरील विचार व्यक्त करतात. त्यामुळे हा अंक केवळ साहित्यसंग्रह राहत नाही, तर त्या काळातील सामाजिक विचारांचे दस्तऐवजीकरणही बनतो. भविष्यात जेव्हा या अंकांकडे मागे वळून पाहिले जाईल, तेव्हा त्या त्या काळातील समाजाचे विचार, आव्हाने आणि अपेक्षा यांचे प्रतिबिंब त्यामध्ये दिसून येईल.

महिला सक्षमीकरण या विषयावर विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेले विचार निश्चितच समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडविण्यास प्रेरणा देतील. समानता, परस्पर सन्मान आणि सामाजिक जबाबदारी या मूल्यांची जपणूक करण्यासाठी हा अंक निश्चितच उपयुक्त ठरेल.

या अंकासाठी लेखन करणारे सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, संपादक मंडळ आणि प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार. आपल्या संस्थेचे अध्यक्ष आदरणीय श्री हस्तीमलजी मुनोत यांच्या प्रेरणेतून सुरू झालेली ही वैचारिक परंपरा भविष्यातही अधिक समृद्ध होत राहो आणि "पालवी"चा प्रत्येक अंक विद्यार्थ्यांच्या विचारविश्वात नव्या आशा, नवे विचार आणि नवी ऊर्जा निर्माण करो, हीच सदिच्छा.

# के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय

## संपादकीय

पालवी'
अंक नववा

कार्यकारी संपादक
-प्रा.डॉ.वर्षा कीर्तने-
मराठी विभाग प्रमुख

श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्टची स्थापना अध्यक्ष मा.श्री. हस्तीमलजी मुनोत यांनी केली. ही संस्था नेहमीच विविध धार्मिक, सामाजिक कार्यात अग्रेसर असते. संस्थेचे शैक्षणिक कार्यही उल्लेखनीय आहे. आपण ज्या समाजात राहतो, वावरतो त्या समाजाला आपण काहीतरी दिले पाहिजे ही तळमळ सतत असतेः समाजामध्ये आपल्या आजूबाजूला असे असंख्य मुले-मुली आहेत की, जे आर्थिक अडचणींमुळे किंवा अन्य कारणांमुळे नोकरी, व्यवसाय करतात त्यामुळे त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण थांबले. परंतु अशा मुला-मुलींना आपले शिक्षण पूर्ण करण्याची इच्छा असते. दिवसा नोकरी आणि रात्री शिक्षण घेऊ शिकणाऱ्या मुला-मुलींसाठी संस्थेने २००७ मध्ये के.जी.. महाविद्यालयाची स्थापना केली. अहमदनगर जिल्ह्यातील पहिले के. जी. कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय आहे. तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पहिलेच रात्र महाविद्यालय आहे. 'पालवी' अंकांचे प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष आद.श्री हस्तीमलजी मुनोत यांच्या वाढदिवसानिमित्त केले जाते. त्यांचे सहकार क्षेत्रातील योगदान मोठे आहे. महाविद्यालयीन जीवनातील अनुभवाचे व सुख-दुःखाचे शब्दरूप प्रकटीकरण म्हणजे महाविद्यालयाचा 'पालवी' वार्षिक अंक विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व नवनिर्मितीला अधिक चालना याचा महाविद्यालयीन पातळीवरचा हा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न असतो. विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या विषयावर आपली मत मांडण्यासाठी हा विचारमंच उपलब्ध करुन दिला जातो. त्याचबरोबर अंक म्हणजे महाविद्यालयाचा शैक्षणिक वर्षाचा आरसा असतो. या अंकाच्या माध्यमातून महाविद्यालयाने वर्षात बविलेले उपक्रम, विविध कार्यक्रम, स्पर्धा, महत्त्वपूर्ण घडामोडी चे प्रतिबिंब त्यात पहावयास मिळते. महाविद्यालयाचा 'पालवी' अंक दरवर्षी एक विशिष्ट थीम / आशय घेऊन विद्यार्थ्यांना लिहीत करत असतं. परिसर संचालक डॉ स्वाती मुनोत तसेच संपादक मंडळाने 'महिला सक्षमीकरण हा विषय ठरविला. महिलांचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक सक्षमीकरण झाले पाहिजे हा सकारात्मक दृष्टीकोन ठेवून काम करणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे कोणत्याही सामाजिक चळवळीचे यश हे समाजातील विविध घटकांनी दिलेल्या सक्रीय सहभागाबरोबरच तत्कालीन विचारवंतांनी व् तरुणांनी साहित्याच्या माध्यमातून केलेल्या प्रबोधनावर अवलंबून असते. या विचाराशी बांधिलकी जपत महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी-विद्यार्थिनीच्या विचारातून हा अंक आपणा समोर येत आहे.

मानवी जीवनाच्या विकास प्रक्रियेत पुरुषांच्या बरोबरीने महिलांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आई, बहीण, मैत्रीण, पत्नी,

आत्या, मावशी, मामी, काकू अशा विविध रुपांमध्ये 'ती' आपल्या पाठीशी शक्तीचे रूप म्हणून सदैव उभी असते. वात्सल्य, मांगल्य आणि मातृत्वाचे मूर्तिमंत रुप असलेली महिला समाजजीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपला कणखरपणा, बाणेदारपणा आणि नेतृत्त्वगुणांमुळे सर्व आव्हानांना जिद्दीने सामोरे जात आहे. महिलांनी साहित्य, क्रीडा, उद्योग, शिक्षण - आणि राजकारणातही स्वकर्तृत्वाने समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे. आजही सर्वच क्षेत्रात महिला आघाडी घेताना दिसत आहे. स्वकर्तृत्वाने आपले विश्व निर्माण करणा-या महिलांना मुजरा करण्याचा प्रयत्न या 'पालवी' अंकाच्या माध्यमातून केला आहे.

विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये आपले विचार व्यक्त केले आहे. विद्यार्थ्यांनी अंकासाठी लेखन केले त्याबद्दल कार्यकारी संपादक या नात्याने मी, सर्वांचे आभार मानते. नियमित प्रकाशित होणाऱ्या 'पालवी' वार्षिक अंकाचे शब्दफुल आपल्या हाती देतांना मला अतिशय आनंद होत आहे. महाविद्यालयाच्या या नवव्या अंकांचे आपण दरवर्षीप्रमाणे मनःपूर्वक स्वागत कराल आणि आपल्या अंतःकरणात त्याला स्थान दयाल अशी आशा बाळगते महाविद्यालयाच्या परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत, विश्वस्त श्री. किशोर मुनोत तसेच महाविद्यालयातील सर्व कर्मचारी, प्राध्यापक कर्मचारीवृंद, विद्यार्थी अतिशय मोठ्या उत्साहाने दरवर्षी अंकासाठी सक्रिय सहभाग नोंदवतात. या अंकांच रुप अधिक देखणे व्हावं यासाठी ज्यांनी योगदान दिले त्यांच्या कायम ऋणात रहायला मला आवडेल.

## महिला सक्षम, समाज सक्षम!

## • स्त्रीचा सन्मान, राष्ट्राचा अभिमान!

## • समान हक्क, समान संधी—महिलांची खरी प्रगती!

# मराठी विभाग

# महिला सक्षमीकरण

-प्राचार्य खासेराव शितोळे-

संयुक्त् राष्ट्र संघाने (United Nations) महिला सक्षमीकरण आणि कार्यस्थळी लिंगभाव समानता सुनिश्चित करण्यासाठी महिला सक्षमीकरणाची सात तत्वे जाहीर केली आहेत. ती अशी-

1.उच्चस्तरीय नेतृत्वाची स्थापना- लैंगिक समानता यावी यासाठी प्रोत्साहन देणे व धोरणांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी कंपनी किंवा संस्थेच्या वरिष्ठ पातळीवर नेतृत्व व बांधिलकी असणे आवश्यक आहे.

2.समानतेची वागणूक देणे व भेदभाव न करणे- कामाच्या जागी महिला व पुरूषांनी समान व्यवहार करणे. निष्पक्षपाती वर्तन ठेवणे. मानवाधिकारांचा आदर करणे भेदभावरहित धोरणांचा आदर करणे त्यांना पाठींबा देणे.

3.आरोग्य, सुंरक्षा आणि कल्याण-सर्व महिला आणि पुरूष कामगारांच्या आरोग्याची, सुरिततेची आणि सम्यक कल्याणाची पूर्ण काळजी घेणे.

4.शिक्षण व व्यावसायिक विकास-महिलांच्या शिक्षणासाठी, व्यावसायिक प्रशिक्षणासाठी आणि कौशल्य विकासासाठी विशेष संधी उपलब्ध करून देणे.

5.उद्योजकता, पुरवठा साखळी आणि विपणन-महिलांच्या मालकीच्या व्यावसायिक उपक्रमांना प्रोत्साहन देणे पुरवठा साखहीत महिला सक्षमीकरणाच्या पध्दतींचा वापर करणे.

6. समुदाय पुढाकारातून समतेला प्रोत्साहन देणे-सक्षमत आणि सक्षमीकरण यांना चालना देणे त्याकरिता सामुदायिक उपक्रम आणि सल्लगाराच्या माध्यमातून कार्य करणे.

7.प्रगतीचे मोजमाप आणि अहवाल- लैंगिक समानतेसाठी केलेल्या उपाययोजनांच्या प्रगतीचे पारदर्शक मूल्यांकन करणे. त्यांची सर्वांपर्यंत माहिती पोहोचवणे.

या सर्वच तत्वांची सदस्य राष्टांनी काटेकोर मंमलबजावणी करावे असे अपेक्षितआहे् भारत त्याचा सदस्य आहे.

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीचे स्थान, हक्क संधी आणि समानता उपलब्ध करून देणे.

महिला सक्षमीकरणासाठी घटनात्मक व कायदेशीर उपाय-घटनेतील तरतुदी कलम 14 कायद्यासमोर स्त्री-पुरूष समानता समान सुरितता व संरक्षण.

कलम 16- स्त्रियांना पुरूषाप्रमाणेच समान संधी दिली जावी कायदेशीर तरतुदी- 1776 चा समान वेतन कायदा या कायद्याने महिलांची नोकर भरती आणि वेतन याबाबत कोणताही भेदभाव करता येणार नाही. समान काम समान वेतन 1961 च्या प्रसुतीविषयक लाभ मिळवून देणारा कायदा 2005 चा महिला वारसा हक्क दुरूस्ती कायदा- 2005 चा

महिलांना कौटूंबिक छळापासून संरक्षण देणारा कायदा.2013 चा कामाच्या ठिकाणी महिलांना संरक्षण देणारा व लैंगिक छळापासून संरक्षण देणारा कायदा. 1961 चा हुंडाबंदीकायदा 2013 चा दंड संहिता सुधारणा कायदा.

या सर्व कायद्यांची योग्य अंमलबजावणी झली तर महिला सुरक्षित असतील. परंतु या काय्द्यांन्वये गुन्हेगारांना राजकीय पाठबळ मिळते. अनेकदा प्रशासनाची ढिलाई महिलांना त्यांची सुरक्षितता मि ळू देत नाही.

महिलांकरिता महिला आयोग नियुक्त करण्यात आला आहे. मात्र त्याच्या अध्यक्षपदी पक्षीय कार्यकर्त्यांची वर्णी लावली जाते. परिणामी त्यांच्याकार्यात पारदर्शकता राहत नाही. महिलांना न्याय मिळत नाही.

महिलांना शिक्षण मोफत द्यावे अशा तरतूदी आहेत. परंतु दुर्गम भागातील मुलींच्या शिक्षणाची फारच दुरावस्था आहे. पटसंख्या कमी म्हणून तेथील शाळा बंद केल्या जातात. मग बेटी बचाव बेटी पठाव या घोषणा व्यर्थ ठरतात. महिलांना सर्व स्तरावरील शिक्षण पूर्णपणे मोफतच दिले पाहिजे तरच त्यांचे सक्षमीकरण होईल.

विवाह समस्या- सर्वदूर अल्पवयीन मुलींचे लग्न लावून देण्याकडे पालकांचा कल आहे. कायदा असूनही अंमलबजावणीतील ढिलाई असे विवाह रोखू शकत नाही.

महिलांचे शोषण ही एक अत्यंत गंभीर समस्या आहे. लहान मुलींना पठवून नेऊन त्यांचे शोषण केले जाते त्यांना अनैतिक व्यवसाय करण्यास भाग पाडले जाते हा आपल्या देशात फार मोठा व्यवसायच बनला आहे. त्याविरोधात जनजागृती आणि कायद्याची कठोर अंमलबजावणी गरजेची आहे. वेश्याव्यवसाय हा सामाजिक कलंक आहे.

महिलांना व्यवसाय कौशल्य शिकविणे, त्यांना कौशल्य प्राप्त केल्यावर व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या उत्पादनांना सरकार व संस्थांनी प्राधान्यांनी मागणी करणे आवश्यक आहे. त्यातून त्यांचे सक्षमीकरण होईल.

सरकार महिलांकरिता अनेक योजना तयार करते जाहिर करते. परंतु त्या योजना महिलांपर्यंत पोहचत नाहीत पोहचल्या तर त्यांना त्यांचा लाभ मिळविण्यात अनंत अडचणी येतात. त्या सोडविणे आवश्यक आहे.

शेवटी समाजाची मानसिकता बदलली तरच समस्त महिलांचे सक्षमीकरण प्रत्यक्षात येऊ शकेल.

# शिक्षीत स्त्री विकसीत भारत

प्रा. डॉ .स्वाती मुनोत

स्त्री सक्षमीकरण हे आधुनिक समाजाच्या प्रगतीचे एक महत्त्वपूर्ण सूत्र आहे. समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी स्त्री आणि पुरुष यांचा समान सहभाग आवश्यक आहे. स्त्री ही केवळ कुटुंबाची आधारस्तंभ नसून समाज आणि राष्ट्राच्या विकासाची प्रमुख शक्ती आहे. त्यामुळे महिलांना शिक्षण, रोजगार, आरोग्य, निर्णय प्रक्रियेत सहभाग आणि समान संधी उपलब्ध करून देणे म्हणजे स्त्री सक्षमीकरण होय. आजच्या काळात स्त्रिया विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करत असल्या तरी या यशामागे अनेक वर्षांचा संघर्ष आणि सामाजिक परिवर्तनाचा इतिहास दडलेला आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला देवीचे स्थान दिले गेले आहे. वैदिक काळात स्त्रियांना शिक्षणाचा, धार्मिक कार्यांमध्ये सहभागाचा आणि सामाजिक जीवनात सक्रिय भूमिका बजावण्याचा अधिकार होता. गार्गी, मैत्रेयी यांसारख्या विदुषी स्त्रियांनी ज्ञान आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात मोठे योगदान दिले. परंतु कालांतराने समाजात अनेक अनिष्ट प्रथा आणि रूढी निर्माण झाल्या. बालविवाह, सतीप्रथा, स्त्रीशिक्षणावरील बंदी, विधवांवरील अन्याय आणि स्त्रियांचे सामाजिक स्वातंत्र्य मर्यादित करणाऱ्या परंपरांमुळे महिलांची स्थिती खालावली. स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले आणि त्यांचे जीवन घराच्या चार भिंतींपुरते मर्यादित राहिले.

या परिस्थितीत अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी कार्य केले. महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची चळवळ सुरू करून भारतीय समाजात परिवर्तनाची नांदी केली. सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू करून शिक्षणाची दारे खुली केली. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी विधवा पुनर्विवाह आणि महिला शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेत महिलांना समान अधिकार मिळवून देण्यासाठी मोठे योगदान दिले. या महान व्यक्तींच्या प्रयत्नांमुळे स्त्रियांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायाचे अधिकार प्राप्त झाले.

आजच्या वर्तमानकाळात स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आपली क्षमता सिद्ध करत आहेत. शिक्षण, विज्ञान, वैद्यकीय क्षेत्र, उद्योग, प्रशासन, राजकारण, क्रीडा, संरक्षण, कला आणि तंत्रज्ञान अशा सर्व क्षेत्रांत महिलांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशाचे नेतृत्व केले. कल्पना चावला यांनी अंतराळात झेप घेऊन भारतीय महिलांची कर्तबगारी जगासमोर आणली. किरण बेदी यांनी पहिल्या महिला आयपीएस अधिकारी म्हणून नवा आदर्श निर्माण केला. पी. व्ही. सिंधू, मेरी कोम, साक्षी मलिक यांसारख्या खेळाडूंनी जागतिक स्तरावर भारताचा गौरव वाढवला. महाराष्ट्रातील अनेक महिला शिक्षण, समाजकार्य, उद्योग आणि प्रशासन क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करत आहेत.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनानेही विविध योजना राबवल्या आहेत. बेटी बचाओ, बेटी पढाओ, महिला स्वयं-सहायता गट, कौशल्य विकास योजना, महिला आर्थिक विकास महामंडळ अशा उपक्रमांमुळे महिलांना आर्थिक आणि

सामाजिकदृष्ट्या सक्षम होण्याची संधी मिळत आहे. ग्रामीण भागातील महिलाही स्वयंरोजगार, बचत गट आणि लघुउद्योगांच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनत आहेत. डिजिटल युगात महिलांनी ऑनलाइन व्यवसाय, ई- कॉमर्स, डिजिटल शिक्षण आणि विविध तांत्रिक क्षेत्रांमध्येही आपले स्थान निर्माण केले आहे.

स्त्री सक्षमीकरणाचे महत्त्व केवळ महिलांच्या प्रगतीपुरते मर्यादित नाही. सशक्त महिला ही सशक्त कुटुंबाची निर्माती असते. ती आपल्या मुलांना योग्य शिक्षण, संस्कार आणि मूल्ये देते. त्यामुळे समाजात सुशिक्षित आणि जबाबदार नागरिक घडतात. महिलांना समान संधी मिळाल्यास देशाच्या आर्थिक विकासालाही चालना मिळते. संशोधनातून असे दिसून आले आहे की महिलांचा कार्यक्षेत्रातील सहभाग वाढल्यास देशाची उत्पादकता आणि आर्थिक प्रगती अधिक वेगाने होते. त्यामुळे स्त्री सक्षमीकरण हे सामाजिक न्याय, आर्थिक विकास आणि लोकशाही मूल्यांच्या बळकटीकरणासाठी अत्यंत आवश्यक आहे.

भविष्यातील भारत अधिक विकसित आणि समृद्ध बनवायचा असेल तर महिलांच्या सक्षमीकरणावर विशेष भर देणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सायन्स, रोबोटिक्स, जैवतंत्रज्ञान, अंतराळ संशोधन आणि उद्योजकता यांसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग वाढविणे गरजेचे आहे. प्रत्येक मुलीला दर्जेदार शिक्षण, सुरक्षित वातावरण आणि समान संधी उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. ग्रामीण आणि वंचित भागातील महिलांपर्यंत तंत्रज्ञान, आर्थिक साक्षरता आणि कौशल्य विकासाचे कार्यक्रम पोहोचविणे आवश्यक आहे. भविष्यात महिलांनी केवळ सहभागी म्हणून नव्हे तर निर्णय घेणाऱ्या नेतृत्वाच्या भूमिकेत अधिक मोठ्या प्रमाणात पुढे यावे, ही काळाची गरज आहे.

आजची स्त्री आत्मविश्वासाने, धैर्याने आणि जिद्दीने प्रत्येक आव्हानाचा सामना करत आहे. भूतकाळातील संघर्ष, वर्तमानातील यश आणि भविष्यकाळातील अमर्याद संधी यांचा विचार करता स्त्री सक्षमीकरण ही केवळ एक सामाजिक संकल्पना नसून राष्ट्रनिर्मितीची शक्ती आहे. स्त्रीला समान सन्मान, संधी आणि सुरक्षितता मिळाल्यास ती समाजाच्या विकासात अधिक प्रभावी योगदान देऊ शकते. म्हणूनच प्रत्येकाने स्त्रीच्या सन्मानासाठी, शिक्षणासाठी आणि स्वावलंबनासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कारण स्त्री सशक्त झाली तर कुटुंब सशक्त होते, कुटुंब सशक्त झाले तर समाज सशक्त होतो आणि समाज सशक्त झाला तर राष्ट्र प्रगत होते. स्त्री सक्षमीकरण हेच उज्ज्वल, समतामूलक आणि प्रगत भारताच्या निर्मितीचे खरे अधिष्ठान आहे.

## कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल युग आणि महिला सक्षमीकरण

प्रा. स्नेहल बोरावके
B.Com (Ca)/BBA विभागप्रमुख

"एका शिक्षित आणि सक्षम महिलेच्या हातात संपूर्ण समाजाचे भविष्य सुरक्षित असते." हे वाक्य आजच्या आधुनिक युगात अधिक सत्य वाटते. काळ बदलत आहे, तंत्रज्ञान झपाट्याने विकसित होत आहे आणि या बदलामध्ये महिलाही आत्मविश्वासाने पुढे जात आहेत. पूर्वी महिलांची भूमिका मुख्यतः घर आणि कुटुंबापुरती मर्यादित मानली जात होती; परंतु आज महिला शिक्षण, उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान, राजकारण, संरक्षण, आरोग्य, पत्रकारिता, क्रीडा आणि उद्योजकता अशा प्रत्येक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. त्यामुळे महिला सक्षमीकरण ही केवळ सामाजिक चळवळ नसून आधुनिक भारताच्या विकासाचा महत्त्वाचा पाया बनली आहे.

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना शिक्षण, आर्थिक स्वातंत्र्य, समान संधी, स्वतःचे निर्णय घेण्याचा अधिकार, सुरक्षित वातावरण आणि सामाजिक सन्मान मिळवून देणे होय. सक्षमीकरण म्हणजे केवळ महिलांना नोकरी देणे नव्हे, तर त्यांना आत्मविश्वासाने स्वतःचे जीवन घडविण्याची ताकद देणे होय.

आज महिलांना शिक्षण, करिअर आणि व्यवसायाच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहेत. समाजातील जुन्या रुढी आणि परंपरांच्या मर्यादा हळूहळू कमी होत असून महिला स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करत आहेत.

महिला सक्षमीकरणासाठी शिक्षण हे सर्वात प्रभावी साधन आहे. शिक्षणामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास, विचारशक्ती आणि निर्णयक्षमता निर्माण होते. पूर्वी अनेक मुलींना शिक्षणापासून वंचित राहावे लागत असे. ग्रामीण भागात तर मुलींचे शिक्षण लवकर थांबवले जाई. परंतु आज परिस्थिती मोठ्या प्रमाणावर बदलली आहे.

ऑनलाइन शिक्षण, डिजिटल क्लासेस, मोबाईल ॲप्स आणि इंटरनेटमुळे शिक्षण प्रत्येक घरापर्यंत पोहोचले आहे. आज महिला घरबसल्या नवीन कौशल्ये शिकू शकतात. संगणक शिक्षण, डिजिटल मार्केटिंग, वेब डिझाइन, ग्राफिक डिझाइन, प्रोग्रामिंग, सायबर सिक्युरिटी, ऑनलाइन अध्यापन अशा अनेक क्षेत्रांमध्ये महिला प्रशिक्षण घेत आहेत.

"बेटी बचाओ, बेटी पढाओ" यांसारख्या अभियानांमुळे मुलींच्या शिक्षणाविषयी समाजात जागरुकता निर्माण झाली आहे. शिक्षणामुळे महिलांना आत्मनिर्भर बनण्याचा मार्ग खुला झाला आहे.

आजचे युग हे इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाचे युग आहे. स्मार्टफोन आणि इंटरनेटमुळे जग एका क्लिकवर उपलब्ध झाले आहे. या डिजिटल क्रांतीमुळे महिलांसाठी रोजगाराच्या आणि व्यवसायाच्या अनेक नवीन संधी निर्माण झाल्या आहेत.

पूर्वी महिलांना घर आणि नोकरी यामध्ये समतोल राखणे कठीण जात असे. परंतु आज ऑनलाइन कामाच्या संधींमुळे महिला घरबसल्या आर्थिक उत्पन्न मिळवू शकतात. उदाहरणार्थ: ऑनलाइन अध्यापन, यूट्यूब चॅनेल, ब्लॉगिंग, कंटेंट रायटिंग,फ्रीलसिंग,

महिला सक्षमीकरणामध्ये आर्थिक स्वातंत्र्याला खूप महत्त्व आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम महिला स्वतःचे निर्णय अधिक आत्मविश्वासाने घेऊ शकते. पूर्वी महिलांना आर्थिक बाबींमध्ये पुरुषांवर अवलंबून राहावे लागे; परंतु आज महिला स्वतः कमावून कुटुंबाच्या प्रगतीमध्ये योगदान देत आहेत.

स्वयंरोजगार, बचत गट, स्टार्टअप्स, ऑनलाइन व्यवसाय आणि सरकारी योजनांमुळे महिलांना आर्थिक संधी उपलब्ध होत आहेत. अनेक महिला लघुउद्योग, हस्तकला, फूड व्यवसाय, ब्युटी पार्लर, ऑनलाइन कोर्सेस यांसारख्या क्षेत्रांमध्ये यशस्वी होत आहेत. सोशल मीडिया हे महिलांसाठी एक प्रभावी व्यासपीठ बनले आहे. फेसबुक, इंस्टाग्राम, यूट्यूब, लिंक्डइन यांसारख्या माध्यमांमुळे महिला स्वतःचे विचार, कला आणि व्यवसाय जगासमोर मांडू शकतात.

आज अनेक महिला सोशल मीडियाच्या मदतीने प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून पुढे येत आहेत. महिला सुरक्षा, शिक्षण, आरोग्य, करिअर मार्गदर्शन आणि सामाजिक प्रश्नांवर जागरूकता निर्माण करण्यामध्ये सोशल मीडियाची महत्त्वाची भूमिका आहे.

महिला सक्षमीकरणासाठी सुरक्षित वातावरण अत्यंत आवश्यक आहे. आजही अनेक महिलांना घरगुती हिंसा, लैंगिक छळ, सायबर गुन्हे, भेदभाव अशा समस्यांना सामोरे जावे लागते.

डिजिटल युगात सायबर सुरक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे. ऑनलाइन फसवणूक, बनावट प्रोफाइल, डेटा चोरी यांसारख्या समस्यांपासून महिलांनी सावध राहणे आवश्यक आहे. त्यामुळे महिलांमध्ये डिजिटल साक्षरता आणि सायबर जागरुकता निर्माण करणे गरजेचे आहे.

महिला सक्षमीकरणासाठी केवळ कायदे किंवा योजना पुरेशा नाहीत. समाजाची मानसिकता बदलणे अत्यंत आवश्यक आहे. मुलगा आणि मुलगी यांना समान संधी दिल्या पाहिजेत. महिलांच्या स्वप्नांना आणि करिअरला प्रोत्साहन दिले पाहिजे.

घरामध्ये महिलांना निर्णय प्रक्रियेमध्ये समान स्थान मिळणे आवश्यक आहे. महिलांना "कमकुवत" न समजता त्यांच्यातील क्षमता ओळखून त्यांना पुढे जाण्याची संधी दिली पाहिजे.

आजची महिला आत्मविश्वासाने जग जिंकण्याची क्षमता ठेवते. शिक्षण, तंत्रज्ञान, आर्थिक स्वावलंबन आणि आत्मविश्वास यांच्या बळावर महिला समाजामध्ये मोठा बदल घडवू शकते. महिला सक्षमीकरण हे केवळ महिलांच्या विकासासाठी नाही, तर संपूर्ण समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे.

" महिला सक्षम तर राष्ट्र सक्षम" हे आजच्या काळातील सत्य आहे. प्रत्येक महिलेला शिक्षण, सुरक्षितता, समान संधी आणि सन्मान मिळाला तर भारत खऱ्या अर्थाने प्रगत आणि विकसित राष्ट्र बनेल. आधुनिक युगातील महिला ही केवळ कुटुंबाची जबाबदारी सांभाळणारी व्यक्ती नसून समाज परिवर्तनाची शक्ती आहे.

## महिला सक्षमीकरण


डॉ.प्रशांत खोपटीकर


महिला सक्षमीकरण का अर्थ है, महिलाओंको सामाजिक, आर्थिक, राजनैतिक और शैक्षिक रूप से इतना समय बनाता की वे अपने जीवन के निर्णय स्वयं ले सके और समाज अधिकारों का उपयोग कर सके.

अर्थ-

1.महिलाओं को समान अधिकार और अवसर देना. 2. आत्मिर्भर और आत्मविश्वासी बनाना 3.समाज से उनकी समान भागीदारी सुनिश्चित करना

प्रमुख क्षेत्र-

1.शिक्षा - महिलाओंको गुणवत्तापूर्ण शिक्षा देना.2. आर्थिक व्यवसाय और आय के अवसर प्रदान करना. 3.सामाजिक सक्षमीकरण- भेदभाव तथा कुरीतियों का अंत 4. राजनितीक सक्षमीकरण-निर्णय लेने मे भागीदारी आर्थिक सक्षमिकरण के मुख्यतत्व रोजगार के अवसर, आय मे वृध्दी, कौशल विकास, वित्तीय संसाधनों तक पहुंचना, आर्थिक सक्षक्तीकरण का महत्व्, गरीबी मे कभी, 2.जीवनस्त्र मे सुधार 3.आत्मिर्भरता और आत्विश्वास मे वृध्दी, समाजिक समानता को बढ़ावा, देश के आर्थिक विकास में योगदान, ग्रामीण महिलाओं को स्वयं सहायता समुह के माध्यम से कर्ज देना, युवाओंको कौशल प्रशिक्षण देकर रोजगार उपलब्ध कराना छोटे व्यापारियोंको लोन देकर व्यवसाय बढाने में मदत करना.

**भारत में पहल**

1.बेटी बचाओ और बेटी पढ़ाओ-बालिका शिक्षा और सुरक्षा बढ़ावा.

2.महिला शक्ती केंद्र-ग्रामिण महिलाओं को सशक्ता बनाना 3. सुकन्या समृध्दी योजना-बालिकाओंको लिए बचत योजना

**सामाजिक चुनौतिया-**

1.पितृसत्ताक समाज में महिलाओं को कम महत्व दिया जाता है 2. बाल विवाह, दहेज प्रथा, लैंगीक भेदभाव जैसी कुरितीयाँ 3.महिलाओं की स्वतंत्रता पर नियंत्रण

**शिक्षा की कमी-**

1.कई क्षेत्रो में लड़कियों की शिक्षा को प्राथमिकता नही दी जाती. 2. स्कूल छोडने की दर अधिक होती है 3.आर्थिक निर्भरता 1. महिलओंके पास रोजगार के सिमित अवसर 2.समान काम के लिए असमान वेतन, 3.संपत्ती और संसाधनों पर कम अधिकार राजनैतिक भागिदारी में कमी राजनैतिक भागीदारी में कमी 4.निर्णय लेनेवाली संस्थाओ में कम भागीदारी 5.राजनीति प्रवेश के लिए सामाजिक और आर्थिक बांधाए

**सुरक्षा और हिंसा**

1.घरेलू हिंसा, यौन उत्पीड़न, मानवव तस्क्र
2.सार्वजनिक स्थानोंपर असुरक्षा की भावना

**कानुनी जागरूकता की कमी**

1. महिलाओं को अपने अधिकारों और कानुनी की जानकारी कम होती है
2. कानुन होने के बावजूद उनका सही क्रियान्वयन नहीं होता

**स्वास्थ्य और पोषण**

1.पर्याप्ता स्वास्थ्य सेंवाए और पोषण नहीं मिलपाना 2. मातृ मृत्यू दूर औरकुपोषण की समस्या महिला सक्षमीकरण के लिए इन चुनौतियों को दर करना जरूरी है, इसके लिए शिक्षा, जागरूकता, कानुनोंका सक्त और समाज की सोच में बदलाव आवश्यक है.

## महिला सक्षमीकरण

पुजा सुनिल गडकर
S.Y.B.A.

स्त्री..
एक असा शब्द... ज्यामध्ये खूप काही दडलं आहे तिच्या आयुष्यात आनंद असतो, पण त्याहून जास्त संघर्ष असतो...
कोणी म्हणत काळी
कोणी म्हणतं जाडी,
कोणी म्हणतं बारीक
तर कोणी म्हणत "तिच्यातच काहीतरी कमी."
नोकरी केली तर प्रश्न
जोरात हसली तर लोकांना त्रास
शांत राहिली तर atitude ची वारंवार नोंद
छोटे छोटे कपडे कपडे घातले तर त्रास
साडी घातली तर घरात लक्ष्मीचा वास
लहानपणापासून ऐकत आलेली वाक्यं.
मुलगी आहेस..... जपून रहा "
मुलगी म्हणजे परक्याचे धन",
मुलगी म्हणजे घराची अब्रु
मुलगा म्हणजे वंशाचा दिवा
अपेक्षांचं ओझं सहन करूनही ती हसते...
स्वतःच्या स्वप्नांना विसरुनही ती जगते.
पण कोणी कधी विचारलं का?
ती स्वतः साठी कधी जगणार ?
तिच्या स्वतःच्या इच्छा, स्वप्नं, निर्णय यांच काय ?
लग्नाआधी आई - बाबांचं ऐकायचं,
लग्नानंतर नव-याचं ऐकायचं.
मग तिचं स्वतःच आयुष्य ती कधी जगायचं ?
स्त्री म्हणजे फक्त कोणाची मुलगी, पत्नी. किंवा आई नाही..........
ती स्वतः मध्ये एक पूर्ण व्यक्ती आहे.
जिच्या स्वप्नांना भावनांना आणि निर्णयांना तितकंच महत्त्व आहे.
त्या प्रत्येक स्त्री ला माझा प्रणाम
जी या सगळ्या शब्दांपलीकडे जाऊन
स्वतःचं आयुष्य जगायची हिंमत ठेवते.

महिला सक्षमीकरण
नारी आहे अबला नाही
युगायुगाची शान ती
आहे सक्षम होत सफल
आहे दैवी वरदान ती

अस म्हणत आज महिला सक्षमीकरणाची आपल्याला काहीना - काही उपाययोजना करण्याची गरज आहे. भारतातील बहुतेक निरक्षर लोकसंख्येमध्ये महिलांचा समावेश आहे महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना शिक्षित करणे तसेच त्यांना त्यांच्या देश समाज आणि कुटुंबाशी संबंधित निर्णय घेण्यास सक्षम बनवणे.

भारत समाज आणि कुटुंबाच्या उज्ज्वल भविष्यासाठी महिला सक्षमीकरणाची गरज आहे. महिला सक्षमीकरण महिलांना त्यांच्या वैयक्तिक विकासासाठी तसेच सामाजिक विकासासाठी स्वतःचे निर्णय घेण्याचे अधिकार देते. महिला हा समाजाचा कणा आहे, म्हणूनच बालपणापासूनच तिचा विकास होणे आवश्यक
घडविण्यास राष्ट्राचा विकास,
मूलींच्या शिक्षणांचा हवा ध्यास:

महिलांना जागरुक करण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरुक करण्यासाठी अनेक जागरुकता कार्यक्रम चालवले जातात त्याचबरोबर समाज्यात होणा-या अत्याचारांपासून स्त्रियांचे संरक्षण करण्यासाठी अनेक फायदे देखील करण्यात आले आहेत. आंतरराष्ट्रीय महिला दिन', 'मदर्स डे' दरवर्षी साजरे केले जातात, महिला सक्षमीकरणाचा खरा अर्थ असा आहे की महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याबाबत त्यांना त्यांचे सर्व निर्णय स्वतः घेण्यास सक्षम असणे आवश्यक आहे.

तीच्यावर होत असलेल्या अत्याचारावर आवाज उठवणे.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी असे म्हटले आहे की, "लोकांना जागृत करण्यासाठी महिलांनी जागृत असे आवश्यक आहे. जेव्हा एखादी स्त्री आपले पाऊल पुढे टाकते तेव्हा तिचे कुटुंब प्रगती करते तिचे गावही पुढे येते आणि सर्वांचा विकास होतो.

प्रदीर्घ संघर्षानंतर स्त्रियांना मालमत्तेवर हक्क, मतदानाचा अधिकार, नागरी हक्क विवाह आणि नोकरीच्या बाबतीत कायदेशीर संरक्षण मिळाल नाही महिला आणि किशोरवयीन मुलींच्या सुरक्षितेसाठी बेटी बचावो, , बेटी पढाओ, उज्वल योजना , किशोरी कौशल योजना यांसारख्या अनेक कल्याणकारी योजना सरकार चालवत आहेत.

यरोखरच सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी महिलांना, त्यांच्या स्वतःच्या हक्कांबद्दल जागरुक असणे आवश्यक आहे. महिलांना त्यांच्या आजूबाजूला त्यांच्या समाजात आणि देशात काय घडत नाहे याची जाणीव असावी.

भंगणाऱ्या स्वप्नाची तू एकमात्र आस
तू प्रेरणा, तू करुणा, तूच आहेस विश्वास.
प्रत्येक नव जीवनाचा तर आधारही तूच
प्ररत्येक दिवसासाठी खास आहेस तू

आपल्या देशात प्रतिभावान महिलांची उदाहरणे कमी नाहीत. इंदिरा गांधी, कल्पना चावला, , झाशींची राणी, पीटी उषा इ. महिलांची उदाहरणे आहेत ज्यांना दयाळूपणा आणि शौर्य दाखवून या देशाला अभिमान दिला आहे. महिलांना सामाजिक आणि कौटुबिंक पातळीवर अनेक अत्याचारांना सामोरे जावे लागते. अनेक क्षेत्रात समान कामकाजातही महिलांना पुरुषांपेक्षा कमी मोबदला दिला जातो या पध्दतीचा आत्मा समाजातील स्त्री आणि पुरुषांमधील असमानतेची रेषा काढतो.

महिलांच्या प्रगतीपुढे असंख्य अडथळे येण्याचे कारण कुठेतरी सामाजिकदृष्ट्या जाणीवपूर्वक किंवा नकळत जबाबदार आहे. अनेक गावांमध्ये अजूनही मुलींना शिक्षणाची सुविधा दिली जात नाही. भारतात महिलांचा शैक्षणिक दर पुरुषांच्या तुलनेत कमी आहे. यामाग रूढीवाद[illegible] विचार आहे. जो महिलांना पुढे जा[illegible] खतो

स्त्री एक व्य[illegible] ही कोणाला न समजणारी कधीही कोणाला न उमगलेली

आणि कधीही कोणास न जाणवलेली,

महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना स्वतःचे निर्णय सक्षम बनवणे. अनेक शतकापूर्वी स्त्रियांचे अस्तित्व आणि सामाजिक उन्नती-होण्यास अनेक चळवळी केल्या जात आहेत. पूर्वी स्त्री यांना निर्णय घेण्याची किंवा खुल्या आकाशात उडण्याचे स्वप्न पाहण्याची परवानगी नव्हती. आपल्या देशात पुरुष शक्ति / शासित समाजाची परंपरा शतकानुशतके चालू आहे. तेथे महिलांना नेहमी त्याच्यावर अवलंबून राहाव लागत असे याच कारणामुळे आज महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली जात आहे.

महिला सक्षमीकरणाचा खरा अर्थ असा आहे की महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्याबरोबरच त्यांना त्यांच सर्व निर्णय स्वतः घेण्यास सक्षम बनवणे आवश्यक आहे. तिच्यावर होत असलेल्या अत्याचारावर आवाज उठवणे.

स्त्री पुरुष समानतेला प्राधान्य देत भारतभरात महिला सक्षमीकरणाला सतत प्रोत्साहन दिले जात आहे. भारत देशासाठी आवश्यक आहे की महिला शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दृष्ट्या सशक्त होतील देशाला सशक्त बनवण्यासाठी आपण आधी स्त्रीयांवर होणारे आत्याचार, हिंसाचार थांबवली पाहिजे. याच कारणांमुळे महिलांचा विकास होईल आणि ते देशाच्या विकासात आपली भूमिका बजावू शकतील.

स्त्री निभावते अनेक भूमिका
तरी करत नाहीं कसली अपेक्षा
एकदा रहा पाठीमागे उभे तिच्या
तुम्हाला ती देईल फक्त प्रेम आणि माया.

पण आज भारत सरकारने 'बेटी पढाओ आणि बेटी बचाओ " यासारख्या अनेक मोहिमा सुरु केल्या आहेत. जेणेकरून मुलींच्या शिक्षणात कोणताही अडकाठी येऊ नये. शहरी भागात महिला अधिक शिक्षित आणि नोकरी करत आहेत. परंतू ग्रामीण भागातील महिलांच्या निरक्षरतेमुळे ते शेती आणि इतर क्षेत्रात रोजंदारी करून नापले उदरनिर्वाह करत आहेत. अनेक ठिकाणी असे आढळून आले की गुणवत्ता असूनही महिलांना पुरुषापेक्षा कमी उत्पन्न दिले जाते. पुरुषांना जे अधिकार दिले आहेत तेवढेच अधिकार महिलांनाही दिले पाहिजे

स्त्रियांना या अत्याचार आणि समस्यांपासून मुक्त करण्यासाठी आपल्याला खूप पुढे जायचे आहे, महिलांना त्यांचे हक्क मिळवण्यासाठी, सर्वप्रथम समाजातील महिलांप्रती असलेली चुकीची मानसिकता मिटवावी लागेल. जर विचार बदलेल, तरच बदल होईल भारत देशात दिवसेंदिवस घडणाऱ्या हुंडा प्रथेमुळे स्त्रियांच्या हत्या आपल्याला हादरवून सोडतात, लैंगिक हिंसा, स्त्री भ्रूणहत्या ज्यामध्ये आईला तिचा न जन्मलेल्या मुलीला पोटात मारण्यास भाग पाडले जाते. स्त्री भ्रूणहत्या हा

निंदनीय गुन्हा आहे. यामुळे मुलींची संख्या वाढत नाही हे स्त्रियांविरुध्द एक प्रकारची नकारात्मक मानासिकता दर्शवते.

नारी तुच आहे तुझ्या नवक्रांतीची निशाणी, चल उठा हो ,खंबीर तुच रणरागिणी, तुच तर मत.

जिच्या उदरातून
जन्म घेते दुनिया सारी
त्या विश्वशक्तिचे
नाव आहे नारी.

वेगाने बदलणाऱ्या आजच्या आधुनिक युगात महिला सक्षम असणे याचा अर्थ आहे तो कोणाच्याही सहाय्याशिवाय जीवन जगू शकतो निर्णय स्वत्तः आजच्या काळात महिला सक्षमीकरण हा चर्चेचा विषय बनला नाहे. खासकरुन मागासवर्गीय व प्रगतशील देशांमध्ये महिला सक्षमीकरणावर भर दिला जात आहे. कारण आज पूरे करून चुकले आहे की देशातील स्त्रियांच्या प्रगती शिवाय देशाची प्रगती शक्य नाही. आपल्या प्राचीन ग्रंथामध्ये "यत्र नार्थस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता अर्थात जेथे (स्त्रीची) पूजा केली जाते तेथे देवाचे स्थान असते हा महत्त्वाचा मुद्दा आहे अशा पध्दतीने स्त्रियांना मान देण्यात आला आहे.

परंतु आजच्या समाजाची विटंबना पहा.. स्त्री मध्ये एवढी शक्ती असतानाही देशातील अनेक भागांमध्ये तिला अशिक्षित समाजाला कळावे यासाठी जगभरात आंतरराष्ट्रीय महिला दिन, असक्षम महत्व आणि अधिकार संपूर्ण आणि मातृ दिवस यासारखे स्त्रियांचे दिवस साजरा करुन त्यांना सक्षम करण्याचा प्रयत्न देशात समाजातील स्त्रियांचे अधिकार आणि मूल्य मारून टाकणा-या कुप्रथा जसे हुंडा, अशिक्षा, लैंगिक अत्याचार, असमानता, स्त्रीभ्रृषणहत्या आणि घरेलू हिंसा इ. बंदी घालण्यात आली आहे. स्त्री ला सृजन शक्ती मानले जाते असे माझे म्हणणे आहे. म्हणजेच स्त्री मानवजातीचे अस्तित्व आहे. तिच्यामुळेच सृष्टी निर्माण झाली आहे. म्हणूनच स्त्रीलां संपूर्ण आर्थिक, राजनीतिक विचार विश्वास, उपासना इत्यादिंना स्वातंत्र्य देणे अधिकार देणे आवश्यक आहे.

रोजगार, शिक्षण आणि आर्थिक व्यवहारात स्त्री ला अधिकार दिले गेले पाहिजे इ गोष्टींची पूर्तता केल्यास एक स्त्री संपूर्ण सक्षम आणि सशक्त होईल.

आपले निर्णय स्वत: घेण्यास ती पूर्णपणे सक्षम् तयार झालेली असेल. आज भारत सरकारने शासनाद्वारे महिलांच्या सक्षमीकरणाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. बेटी बचाव, वुमन , महिला शक्ती केंद्र आणि पंचायती मधून महिलासाठी आरक्षण व काही प्रमुख महिला सक्षमीकरण' योजना भारत

शासनाद्वारे राबविण्यात येत आहेत.

आज भारताची होणारी जलद प्रगती लक्षात येते की येत्या काही वर्षामध्ये भारत महिला सक्षमीकरणाचे ध्येय साध्य करेल, परंतु लवकरात लवकर संपूर्ण देशातील महिलांना सशक्तकण्याकरिता योग्य निर्णय आणि उपक्रम राबवणे आवश्यक आहे, असे मला वाटते. शासनाने व देशातील जनतेने महिला सक्षमीकरणा ची आवश्यकता समजून घ्यायला हवी व याविषयी जास्तीत जास्त लोकांना ते जागृत निर्माण करायला हवी, 'जर या सर्व गोष्टी व्यवस्थित पार पडल्या तर येत्या काही वर्षातच भारतातील महिला खांदयाला खांदा लावून कार्य करताना दिसून येतील.

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना त्यांच्या जीवना वर नियंत्रण ठेवण्यास, निवड करण्यास आणि निर्णय घेण्यास आणि संसाधने आणि संधींमध्ये समान प्रवेश मिळविण्यास आणि संसाधने सक्षम करणे यामध्ये वातावरण निर्माण करणे समाविष्ट आणि महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समाजात आणि अर्थव्यवस्थेत सामील होता येईल आपण जिथे त्यांचे आवाज सुरक्षित केले जातील. महिला सक्षमीकरण अनेक स्वरुपात बसू शकते. ज्यामध्ये शिक्षण आर्थिक, राजकीय आणि सामाजिक यांचा समावेश होतो. शेवटी महिला असे जग जग निर्माण करणे आहे. जिथे महिलांना लिंगभेद किंवा महिला सक्षमीकरणांचा उद्देश मर्यादाशिवाय त्यांचे जीवन जगण्याची शक्ती आणि स्वातंत्र मिळेल.

सुख समृध्दीचा एकच झरा
शिक्षण हाच मार्ग खरा

एका सभ्य आणि सुशिक्षित समाजाचे निर्माण ज्या देशातील शिक्षित नागरिकांमुळे होते. असे मानले जाते की एका पुरुषाला शिक्षित केल्यामुळे एकच व्यक्ती शिक्षित होते जर एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुब शिक्षित होते. स्त्री कुटुंबाचा केंद्रबिंद्र असते आईच्या रुपात आपल्या मुलांना संस्कार देते.

देशाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी पुरुषांसोबत स्त्रियांनाही शिक्षित करणे महत्वाचे आहे.

भारतात आज विशेष करून शहरी भागात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करत आहेत. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रियां कार्यरत आहेत. परंतू आजही जर भारताची तुलना इतर विकसीत देशाशी केली तर आपल्या लक्षात येईल की महिलांना शिक्षित करण्यात आपण किती मागे आहोत. शिक्षणाने बुद्धीचा विकास होतो, आणि सोबतच ज्ञान वाढते.

जरी आज प्रत्येक गावागावात शिक्षण पोहचले आहे. तरीही देशातील काही ठिकाण असेही आहेत जेथे स्त्रियांना शिकवणें व्यर्थ मानले जाते त्यांना फक्त चूल आणि मूल सांभाळण्याचे तिला प्रशिक्षण दिले जाते.

अशिक्षित महिलेपेक्षा एक शिक्षित महिला कुंटुंबातील प्रत्येक सदस्याला जबाबदार बनवते. ती तिच्या मुलांमध्ये चांगल्या गुणांचा संचार करते. अशा प्रकारे एक शिक्षित महिला संपूर्ण कुटुंबाला आणि समाजाला शिक्षित करते तीच्या शिक्षणाकडे जास्तीत जास्त लक्ष दिले पाहिजे असे मला वाटते.

आज भारत हा स्त्री शिक्षणात नित्य प्रगती करीत आहे. भारताचा इतिहास अनेक शूरवीर महिलांनी भरलेला आहे. घरातील चुलीपासून निघून बाहेर व्यवसाय, साहित्य, प्रशासन पोलिस सेना खेळ इ.क्षेत्रामध्ये महिला पुढे आले आहेत. आजच्या युगात तर अनेक महिला घरातील कामे सांभाळून ऑनलाईन शिक्षण घेत आहेत. देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी स्त्रियांचे शिक्षण अती महत्त्वाचे आहे. आणि सोबतच जुन्या शिक्षण पद्धतीत बदल करुन नवनवीन गोष्टी अभ्यासक्रमात सामील करायला हव्यात असे माझे मत आहे.

आज प्रत्येक क्षेत्रात प्रगती करून स्त्रीने दाखवून दिले आहे की ती सुद्धा सक्षम, निर्भय आहे. आणि कोणत्याही गोष्टी ती सहजपणे करू शकते. मी ज्या कॉलेज मध्ये शिकत आहे त्याच्या मुख्याध्यापक पण एक महिलाच आहे. थोडक्यात असे सांगायचे आहे. बाईला किंवा स्त्रियाना शिकवले तर त्या एका कुटुबाचे नाही तर पूर्ण भारताच नाव मोठे करतात.

**शिक्षण हेच महिलांचे सर्वात मोठे सामर्थ्य!**

- **महिला सशक्तीकरण, विकासाचे प्रभावी शस्त्र!**
- **महिलांना द्या संधी, घडेल उज्ज्वल पिढी!**
- **स्त्री सक्षम तर कुटुंब सक्षम, कुटुंब सक्षम तर राष्ट्र सक्षम!**
- **स्वप्नांना द्या उंच भरारी, सशक्त होईल प्रत्येक नारी!**

## महिला सक्षमीकरण : काळाची गरज

**वृषाली मधुकर दुमणे**
**TY.B.A**

यत्र नार्यस्तु पुज्यते रमन्ते तत्र देवता : " जिथे स्त्रियांचा सन्मान होती, तिथे देवता नांदतात असे आपली संस्कृती सांगते पण प्रत्यक्षात मात्र शतकानुशतके स्त्रीला 'चुल आणि मुल' या चौकटीत डांबुन ठेवले गेले. २१ व्या शतकात महिला, सक्षमीकरण ही संकल्पना याच शतकानुशतकांच्या शोषणाला छेद देऊन स्त्रीला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणुन प्रस्थापित करण्याची चळवळ आहे. सक्षमीकरण म्हणजे स्त्रीला सक्षम बनवणे नाही; तर तिला तिच्या अंगभुत क्षमतांचा विकास करण्याची संधी व स्वातंत्र्य देणे होय.

**सक्षमीकरणाची व्याख्या व पैलु**

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना सामाजिक, आर्थीक, राजकीय शैक्षणीक व मानसिकदृष्टया निर्णय घेण्यास सक्षम बनवणे. त्याचे 5 पैलु आहेत.

**1 ) शैक्षणिक सक्षमीकरण :-**

सावित्रीबाई फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढुन या क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली आज मुलगी शिकली की दोन कुटुंबे सुशिक्षीत होतातः शिक्षणाने स्त्रीला नाहीं म्हणण्याचे बळ मिळते आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची समज येते.

**(2) आर्थीक सक्षमीकरण –**

हातात पैसा आला की स्त्रीला स्वाभिमानाने जगता येते, नोकरी, स्वयंरोजगार, बचत यामधुन ती आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बन I M F च्या अहवालानुसार, महिला जर पुरुषांच्या बरोबरीने काम करू लागल्या तर देशाचा GDP 27% ने वाढु शकतो.

**3) राजकीय सक्षमीकरण :-**

पंचायत ते संसद, सर्व स्तरावर महिलांना 33% ते 50% आरक्षण देऊन त्यांना निर्णय प्रक्रीयेत सहभागी करून घेणे गरजेचे आहे. इंदिरा गांधी, प्रतिभाताई पाटील, निर्मला सीतारामन यांनी हे सिदध केले आहे की नेतृत्व क्षमता स्त्रीकडेही आहे.

**4) सामाजिक सक्षमीकरण ..**

हुडांबळी, बालविवाह, स्त्रीभ्रूण हत्या, घरगुती हिंसा या सामाजिक कुप्रथांपासून महीलांची मुक्तता करणे लेक वाचवा, लेक शिकवा सारख्या योजना याचसाठी आहेत.

**5) मानसिक सक्षमीकरण**

हा सर्वात महत्वाचा पैलु, 'तु' मूलगी आहेस' हे तु करू शकत नाहीस हा मानसिक अडसर तोडुन तिच्यात आत्मविश्वास निर्माण करणे.

**सक्षमीकरणाची आवश्यकता का ?**

महाभारतात द्रौपदीचे वस्त्रहरण झाले तेव्हा सगळे गप्प होते. आजही एखादया निर्भयावर अत्याचार होतो तेव्हा समाज हळहळतो. पण फक्त हळहळून चालणार नाही. गप्प बसणे हा अन्यायाला दिलेला पाठिंबाच असतो. म्हणूनच महिला सक्षमीकरण काळाची गरज आहे. जोपर्यंत समाजातील शेवटची स्त्री सुरक्षित आणि स्वावलंबी होत नाही.. तोपर्यंत सावित्रीबाई फुलेंची लढाई संपलेली नाही.

समाज समृध्द होण्यासाठी महिला सक्षम असणे गरजेचे आहे- महिला सक्षम झाली म्हणजे संपूर्ण घटकांचा विकास होतो.

म्हणून प्रत्येक क्षेत्रात जर महिलांचा विकास झाला. ती अबला न रहाता सबला बनली तर समाज समृध्द होईल. यासाठीच महिला सक्षमीकरण गरजेचे आहे,

**महिला सक्षमीकरण कविता.**

**मी अबला नाही.... मी 'आग' आहे !**

मला 'नाजुक कळी म्हणून जपु नका,
मी तर वादळातही डोलणारी 'पालवी आहे.
माझ्या डोळ्यात पाणी 'अश्रु 'समजू नका,
ते तर अन्याय जाळणारी चिंगारी आहे.

चूल मला वर्ज्य नाही, पण कैदही मान्य नाही,
पोळी लाटता - लाटता, मी पॉलिसी ही बनवेन.
मुलाला अंगाईगीत म्हणता - म्हणता
मी जगाला माझ्या कृतृत्वाचे गीत ऐकवेन.

इतिहासाची पाने पलटा जरा,
'झाशीची राणी'तलवार घेऊन लढली होती.
आजची मी लॅपटॉप घेऊन लढते आहे.
रणभुमी बदलली, पण रणरागिनी तीच आहे.

माझ्या साडीचा पदर, माझी कमजोरी नाही,
त्यात मी माझी स्वप्ने बांधुन ठेवली आहेतः
उंच टाचांची सँडल घालुन मी चालते.
कारण मला माहीत आहे, पडले तरी मीच उठणार आहे.

मला लेक' म्हणून 'परकं धन' ठरवू नका,
मी तर दोन कुळांचा 'मान' वाढवणारी आहे.
माझ्या हातात मेंदीसोबत,
माझ्या नशिबाची रेषाही माझ्याच हाती आहे.

बस्स साली बंधन, बस्स झाले नियम,
आता मी माझे 'संविधान 'स्वतः लिहीणार-
"बेटी बचाओ' च्या पुढे जाऊन आता,
'बेटी पे भरोसा करों चा नारा मी देणार.

कारण मी आता फक्त 'आई, बहीण, पत्नी 'नाही,
मी 'CEO'आहे, मी सैनिक आहे, मी पायलट
मी 'अबला' या शब्दाची व्याख्या बदलणारी,
या युगाची 'सबला..... होय, मीच ती आहे!

**महिला सक्षमीकरण - चारोळी संग्रह**.

अबला म्हणून हिणवु नका तिला,
ती तर काळाची दुर्गा आहे.
संधी दया एकदा उडायला,
बघा आभाळही तिच्यापुढे ठेंगणं आहे.
लेक शिकली, घर शिकंतं,
लेक कमावती, घर हसतं.
लेकीच्या हाती जेव्हा पैसा येतो,
तेव्हाच खरा सक्षमीकरणाचा दिवा पेटतोः
चुल आणि मुल ही शिकत शान,
पण जग जिकंण हाही तिचा मानः
संसार आणि करिअर, दोन्ही ती लीलया करते,
म्हणुनच तर तिला 'सुपरवुमन' म्हणतेः

बंदिस्त नको तिला., मोकळं आकाश दया,
बेड्या नकोत, विश्वासाचा वारा दया.
पालवी फुटेल तेव्हाच तिची खरी,
जेव्हा समाज म्हणेल, उड पोरी, उडः!"
सावित्रीच्या ज्योतीने पेटली मशाल,
जिजाऊच्या शिकवणीने घडला इतिहास
आजची 'ती' लॅपटॉप घेऊन लढते;
हाच सक्षमीकरणाचा नवा अध्याय आहे.

## शिक्षित स्त्री, सुरक्षित घर, सक्षम देश !!

**ज्योती अकोलकर**
**T. Y. B.A.**

नारी आहे अबला नाही
युगायुगाची शान ती
आहे सक्षम होत सफल
आहे दैवी वरदान ती

अस म्हणता आज महिला सक्षमीकर उपाययोजना करण्याची गरज आहे. भारतातील निरक्षर लोकसंख्येमध्ये महिलांचा समावेश आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना शिक्षित करणे तसेच त्यांना त्यांच्या देश, समाज आणि कुटुंबाशी संबंधित निर्णय घेण्यास सक्षण बनवणे.

भारत समाज आणि कुटुंबाच्या उज्वल भविष्यासाठी महिला सक्षमीकरणाची गरज आहे. महिला सक्षमीकरण महिलांच्या त्यांच्या वैयक्तिक विकासासाठी तसेच सामाजिक विकासासाठी स्वतःचे निर्णय घेण्याचे अधिकार देतेः - महिला हा समाजाचा कणा आहे, म्हणूनच बालपणापासून समाज विकास होणे आवश्यक आहे.

घडविण्यास राष्ट्राचा विकास,
मुलींच्या शिक्षणांचा हवा ध्यास..

महिलांना जागरुक करण्यासाठी आणि यांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरूक करण्यासाठी अनेक जागरूकता कार्यक्रम चालवले जातात, त्याचबरोबर समाजात होणाऱ्या अत्या-चारांपासून स्त्रियांचे संरक्षण करण्यासाठी अनेक कायदे देखील करण्यात आले आहेत. "आंतरराष्ट्रीय महिला दिन, * मदर्स डे' दरवर्षी साजरा केला जातो. महिला सक्षमीकरता आहे की महिलांना त्यांच्या

हक्कांची जाणीव करून देणे आज भारत हा स्त्री शिक्षणात नित्य प्रगती करीत आहे. भारताचा इतिहास अनेक शूरवीर महिलांनी भरलेला आहे. घरातील चुली पासून बाहेर निघुन व्यवसाय, साहित्य, प्रशासन; पोलीस, सैन्य इत्यादी क्षेत्रामध्ये महिला पुढे आल्या आहेत.

एका सभ्य्आणि सुशिक्षित समाजाचे निर्माण त्या देशातील शिक्षित नागरिकांमुळे होतेः एका पुरुषाला शिक्षित केल्याने एकच व्यक्ती शिक्षित होते. स्त्री कुटुंबाचा केंद्रबिंदु असते. ती आईच्या रुपात आपल्या मुलाना संस्कार देते.,आर्थिक प्रगतीसाठी पुरुषांसोबत स्त्रियांनाही शिक्षित करणे महत्वाचे आहे.

भारतात विशेष करून् शहरी भागात स्त्रियां पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत, आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया कार्यरत आहेत: परंतु आजही जर आपण भारताची तुलना इतर विकसित देशांशी केली तर आपल्या लक्षात येईल की महिलांना शिक्षित करण्यात आपण किती मागे आहोत. शिक्षण आयुष्यात खूप महत्वाचे आहे शिक्षणाने बुद्धीचा विकास होतो. आणि सोबतच ज्ञान देखील वाढते. खरे पाहता शिक्षण हेच मुर्खाला विद्वान बनवते.

सुख समृद्धीचा एकच झरा
शिक्षच हाच मार्ग खरा....

जरी आज प्रत्येक गावागावात शिक्षण पोहोचले आहे, तरिही देशांतील काही ठिकाण असेही आहेत जेथे स्त्रियांना शिकवणे व्यर्थ मानले जाते, अशिक्षित महिलेपेक्षा एक शिक्षित महिला तिच्या मुलांमध्ये चांगल्या गुणांचा संचार करते. अशा पद्धतीने एका शिक्षित महिला संपूर्ण एक कुटुंब आणि समाजाला शिक्षित करते म्हणून शिक्षणाचा अधिकाधिक लक्ष द्यायला हवे. असे मला वाटते.

वार नाही तलवार आहे,
ती रामशेरीची धार आहे.
स्त्री म्हणजे अबला नाही,
ती तर धगधगता अंगार आहे."



८ मार्च १९०८ मध्ये न्यूयॉर्कमध्ये कपड्याच्या कारखान्यात काम करत असलेल्या महिलांनी काम जास्त पण मजुरी कमी या कारणाने लढा पुकारला. स्त्रीयांनी संघटित होऊन स्वतःचा अधिकार मागण्यासाठीच केलेला संघर्ष हा जगातील पहिला संघर्ष त्यामुळे महिलांचा सन्मान करणे प्रत्येकाचे कर्तव्् आहे. महिला घरची कामे सांभाळित मोबाइलवर ऑनलाइन शिक्षण प्राप्त करित आहेतः देशाच्या उज्वल भवितव्यासाठी स्त्रियांचे शिक्षण अती महत्वाची बाब आहे आणि सोबतच नवनवीन गोष्टी सामील होणे गरजेचे आहे. जुन्या शिक्षण पद्धतीत करून् बदल करून टेनिस चॅम्पियनशिप आणि आशियाई लॉन टेनिस चॅम्पियनशिप जिंकली होती.

**नारीचा सन्मान, समाजाचा स्वाभिमान!**

- **प्रत्येक मुलगी शिकली तर देश पुढे निघाला!**
- **स्त्री आहे परिवर्तनाची खरी प्रेरणा!**
- **महिलांचा आत्मविश्वास, राष्ट्राच्या प्रगतीचा पाया!**
- **महिलांना अधिकार द्या, विकासाला वेग द्या!**

# किरण बेदी

पाखरे प्रेरणा
SYBA

किरण बेदी यांचा जन्म 9 जुन 1949 रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला त्यांच्या पतीचे नाव ब्रीज बेदी असून त्यांना सैना नावाची एक मुलगी आहे. अमृतसरच्या गर्व्हनमेंट कॉलेज फॉर वुमन येथून त्यांनी कला शाखेची पदवी घेतली. त्यानंतर चंदिगड येथील पंजाब विद्यापिठातून सोशल सायंसमध्ये मास्टर्स पूर्ण केले. 1988 मध्ये दिल्ली विद्यापिठातून कायद्याची पदवी घेतली. त्यानंतर सोशल सायंसमध्ये डॉक्टरेट मिळवली. यावेळी त्यांचा विषय 'ड्रग्ज, अब्युज ॲण्ड डोमॅस्टीक व्हायलंस' हा होता.

यावेळी त्यांनी राजकीय दबावापुढे जराही माघार घेतली नाही. एक कठोर पोलिस अधिकारी अशी त्यांची ख्याती होती. तिहार तुरुंगात अधिकारी असतानाही त्यांनी अनेक योजना यशस्वीपणे राबवून दाखविल्या.

**भारताच्या पहिल्या महिला IPS**

प्रोफेसर म्हणून करिअरची सुरवात करणाऱ्या किरण बेदींनी पहिल्या महिला आयपीएस होऊन शिस्तबद्धपणे कायदा आणि सुव्यवस्था राबवून दाखविली होती.

**नारीशक्ती जागली, प्रगतीची पहाट उगवली!**

- **महिलांचे शिक्षण, समाजाचे भूषण!**
- **सुरक्षित महिला, समृद्ध भारत!**
- **स्त्रीचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान!**
- **महिलांच्या प्रगतीतच देशाची प्रगती!**
- **महिला सक्षम, भविष्य उज्ज्वल!**
- **नारीला द्या बळ, समाज होईल सबळ!**
- **महिला सक्षमीकरण—समतेचा पाया!**
- **शिका, उभारा, पुढे चला—महिलाच देशाची खरी शक्ती!**

## नारीशक्तीचा जयघोष

कांचन केदार
TYBA

ती देवी, ती शक्ती, तीच सृष्टीचा आधार,
आता नको कोणावरी तिने राहावे अवलंबून,
शिक्षित होऊन उभी राहील ती आता,
स्वप्नांना तिच्या पंख देऊनी उडेल गगनातून.
ती आहे आधुनिक, ती आहे स्वतंत्र !

उंबरा ओलांडून ती निघते घराबाहेर,
घरासह सांभाळते ती आता बाहेरचे जग,
नको आता बंधने, नको कसली भीती,
तलवारीची तिची बुध्दी, तीच प्ररगतीची रीत,
ती आहे स्वावलंबी, ती आहे शक्ती

कलम हाती घेऊन ती इतिहास घडवेल
अन्यायाविरूध्द आता ती आवाज उठवले,
स्त्री सक्षमीकरणाचा हाच खरा अर्थ,
ती सक्षम, ती समर्थ !

### महिला शक्ती

तिच्या हाती विश्व सारे, तीच शक्ती, तीच गती,
संकटांशी झुंजणारी, तीच आता महाशक्ती.
नकोच अबला समजून, तीच आधार घराचा,
नवनिर्माणाची मशाल, तीच ध्यास प्रगतीचा.

शिक्षण, आरोग्य, सुरक्षा, अधिकार हक्क तिचे,
उंच झेप घेईल ती, तोडून पाश जुने सारे.
महिला सक्षमीकरण हाच ध्यास,
हाच संकल्प, समृद्ध भारतासाठी,
तीच आता मुख्य शिल्प.

प्रतिक्षा पवार
"F.Y.B.A

**स्त्रीचा आत्मसन्मान, समाजाचा स्वाभिमान!**

- **नारीला द्या शिक्षण, घडेल सशक्त राष्ट्र!**
- **महिलांचा सन्मान, देशाची ओळख महान!**
- **स्वावलंबी महिला, आत्मनिर्भर भारत!**
- **नारीशक्तीचा गौरव, राष्ट्राच्या प्रगतीचा उत्सव!**

## महिला सक्षमीकरणावर आधारित प्रेरणादायी चारोळ्याः

### १. नवीन पहाट

नारी आता अबला नाही, ती आहे शक्तीची महाकाली,

ज्ञानाच्या प्रकाशात तिने, अन्धकाराला दूर सारली.

सशक्त नारी घडवेल, आता प्रगत सुशिक्षित समाज,

अन्यायाविरुद्ध उभी राहून, गाजवतेय ती आपला बाज.

### २. उड्डाण

मी सुद्धा स्पर्श शकते आकाश, फक्त संधी मिळायचा अवकाश,

अडथळ्यांना करून दूर, घेते मी उंच भरारीचा ध्यास.

घर आणि बाहेर समतोल, राखते मी जबाबदारी,

नारी तू घे अशी भरारी, फिरून पाहू नकोस माघारी,

### ३. शक्तीस्वरूपा

नारी तू प्रेमाची मूर्ती, तूच सृष्टीचा आधार,

तुझ्या विना अपूर्ण आहे, या जगाचा व्यापार.

शिक्षण आणि आत्मविश्वास, हेच तुझे खरे अलंकार,

घरादाराला देई दिशा, तूच कर्तृत्वाचा संसार.

### ४. आजची नारी

पुरुषांच्या खांद्यास खांदा, लावून लढते ती लढाई.

मैदानापासून ते अवकाशापर्यंत, सर्वत्र तिचीच घाई.

स्त्रीला नका समजू अबला, सक्षमीकरणाने ती झाली सबला,

ओळखली आहे तिने तिची शक्ती, साऱ्या विश्वाला नमन त्या ला.

### ५. ध्येय

जबाबदारी सकट घेते भरारी, तक्रार नाही की थकवा नाही,

सशक्त नारी, सुशिक्षित नारी, आता प्रगती थांबणार नाही.

## महिला सक्षमीकरण—नव्या युगाची ओळख!

- **प्रत्येक मुलगी सक्षम, प्रत्येक घर आनंदी!**
- **महिलांना संधी, समाजाला समृद्धी**

## महिला सक्षमीकरणाचे महत्त्वः

जाधव हर्षल
TYBA

महिला सक्षमीकरण अनेक कारणांसाठी महत्त्वाचे आहे. त्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश आहे.

**लिंग समानताः** लिंग समानता हा एक मूलभूत मानवाधिकार असल्याने, ती साध्य करण्यासाठी महिला सक्षमीकरण अत्यावश्यक आहे. लिंग समानतेचा अर्थ असा आहे की, स्त्रिया आणि पुरुषांना समान हक्क, संधी आणि संसाधने मिळावीत आणि ते जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये समानतेने सहभागी होऊ शकतील.

**आर्थिक वाढः** आर्थिक वाढ आणि विकासासाठी महिला सक्षमीकरण देखील महत्त्वाचे आहे. जेव्हा महिलांना शिक्षण, रोजगार आणि इतर संधींमध्ये समान प्रवेश मिळतो, तेव्हा त्या संपूर्ण अर्थव्यवस्थेत आणि समाजात अधिक चांगल्या प्रकारे योगदान देऊ शकतात.

**सामाजिक न्यायः** सामाजिक न्याय मिळवण्यासाठी महिला सक्षमीकरण देखील आवश्यक आहे. केवळ स्त्री असल्यामुळे महिला आणि मुलींना अनेकदा भेदभाव, हिंसाचार आणि इतर प्रकारच्या शोषणाला सामोरे जावे लागते. महिला सक्षमीकरणामुळे सर्वांसाठी अधिक न्याय्य आणि समान समाज निर्माण होण्यास मदत होते.

**आरोग्य आणि कल्याणः** आरोग्य आणि कल्याणाला चालना देण्यासाठी महिला सक्षमीकरण देखील महत्त्वाचे आहे. जेव्हा महिलांना शिक्षण आणि आरोग्यसेवा उपलब्ध होते, तेव्हा त्या स्वतःची आणि त्यांच्या कुटुंबाची अधिक चांगल्या प्रकारे काळजी घेऊ शकतात.

**शाश्वत विकासः** शाश्वत विकास साधण्यासाठी महिला सक्षमीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. जेव्हा महिला सक्षम होतात, तेव्हा त्या पर्यावरणीय आव्हानांना सामोरे जाणे, गरिबी कमी करणे आणि सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांमध्ये अधिक चांगल्या प्रकारे योगदान देऊ शकतात. थोडक्यात, एक न्यायी, समान आणि शाश्व्त जग साकार करण्यासाठी महिला सक्षमीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे.

**नारीशक्तीचा विजय, विकासाचा उदय!**

- **समानतेकडे वाटचाल, महिलांचा सन्मान कायम!**

## महिला सक्षमीकरणास प्रोत्साहन देणारे घटकः

ज्योती माळगावकर
TYBA

**शिक्षणः** महिला सक्षमीकरणामध्ये शिक्षण हा एक महत्त्वाचा घटक आहे, कारण ते त्यांना माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी, समाजात सहभागी होण्यासाठी आणि त्यांची ध्येये साध्य करण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान, कौशल्ये आणि साधने प्रदान करते.

**रोजगाराच्या संधीः** रोजगार आणि उद्योजकतेच्या संधींमुळे महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊ शकतात, ज्यामुळे त्यांना त्यांच्या जीवनाबद्दल निर्णय घेण्याची आणि त्यांच्या समाजासाठी योगदान देण्याची क्षमता मिळते.

**राजकारण, संरक्षण, क्रीडा आणि खेळांमधील सहभागः** राजकारण, संरक्षण, क्रीडा आणि खेळांसह विविध क्षेत्रांमध्ये महिलांचा सहभाग लिंगभेदावर आधारित रूढ कल्पना मोडून काढू शकतो, महिलांना नेतृत्व भूमिका स्वीकारण्यासाठी सक्षम करू शकतो आणि लिंग-आधारित भेदभावाला आव्हान देऊ शकतो.

**समाजात समान संधीः** शिक्षण, रोजगार आणि नेतृत्व पदे यांसारख्या समाजाच्या सर्व पैलूंमध्ये महिलांना समान संधी सुनिश्चित केल्याने लैंगिक समानता वाढू शकते आणि महिलांना समाजात पूर्णपणे सहभागी होण्यासाठी सक्षम करता येते.

**माध्यमांशी संपर्कः** माध्यमे आणि माहिती उपलब्ध झाल्यामुळे महिलांना महत्त्वाच्या विषयांविषयी माहिती ठेवण्यासाठी, त्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवण्यासाठी आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आवश्यक साधने मिळू शकतात.

**अभिव्यक्ती स्वातंत्र्यः** महिलांना भेदभावाच्या किंवा प्रतिशोधाच्या भीतीशिवाय मुक्तपणे स्वतःला व्यक्त करता येणे, हे त्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि समाजात सहभागी होण्यासाठी अत्यावश्यक आहे.

**मुक्त संचारः** महिलांचे मुक्त संचार, ज्यामध्ये प्रवास करण्याची, काम करण्याची आणि सामुदायिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची क्षमता समाविष्ट आहे, हे त्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि समाजात त्यांच्या सहभागासाठी महत्त्वाचे आहे.

**योग्य पोषण आणि स्वच्छताः** महिलांच्या आरोग्यासाठी आणि कल्याणासाठी योग्य पोषण आणि स्वच्छतेची उपलब्धता अत्यंत महत्त्वाची आहे, ज्यामुळे त्या समाजात पूर्णपणे सहभागी होऊ शकतात आणि आपली ध्येये साध्य करू शकतात.

**निर्णय घेण्याचा अधिकारः** महिलांना त्यांच्या आरोग्य, शिक्षण आणि करिअरसह स्वतःच्या जीवनाविषयी निर्णय घेण्याचे सामर्थ्य देणे, हे त्यांच्या सक्षमीकरणासाठी आणि समाजात त्यांच्या सहभागासाठी आवश्यक आहे.

**स्वयंसहायता गटांचा परिचयः** स्वयंसहायता गटांच्या स्थापनेमुळे महिलांना त्यांची ध्येये साध्य करण्यासाठी आणि लिंग-आधारित भेदभावाला आव्हान देण्यासाठी एक आधारभूत जाळे व संसाधने मिळू शकतात.

**महिलांच्या श्रम पद्धतींमधील बदल :** महिलांच्या श्रम पद्धतीमधील बदल, ज्यामध्ये महिलांच्या विनामोबदला केल्या जाणाऱ्या काळजीच्या कामाला मान्यता देणे आणि त्याला पाठिंबा देणे यांचा समावेश आहे, लैंगिक समानता वाढवण्यासाठी आणि महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी मदत करू शकतात.

## शिक्षणाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण

**योगिता परबळकर**
**TYBA**

शिक्षणाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण म्हणजे मुली आणि महिलांना समाजात पूर्णपणे सहभागी होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनाबद्दल माहितीपूर्ण निर्णय घेण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये आणि आत्मविश्वास प्रदान करण्याची प्रक्रिया होय. शिक्षण हे महिलांना सक्षम करण्यासाठी सर्वात शक्तिशाली साधनांपैकी एक आहे, कारण ते त्यांना असे ज्ञान, कौशल्ये आणि आत्मविश्वास मिळविण्यात मदत करू शकते, जे त्यांना त्यांचे स्वतःचे, त्यांच्या कुटुंबाचे आणि समाजाचे जीवन सुधारण्यास मदत करते. आर्थिक सक्षमीकरण, आरोग्य आणि कल्याण, राजकीय सहभाग आणि सामाजिक सक्षमीकरण हे काही मार्ग आहेत ज्याद्वारे शिक्षण महिलांना सक्षम करण्यास मदत करू शकते.

एकंदरीत, लैंगिक समानता साधण्यासाठी आणि महिलांना त्यांची पूर्ण क्षमता साकारण्यासाठी सक्षम बनवण्यासाठी महिलांचे शिक्षण अत्यावश्यक आहे. मुलींच्या शिक्षणात गुंतवणूक करून, आपण सर्वासाठी एक अधिक न्याय्य आणि समान जग निर्माण करू शकतो.

**ओमकार नाडीमेटला**
**SYBCOM**

अज्ञानाच्या अंधारात
ज्योत ज्ञानाची पेटवली
स्त्रियांच्या आयुष्यात त्यांनी
नव्या आशेचा किरणे आणली.

दगड चिखल सहन करूनही
त्या कधीच मागे फिरल्या नाहीत
शिक्षणाचा अधिकार मिळवण्यासाठी
त्या सतत पुढेच चालत राहिल्या होत्या
त्यांच्या पावलांवर चालून
आज लाखो मुली शिकत आहेत,
स्वतःच्या स्वप्नांना पूर्ण करत
नवीन इतिहास घडवत आहेत.

त्या फक्त एक शिक्षिका नव्हत्या.
त्या समाज बदलणा-या शक्ती होत्या,
सावित्रीबाई फुले म्हणजे
स्त्री सन्मानाची ओळख होत्या.
आजही त्यांचे कार्य सांगते
लढा अन्यायाविरुद्ध द्यावा,
महिला सक्षमी करणासाठी
प्रत्येकाने पुढे यावा.

# सावित्री

माळवे प्रिती
SYB.COM (CA)

हातात पुस्तक, मनात धैर्य
समाजाशी घेतला सामाना...
दगड- चिखाल सहन करूनहि
सोडला नाही शिक्षणाचा धागा..

पहिली शिक्षिका भारताची
ज्ञानाधा दीप लावणारी...
स्त्रीला दिला नवा ध्यास
स्वाभिमानाने जगण्यासाठी.

आजही तिच्या कार्याची छाया
आपल्या जीवनात दिसते..
सावित्रीबाईचा मार्गावर चालून
स्त्री शक्ती पुढे जाते.....

**प्रतिक्षा गणेश लवांडे**
**SYBA**



**घोडे अनुष्का गंगाराम**
**"F.Y.B.A**

ज्ञानाची ज्योत पेटवणारी,
स्त्रीशिक्षणाची माय ।
अंधारातून प्रकाश देणारी
सावित्रीबाई महान ॥

हाती पुस्तक डोळ्यात स्वप्न
शिक्षणाचा दिला मंत्र ।
अन्यायाशी लढत राहून,
उजळविला समाजकेंद्र ।।

दगड कधी चिखल सहन करून
कधी न मानी हार
मुलींना दिले शिक्षण
केला जीवनाचा उध्दार ॥

मायेसारखी प्रेमळ होती
धैर्य तिचे अफाट ।
समानतेचा संदेश देत
केली समाजाची वाटा

सवित्रिबाई कार्य महान
भारताचा अभिमान
त्यांच्या आदर्शाने चालू या
हेच त्यांना वदन

## सावित्रीबाई फुले

प्रियंका सुधिर रणभिस
SY. BA

**सावित्रीबाई फुले :-**

३ जानेवारी १८३१-१० मार्च १८९५ भारतातील पहिल्या शिक्षिका भारतीय स्त्रीमुक्त चळवळीच्या प्रणेत्या होत्या त्या भारतातील पहिल्या महिला शिक्षकांपैकी एक होत्या आणि त्यांनी त्यांचे पती ज्योतिराव फुले यांच्यासोबत मुलींसाठी शाळा उघडल्या सामाजिक समानतेला प्रोत्साहन देण्यासाठी ज्योतिराव फुले यांनी १८७३ मध्ये स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजातही त्यांनी महत्त्वाची भुमिका बजावली फुले दांपत्याने मिळून जातीय उतरंड आणि भेदभावाला आव्हान दिले. सावित्रीबाई फुले यांना भारतातील महिला सक्षमीकरण आणि स्त्रीवादासाठी आदर्श म्हणून अनेकदा ओळखले जाते.

**बालपन :-**

फुले यांचा जन्म नायगाव येथे झाला नवव्या वर्षी त्या काळातील प्रथेप्रमाणे नवव्या वर्षी त्यांचा विवाह ज्योतिराव फुले त्याच्यासोबत आणि त्या त्याच्यासोबत झाला आपल्या पत्नीच्या शिकण्याच्या जबाबदारी जोतीरावांचे मित्र सखाराम परांजपे आणि केशव शिवराम भवळकर यांनी घेतली.

त्यांनी तीला वाचायला व लिहायला शिकवले त्यांनंतर सावित्रीबाई फुले यांनी अहमदनगर आणि पूणे येथील ख्रिश्चन मिशनऱ्यांनी चालवलेल्या संस्थांमध्ये शिक्षणतज्ज्ञ होण्याचे प्रशिक्षण घेतले. त्या 1847 मध्ये एक पात्र शिक्षिका बनल्या.

**शिक्षण आणि सामाजिक सक्षमीकरण क्षेत्रात काम**

१८४८ मध्ये ज्योतिराव आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भिडेवाडा येथे मुलींसाठी शाळा सुरु केली. अग्रगण्य शाळा सुरु व्याच्या पहिल्या १८४९ मध्ये प्रौढांसाठी एक शाळा सुरू केली. आणि सर्व जातीतील विदयार्थ्यांना प्रवेश दिला. त्यांच्या कार्याला समाजातील विविध स्तरांकडून मोठ्या प्रमाणावर विरोध झाला. ज्यांना जातीय व्यवस्थेत कोणताही बदल नको होता. शाळेत शिवीगाळ, दगड, चिखल जाताना त्यांना अनेकदा केली जात असे आणि त्यांच्यावर शेण फेकले जात असे त्यामुळे त्यांनी शाळेत बदलण्यासाठी एक अतिरिकत साडी सोबत ठेवण्यास सुरुवात केली.

**महिला सुरक्षित, समाज विकसित!**

- **स्त्रीच्या स्वप्नांना द्या नवे पंख!**

त्यांच्या कार्यामुळे प्रेरित होऊन १८७५ साली पंढरपुरला तेथील दुय्यम न्यायधीश लालशंकर उमियाशंकर यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली.

समता, स्वातंत्र आणि विवेकनिष्ठा या तत्वांवर आधारित नवा आधुनिक समाज निर्माण करण्याचे ज्योतीरावांचे ध्येय होते. त्यासाठी 28 सप्टेंबर १८७३ रोजी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. अशा सर्वच कार्यात सावितीबाईंना खंबीर पणे त्यांनी साथ दिली. सत्यशोधक जलसे साहित्य अशा विविध माध्यमांतून त्यांनी या चळवळीचे लोण महाराष्ट्रात भाषणे वृत्तपत्त जनजागृती केली. हुंडा न देता साध्या पध्दतीने विवाह करण्याचा पर्याय. समाजाला दिला. सावित्रीबाई मैत्रीण बजुबाई ज्ञानोबा निंबणकर यांची कन्या राधा आणि सत्यशोधक कार्यकर्ते सीताराम जवाजी आल्हाट यांचा अशा पध्दतीचा पहिला विवाह सावित्रीबाईंनी स्वखर्चाने घडवून आणला या विवाहामुळे त्यांना अनेक खटल्यांना सामोरे जावे लागले 4 फेब्रुवारी 1889 साली त्यांचे पुत्र यशवंत आणि सत्यशोधक समाजाचे नेते ग्यानोबा ससाणे यांची कन्या राधा उर्फ लक्ष्मी यांचा विवाहही याच पध्दतीने संपन्न झाला हा आंतरजातीय विवाह होता विधवांचे केशवपन ही त्या काळातील एक दुष्ट प्रथा होती ज्योतीरावांचे सहकारी आणि दीनबंधुचे संपादक नारायण मेघाजी लोखंडे यांनी नाभिकांना एकत्र आणले आणि त्यांना विधवावे केशवपन न करण्याचे आवाहन केले याला प्रतिसाद देवून सुमारे एक हजार नाभिकांनी संप केला या आंदोलनाला सावित्रीबाईची प्रेरणा होती. याचा वृत्तांत लंडनच्या दि टाईम्स वृत्तपत्रात 9 एप्रिल 1890 च्या अंकात छापून आला तसेच इंग्लंडमधील सुधारक चळवळीतील स्त्रियांनी त्यांना अभिनंदनाचे पत्रही पाठवले.

28 नोव्हेंबर 1890 रोजी जोतीरावांचा मृत्यु झाला त्यांचे अत्यंसंस्कार करण्यास यशवंत या त्यांच्या दत्तकपुत्रास नातेवाईकांनी विरोध केला तेव्हा सावित्रीबाईंनी न डगमगता जोतीरावांच्या पार्थिवाला अग्नी दिला हे एक क्रांतीकारक पाऊल होते ज्योतीरावानंतर सावित्रीबाईंनी सत्यशोधक चळवळीची धुरा आपल्या खांद्यावर घेतली आणि ती अखेरपर्यंत सांभाळली 1893 साली सासवड येथे झालेल्या सत्यशोधक परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भुषविले.

1876-77 आणि 1986 या काळात महाराष्ट्रात भयंकर दुष्काळ पडला होता. त्या वेळी सावित्रीबाईंनी गोरगरीबांना खुप मदत केली. सत्यशोधक समाजाद्वारे ठिकठिकाणी अन्नछत्रे उघडून मुलामुलींची भोजनाची व्यवस्था त्यांनी केली 1897 पासून पुण्यात प्लेगची साथ आली तेव्हा मृत्यूला न घाबरता सावित्रीबाईनी प्लेगबाधित रूग्णांची सेवाशुश्रुषा केली पण अखेर त्यांना प्लेगची

बाधा होवून त्यांचे दुर्देवी निधन झाले.

त्यांच्या शाळांमध्ये सर्व जातीच्या मुलामुलींना प्रवेश होता. त्याच्या शाळेतील मातंग मुक्ता साळवे या १४ वर्षीय मुलीने लिहिलेला मांग महारांच्या दुःखाविषयी निबंध फेब्रु मार्च १८५५ हा लेख ज्ञानोदय वृत्तपक्षात प्रकाशित झाला. ज्यात तिने जातीनिहाय स्त्रीविषयक भीषण वास्त्व कसे वेगळे असते तेही त्यातून मांडले या निबंधाचे महत्वलक्षात घेवून शासनाने तो मुंबई प्रांताच्या शैक्षणिक अहवालामध्ये छापला फुले दांपत्याने पुण्यामध्ये 1856 साली पहिले दिशा ग्रंथालय सुरू केले. फुले दांपत्याच्या विचारांनी प्रभावित झालेल्या ताराबाई शिंदे यांनी 1882 साली स्त्री पुरूष तुलना या ग्रंथातून स्त्रियांची शोचनिय परिस्थिती मांडली यावरून फुले दांपत्याच्या शाळाद्वारे स्त्रीवर्गात होवू लागलेल्या जागृतीची कल्पना येऊ शकते. आधुनिक महाराष्ट्रातील स्त्रीची जडणघडण होण्यास मदत झाली.

1863 साली जोतीराव – सावित्रीबाईनी गंजपेठेतील राहत्या घरात विधवा स्त्रियांच्या समस्या लक्षात घेवून बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली 1884 पर्यंत अनेक भागांतून सु.35 असहाय स्त्रिया तेथे आल्या अशा स्त्रियांची बाळंतपणे सावित्रीबाई स्वत: करीत त्यातीलच एका काशिबाई नावाच्या ब्राम्हण विधवेचा यशवंत नामक मुलगा फुले दांपत्याने दत्तक घेतला.

सावित्रीबाई या एक प्रतिभासंपन्न कवयित्री होत्या ज्योतीरावांसारख्या सुधारक पतीची सोबत प्रबोधनातील नवविचारांचे संस्कार आणि आंदोलनातील अनुभव यामुळे त्यांच्यातील काव्यगुण बहरुन आले मात्र दिर्घकाळ त्याचे साहित्यमहाराष्ट्राला ज्ञात नव्हते 1988 मध्ये अभ्यासक डॉ मा गो.माळी यांनी सावित्रीबाई फुले समग्र वाडमय या ग्रंथाद्वारे ते प्रकाशात आणलृे सावित्रीबाईच्या काव्फुले 1854 या काव्यसंग्रहात एकूण 41 कविता आहे. त्या स्थुलमानाने निसर्गविषयक सामाजिक आत्मपर, बोधपर आणि इतिहास विषयक अशा आहेत.

सावित्रीबाईच्यासाहित्यावर तीरावांच्या विचारांचा निश्चितपणे प्रभाव होता मात्र त्यांचे लिखाण ही एक स्वतंत्र अभिव्यक्ती आहे. त्यांच्या काव्यातून ज्योतीरावांविषयीचा आदरभाव स्त्री पुरूष नात्यातला समताभाव निसर्गसौंदर्य पाहून पुलकित होणारे उचंबळणारे स्त्रीमन अतिशय तरलपणे व्यक्त झाले आहेत त्यांचा मुळ पिंड समाजसुधारणावादी होता ज्ञानाची महती शिक्षणाचे महत्व मनुष्यत्वाचे सार अशा विषयांना वाहिलेल्या कविता त्यांनी प्राधान्याने लिहिल्या स्वागतपर पद्य हे स्वागतगीत किंवा बाहुलीसारख्या विषयावरील कविता त्यांनी शाळेतील विद्यार्थीनिंसाठी रचल्या असाव्यात लहान मुलींना घरकामाला जुंपता त्यांना शाळेत पाठवले पाहिजे हा विचार त्यांनी अधोरेखित केला ग्रामिण भागातील स्त्री शिक्षणाविषयीची उदासिनता पाहता हा विचार आजही किती लागू पडतो हे लक्षात घेण्याजोगे आहे.

## माझी मैत्रीण - माझी आई

स्वाती सुभाष लोमटे
S. Y. B.A.

आई हे नाव घेताच डोळ्यांसमोर प्रेम, माया, काळजी आणि त्याग यांचे सुंदर रूप उभे राहते प्रत्येकाच्या खूप आयुष्यात आईचे स्थान मोठे असते. ती आपल्या मुलांसाठी आयुष्यभर कष्ट करते, त्यांना चांगले संस्कार देते आणि प्रत्येक संकटात त्यांच्यासोबत खंबीरपणे उभी राहते. माझ्यासाठी माझी आई ही फक्त आई नसून नी माझी सर्वात जिवलग मैत्रीण आहे, म्हणूनच मला नेहमी वाटते. "माझी मैत्रीण म्हणजे माझी आई."

लहानपणापासून आईने माझ्यावर खूप प्रेम केले आहे. मी आजारी पडले की ती रात्रभर जागुन काळजी घेते. मला काही हवे असेल तर ती स्वत: च्या गरजाबाजूल ठेवून इच्छा पूर्ण करते. तिच्या डोळ्यांत नेहमी माझ्याविषयी प्रेम आणि काळजी दिसते. आईचे प्रेम हे जगातील सर्वात निस्वार्थ प्रेम असते. ती आपल्या मुलांसाठी कितीही त्याग करायला तयार असते.

माझी आई माझ्याशी अगदी मैत्रिणीसारखी वागते. मी असले की ती माझ्यासोबत आनंद साजरा करते आणि मी दुःखी असले की ती मला धीर देते.

माझ्या मनातील प्रत्येक गोष्ट मी तिला सांगू शकते. ती माझे म्हणणे शांतपणे ऐकते आणि योग्यसल्ला देते. त्यामुळे मला कधीच एकटे वाटत नाही. अनेक वेळा मित्र मैत्रिणींनाही सांगता येणार नाही अशा गोष्टी मी आईला सहज सांगू शकते.

आई मला फक्त प्रेमच देत नाही तर योग्य संस्कारही देते. ती मला प्रामाणिकपणा, मेहनत शिस्त आणि माणुसकी यांचे महत्व, , आदर , शिकवते. नेहमी चांगले वागावे, इतरांना मदत करावी आणि मोठ्यांचा आदर करावा हे ती सतत सांगत असते.

तिच्या शिकवणीमुळे माझ्या व्यक्तीमत्वात चांगले गुण निर्माण झाले आहेत

माझ्या अभ्यासातही आई माझी मोठी मदत करते. परीक्षा जवळ आल्या की अभ्यासासाठी ती प्रोत्साहन देते. माझ्या प्रत्येक यशात तिचा वाटा आहे. मी एखादी छोटी चांगली गोष्ट केली तरी तिच्या चेह-यावर आनंद दिसतो.

आई दिवसभर घरातील अनेक कामे करते, तरीही ती कधी थकत नाही असे वाटते. घरातील प्रत्येक व्यक्तीची काळजी घेणे, सर्वांच्या गरजा पूर्ण करणे आणि सगळ्यांना आनंदी ठेवणे हे ती प्रेमाने करते. तिच्या कष्टांची किंमत कोणत्याही पैशात... मोजता येणार नाही.

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक लोक आपल्या आईशी मनमोकळेपणाने बोलत नाहीत. पण मला वाटते की आई हीच खरी मैत्रीण असते.

आपल्या मुलांचे चांगले-वाईट ओळखते आणि नेहमी योग्य तो मार्ग दाखवते तिचे अनुभव आणि सल्ले आयुष्यात खूप उपयोगी पडतात. आईचे स्थान कोणालाही घेता येणार नाही. तिचे प्रेम, तिची साथ ही आपल्या आयुष्यभरासाठी असते. आपल्या मुलांच्या आनंदात आनंद मानने, आणि त्यांच्या दुःखात दुःखी होते. आईला म्हणूनच देवापेक्षाही मोठे स्थान दिले आहे. खरंच, माझी आई ही आयुष्यातील सर्वात सुंदर भेट आहे. ती माझी मार्गदर्शक आधार स्तंभ आणि मैत्रीण आहे तिच्याशिवाय माझे जीवन अपूर्ण आहे. म्हणून अभिमानाने म्हणावेसे वाटते -मला माझी मैत्रीण म्हणजे माझी आई."

सोहत्रे खुशी
"F.Y.B.A

**माझी आई माझी मैत्रीण**

प्रत्येकाच्या आयुष्यात आईचे स्थान खूप मोठे असते. आई म्हणजे मायेचा सागर, प्रेमाचा झरा आणि आपुलकीची सावली लहानपणापासून ती घेते आपल्या मुलांची काळजी त्यांना चांगले संस्कार देने आणि योग्य ते मार्ग दाखवते. फक्त आई आई नसून् माझी सर्वात जवळची मैत्तीण आहे. माझी आई खूप प्रेमळ आणि समजूतदार आहे. ती नेहमी माझ्या आनंदाचा विचार करते. मी शाळेतून किंवा कॉलेजमधून घरी आले की ती प्रेमाने माझी विचारपूस करते. माझा दिवस कसा गेला मला काही अडचण आली का, हे ती नेहमी विचारते.

मी माझ्या मनातील प्रत्येक गोष्ट आईला सांगते माझ्या आनंदाच्या क्षणी ती माझ्यासोबत आनंदी होते आणि धीर देते. दुःखाच्या वेळी मला एखादी गोष्ट शांतपणे समजावते. समजत नसेल किंवा मनात भिती असेल तर ती मला शांतपणे समजावतू तिच्या बोलण्यामुळे माझे मन हलके होते. त्यामुळे मला ती तिच्या बोलण्यामुळे माझे मन फक्त आई नाही तर खरी एक मैत्रीण वाटते. माझी आई खूप कष्टाळू आहे ती दिवसभर घरातील सर्व काम स्वतः करते. थकली असली तरी आमच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून खुश होते. तिचे प्रेम शब्दांत सांगता येणार नाही.

आई मला चांगले संस्कार देते. ती नेहमी बोलायला, मेहनत करायला आणि मोठ्यांचा आदर करायला शिकवते " चांगले बन " हे तिचे नेहमीचे शब्द आहेत. तिच्या शिकवणीमुळे मला आयुष्यात योग्य मार्गाने चालण्याची प्रेरणा मिळते.

माझ्या अभ्यासातही आई मला खूप मदत करते. परीक्षा आली की ती मला धीर देते आणि त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढवते. मी निराश झाले ती मला पुन्हा प्रयत्न करण्यास सांगते. तिच्या प्रोत्साहनामुळे मला नवीन उमेद मिळते.

खरंच, आईसारखी मैत्रीण दुसरी कोणीच असू शकत नाही. तिचे प्रेम निस्वार्थ असते आणि तिची साथ आयुष्यभराची असते. आईचे स्थान खूप मोठे आहे. आणि माझी आई, माझी सर्वात चांगली मैत्रीण आहे

मला माझ्या आईचा खूप अभिमान वाटतो. तिच्यामुळे माझे जीवन सुंदर, आनंदी आणि अर्थपूर्ण झाले आहे. अभिमानाने म्हणून मी नेहमी माझी आई हीच माझी खरी मैत्रीण आहे"

**माझी आई**

आई म्हणजे मायेचा सागर,
प्रेम तिचं खूपच सुंदर ।
माझ्या सुखासाठी झटते
दुःख माझे स्वतःवर घेते ।

मी रडले की धीर देते,
हसताना माझ्यासोबत हसते ।
माझ्या मनातील प्रत्येक गोष्ट,
समजून घेते ती खास ।

चुकले कधी माझे पाऊल
आई दाखवते योग्य मार्ग ।
संस्कारांची देते शिदोरी
प्रेम तिचे जगात भारी ।
आई माझी गोड परी,
तीच माझी खरी सखी ।

देवाकडे मागणे एकच आहे,
आईचे प्रेम सदैव माझ्यासोबत राहे।

**माझी आई - माझी मैत्रीण**
आई म्हणजे प्रेमाची सावली,
जीवनातील सुंदर कळी ।
माझ्या चेह-यावर हास्य पुलवते,
दुःख सारे दूर पळवते.

चुकले कृधी माझे पाऊल,
आई देते प्रेमाचा आधार
रागावते थोडी शिकवण्यासाठी
पुन्हा जवळ घेते समजावण्यासाठी

माझे गुपित तिलाच कळते.
मनातील भावना तीच ओळखते ।
आई नाही फक्त जननी
तीच माझी जिवलग मैत्रीणी।

थकली तरी हसत राहते
माझ्यासाठी जगत असते ।
आई नाही फक्त जननी,
तीच खरी माझी मैत्रीण ।

देवाकडे एकच मागणं,
आईचे प्रेम सदैव लाभणे ।,
जगात नाही कुणी तिच्यासारखे,
आईचे नाते खूप सुंदर असते ।
तिच्या मायेचा नाही अंत,
तिच्यामुळे जीवन सुंदर
देवापेक्षाही मोठी वाटते.
माझी आई मनात सदैव राहते.

आई माझी गोड सखी,
मायेची ती सुंदर राखी । दुःखामध्ये धीर देणारी,
आनंदात हसणारी ।

माझ्या मनातील प्रत्येक गोष्ट,
ऐकून घेते ती प्रेमाने खास ।
रागावते कधी चुकल्यावर,
पण प्रेम असते तिच्या शब्दांवर ।

**महिला सक्षम तर भारत बलवान!**

- **महिलांच्या यशातच राष्ट्राचा विकास!**

## महिला सक्षमीकरण

अनुश्री विक्रम कवडे.
S.Y.B.com

चूल आणि मूल, ही जुनी चौकट तिने मोडली शिक्षणाच्या पंखांनी, तिने नवी स्वप्ने जोडली. ती अबला नाही आता, ती तर एक ज्वाला आहे. स्वकर्तृत्वाने तिने, इतिहास नवा रचला आहे.

कधी ती सावित्री होऊन, अज्ञानाचा अंधार हरते, कधी अंतराळात झेप घेत, नव्या विश्वाला गवसणी घालते.

तिच्या अस्तित्वानेच घराला अन् देशाला मिळते उभारी ती स्वयंप्रभा, ती स्वयंसिध्दा, घेत आहे गगनभरारी

तिला नकोत आता बंधने, नकोत खोट्या सहानुभूतीचे बोल, समानतेच्या आकाशात, उडू दे तिला आता अनमोल, तीच्या सक्षमीकरणातच दडलाय, उद्याच्या प्रगतीचा श्वास, स्त्री- शक्तीच्या सन्मानानेच, होईल खऱ्या अर्थाने विकास!

**महिला सक्षमीकरण**

महिला सक्षमीकरण हा शब्द आजकाल अनेकदा ऐकतो. पण खऱ्या अर्थाने सक्षमीकरण म्हणजे काय?

केवळ कायदे करून किंवा घोषणाबाजी करून सक्षमीकरण होत नाही, तर त्यासाठी समाजाच्या मानसिकतेत बदल होणे आवश्यक आहे.

महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना स्वतःचे निर्णय स्वतः घेण्याचे स्वातंत्र्य, आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक सुरक्षितता मिळवून देणे. ते आजच्या काळात महिला प्रत्येक क्षेत्रात पुढे आहेत. संरक्षण दलापासून ते कॉर्पोरेट जगापर्यंत आणि राजकारणापासून विज्ञानापर्यंत सर्वच ठिकाणी स्त्रियांनी आपले वर्चस्व सिध्द केले आहेत.

परंतु हे चित्र नाण्याला एकच बाजू दर्शवते. आजही अनेक ग्रामीण आणि शहरी भागात स्त्रियांना दुय्यम वागणूक दिली जाते, शिक्षणापासून वंचित ठेवले जाते आणि कौटुंबिक हिंसेला सामोरे जावे लागते.

खरे सक्षमीकरण तेव्हाच होईल जेव्हा समाजातील प्रत्येक स्त्रीला रात्रीच्या वेळी निर्भयपणे रस्त्यावरून चालता येईल घरातील मुलगा आणि मुलगी यांच्यात केला जाणारा भेदभाव पूर्णपणे नष्ट होईल 'पालवी' या आपल्या महाविद्यालयाच्या अंकाच्या माध्यमातून आपण हाच विचार अंकांच्या माध्यमातून रुजवायला हवा की, स्त्रीला 'देवी' मानून देव्हाऱ्यात बसवण्यापेक्षा तिला माणूस म्हणून जगण्याचा आणि प्रगती करण्याचा समान हक्क दिला पाहिजे.

स्त्री सक्षम झाली, तरच समाज आणि पर्यायाने देश खऱ्या अर्थाने प्रगतीपथावर जाईल.

**महिला सक्षमीकरण**

**एक सामाजिक आणि राष्ट्रीय गरज**

**प्रस्तावना -**

"यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः" ही आपल्या भारतीय संस्कृतीची शिकवण आहे, मात्र मध्ययुगीन काळात स्त्रियांचे अनेक हक्क हिरावून घेतले गेले. आज २१ व्या शतकात आपण वावरत असताना महिला सक्षमीकरण हा अत्यंत कळीचा आणि महत्त्वाचा मुद्दा बनला आहे.

**शिक्षणाचे महत्त्व -**

महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला. "एक स्त्री शिकली की संपूर्ण कुटुंब शहाणे होते" हा विचार त्यांनी समाजाला दिला. शिक्षणाशिवाय सक्षमीकरण अशक्य आहे. शिक्षणामुळे स्त्रीला तिच्या हक्कांची जाणीव होते, ती अंधश्रध्दा आणि अनिष्ट प्रथांच्या विरोधात् उभी राहू शकते. आज शिक्षणामुळेच स्त्रिया डॉक्टर, इंजिनिअर, पायलट आणि शास्त्रज्ञ बनून देशाच्या विकासात योगदान देत आहेत.

**आर्थिक आणि वैचारिक स्वातंत्र्य -**

स्त्री जोपर्यंत आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होत नाही, तोपर्यंत तिचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होऊ शकत नाही. स्वतःच्या पायावर उभे राहिल्याने स्त्रीमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो आणि कुटुंबातील महत्त्वाच्या निर्णयांमध्ये सहभाग वाढतो. तिचा स्वतःचा जोडीदार निवडण्यापासून ते करिअर ठरवण्यापर्यंतचे स्वातंत्र्य तिला मिळायला हवे.

**आव्हाने आणि उपाय-**

आजही भ्रूणहत्त्या, हुंडाबळी, घरगुती हिंसाचार आणि कामाच्या ठिकाणी होणारे लैंगिक शोषण यांसारख्या गंभीर समस्या स्त्रियांसमोर आहेत. या समस्यांवर मात करण्यासाठी कठोर कायद्यांची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. घराघरांतूनच मुलांना स्त्री-पुरुष समानतेचे धडे देणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष** -

स्वामी विवेकानंद यांनी म्हटले होते की 'जोपर्यंत स्त्रियांची स्थिती सुधारत नाही, तोपर्यंत जगाचे कल्याण शक्य नाही. एका पंखाने पक्ष्याला उडणे शक्य नसते." जेव्हा प्रत्येक स्त्री स्वयंपूर्ण आणि सुरक्षित-होईल, तेव्हाच आपला देश ख-या अर्थाने महासत्ता बनेल.

## माझी मैत्रीण माझी आई

अथर्व सतिश गवळी
SYBA

तुच माझी मैत्रीण खरी,
मनातली प्रत्येक गोष्ट जाणणारी
रडताना तुच हसवतेस
आनंदात तुच नाचणारी

आई हा शब्द जरी लहान असला तरी त्यामध्ये संपूर्ण जग सामावलेले आहे, आई म्हणजे प्रेम, माया, त्याग आणि आधार यांचे स्वूरूप आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात आईचे स्थान अतिशय महत्वाचे असते पण आजच्या आधुनिक काळात आई फक्त पालक नसुन ती आपल्या आयुष्यातील सर्वात जवळची मैत्रीण देखील बनली आहे. म्हणूनच माझी आई माझी मैत्रीण आहे.

आई आपल्याला जन्मदेते व आयुष्यभर काळजी घेते ती आपल्या प्रत्येक गरजा पूर्ण करते आपण लहान असताना चालायला शिकवते, बोलायला शिकवते योग्य अयोग्य मधला फरक समजावून सांगते. आई ही आपल्या आयुष्याची पहिली गुरू असते.

आईचे प्रेम हे निस्वार्थ असते ती कोणतीही अपेक्षा न ठेवता आपल्यावर प्रेम करते. आपल्याला काही झाले तर ती सर्वात आधी धावून येते तिच्या प्रेमाशी तुलना जगात कुठल्याही गोष्टीशी करता येऊच शकत नाही.

माझ्या आयुष्यात माझी आई ही फक्त्आई नसुन माझी सर्वात जवळची मैत्रीण आहे मी माझ्या प्रत्येक गोष्टी तिच्याशी शेअर करतो. माझे आनंद, दु:ख, स्वप्न, भीती-सगळ मी तिच्याशी मोकळेपणाने बोलतो आई मला कधीच जज करत नाही ती मला समजावून घेते आणि योग्य सल्ला देते त्यामुळे मला तिच्याशी बोलताना कधीच विचार करावा लागत नाही कोणतीही भीती न बाळगता मी बोलू शकतो ती माझे एकूण घेते मला समुदायिकतेने समजावून सांगते व योग्यतो मार्ग दाखवते.

आई तू माझी सावली
सुख-दु:खाची सोबती
तुझ्यावीना हे जीवन
जणू अपूर्ण कहानी

आईचा अनुभव खूप मोठा असतो. त्यामुळे ती मला योग्य निर्णय घेण्यासाठी मदत करते कधी मी चुकीचा मार्ग निवडत असेन, तर ती मला शांतपणे समजावते ती मला प्रामाणिकपणा, कष्ट व संयम यांचे महत्व शिकवते तिच्या शिकवणीमुळे माझ्या व्यक्तीमत्वाचा विकास होत आहे.

आई मला चांगले संस्कार देते ती मला मोठयांचा आदर करायला शिकवते, सत्य बोलायला व वागायला शिकवते आणि नेहमी आपण दुस-यांचा मदतीला कसे येऊ हयाच्याकडे लक्ष दयायला लावते. कधी मी चुकलो तर मला आई व मैत्रीण दोन्ही अधिकाराने रागवते पण त्या रागवण्या मागे ही तिची काळजी, तिचे प्रेम दडलेले असत, मी आययुष्यात काहीतरी चांगल कराव चांगला माणूस म्हणून घडावा हाच त्यामागचा उददेश असतो एवढ रागावून सुध्दा मला परत प्रेमाने जवळ करणारी देखील माझी आईच असते.

## माझी मैत्रीण माझी आई

अथर्व सतिश गवळी
SYBA

तुझ्या प्रेमाचा सागर गहिरा,
तुझ्याविना जीवन अंधार सारा
आई गं तुच माझी दुनिया,
तुच माझा आधार खरा.

आई सोबत घालवलेला वेळ माझ्यासाठी खूप असतो. आम्ही एकत्र गप्पा मारतो, जेवण करतो, टिव्ही पाहतो कधी कधी बाहेर फिरायला जातो आणि हा आमच्यातला खास क्षणांमुळे आमचे नाते अधिक घटट झाले आहे.

आजच्या काळात आई फक्त घर सांभाळत नाही तर ती बाहेर काम देखील करते. तरीही तिच कधी तिच्या बाळाकडे दुर्लक्ष नाही होत. त्याच्या प्रत्येक हालचालीकडे आईचे बारीक लक्ष असते तरीही ती घर व काम यांचा समतोल राखते तिची ही मेहनत आणि समर्पण खूप प्रेरणादायी आहे. आई आपल्या आयुष्यात खूप त्याग करते ती स्वत: च्या इच्छा बाजूला ठेवून आपल्या मुलांसाठी सर्व काही करते तिच्या त्यागाची आपण कधीच परतफेड करू शकत नाही. पण तिचा आदर करणे, तिचे म्हणणे ऐकणे आणि तिच्यावर तेवढच प्रेम करण्याचा प्रत्येक कारण शोधून काढणे ही भेट देवून शकतो.

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक मुल आपल्या आईशी संवाद साधायला विसरतात. पण दिवसभरातून आपण दोन सेकंद काढून जर आपल्या आईला फक्त एवढं विचारलना की आई तु जेवलीस का काय तरी तीचा पूर्ण दिवस आनंदात जाईल आपिण आपल्या आईसोबत मैत्रीचे नाते ठेवले तर जीवन अधिक सुंदर व सोपे होईल. आई ही केवळ आपली पालक नसून ती आपली मार्गदर्शक, सल्लागार व खरी मैत्रीण असते.

तुझ्या मायेच्या कुशीत
सापडतो मला स्वर्ग सारा
तुझ्या एका हसण्यातच
विसरतो मी दु:ख सारा.

आई हा शब्द उच्चारताच मनात एक वेगळीच ऊब निर्माण होते आई म्हणजे मायेचा सागर प्रेमाचा झरा आणि आयुष्यभर साथ देणारी सावली. प्रत्येकाच्या आयुष्यात अनेक नाती येतात, पण आईसारख निस्वार्थ आणि ख-या अर्थाने जिव्हाळयाच नात दुसरं कोणतच नसत. आज मी जे काही आहे ते फक्त माझ्या आई मुळेच आहे. तिच प्रेम, मार्गदर्शन व साथ यामुळे माझ्जीवन घडत आहे कधी कधी मी विचार करतो जर माझी आई नसती, तर माझ काय झाल असत. आणि माझ्या डोळयातून पाणी येते शेवटी मला एवढच म्हणायचे आहे की, आई ही फक्त व्यक्ती नाही, तर ती एक भावना आहे.......... जी शब्दांत कधीच मावू शकत नाही....

## महिला सक्षमीकरण-सुनिता विल्यम्स्

अश्विनी छबु साळवे
SYBA

सुनिता विल्यम्स जन्म्19 सप्टेंबर 1965 या भारतीय अमेरिकन वंशाच्या प्रसिध्द नासा अंतराळवीर आणि निवृत्त युनायटेड स्टेटस नेव्ही कॅप्टन आहेत त्यांना अंतराळात सर्वाधिक वेळा 608 दिवसाहून अधिक आणि सर्वाधिक स्पेसवॉक 9 वेळा , 62 तासाहून अधिक करण्याचा महिला विक्रम नोंदवला आहे. त्यांना आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर अनेक मोहिमांमध्ये कमांडर म्हणून काम केले आहे.

**सुनिल विल्यम्स यांची महत्वाची माहिती-**

**जन्म्आणि पार्श्वभूमी-**

सुनिता विल्यम्स यांचा जन्म अमेरिकेतील ओहायोमध्ये झाला त्यांचे वडील डॉ दिपक पंडयाहे भारतीय गुजराथी होते तर आई स्लोव्हेनियम वंशाची होती.

**शिक्षण-**

त्यांनी 1987 मध्ये युनायटेड स्टेटस नेव्हला अकादमीतून फिजीकल सायन्समध्ये बॅचलर ऑफ सायंन्स पध्दती मिळवली आणि 1995 मध्ये फलोरिका इन्स्टीटयूट ऑफ टेकनॉलाजीमधून इंजिनिअरंग मॅनेजमेंट मध्ये मास्टर ऑफ सायन्स पदवी घेतली.

**कारकीर्द-**

नासा मध्ये सामील होण्यापूर्वी त्यांनी नेव्ही ऑफसर म्हणून काम केले आणि हेलिकॉप्टर पायलट म्हणून अनेक विक्रम केले.

**अंतराळ प्रवास-**

1. पहिली मोहीम 2006 STS-116 द्वारे ISS वर गेल्या
2. मोहीम 32/33 -2012 त्यांनी ISS तर अनेक दिवस घालवले आणि स्पेस्वॉक केले.
3. अलीकडील मोहिम 2024-2025 बाईगच्या स्टार लायनर यानातुन अंतराळात गेल्या मात्र तांत्रिक अडचणींमळे त्या आणि बुच तिल्मीर नऊ महिने अंतराळात अडकले होते ते 2025 मध्ये सुरक्षित परतले.

**विक्रम-**

महिला अंतराळविरांपैकी सर्वाधिक वेळा अंतराळात वास्तव्य आणि सर्वाधिक स्पेस वॉकचा विक्रम त्यांच्या नावावर आहे.

त्यांना त्यांच्या उत्कृष्ठ सेवेसाठी अमेरिकेचा प्रतिष्ठित डिफेन्स्स सुपेरियन सर्व्हिस मेडल आणि भारताचा ग्लोबल इंडियन ऑफर द इयर सारखे अनेक पुरस्कार मिळाले आहे.

## डॉक्टर आनंदी गोपाळ जोशी

प्रो.रोहिणी किसन सांगळे
वाणिज्य विभाग

तिच्या निहाळ दृढनिश्च्यामुळे आणि कठोर परिश्रमामुळे प्रसिध्द झालेली पहिली भारतीय महिला डॉक्टर आनंदी गोपाळ जोशी.

आनंदीबाई जोशी यांचा जन्म्31 मार्च 1835 रोजी पुण्यात त्याच्या आजोळी झाला यांचे पुर्वाश्रमीचे नाव यमुना होते. जुन्या कल्याण परिसरातील परनाका येथे राहणा-या गणपतराव अमृतेश्वर जोशी यांचे जेष्ठ कन्या होत्या. वयाच्या नवव्या वर्षी त्यांचा विवाह त्यांच्यापेक्षा 20 वर्षांनी मोठे असणा-या गोपाळराव जोशी यांच्याशी झाला. गोपाळराव जोशी हे मुळचे अहमदनगर जिल्हयातील संगमनेर येथील रहिवासी होते. लग्नानंतर गोपाळरावांनी आपल्या पत्नीचे नाव यमुना बदलून आनंदी बाई असे ठेवले. वयाच्या 14 व्या वर्षी आनंदी बाईंनी एका मुलाला जन्मदिला परंतु वैद्यकीय उपचार न मिळाल्यामुळे मूल फक्त 10 दिवस जगले आनंदीबाईच्या जीवनात हा एक महत्वाचा टप्पा ठरला या घटनेनंतर त्यांनी डॉक्टर होण्याचे ठरविले.

गोपाळरावांनी तिला मिशनरी शाळांमध्ये प्रवेश मिळावा म्हणून खुप प्रयत्न केले. नंतर गोपाळरावांनी कलकत्याला बदली घेतल्यावर तेथे आनंदीबाई संस्कत आणि इंग्रजी वाचणे व बोलणे शिकल्या. गोपाळराव कल्याणला पोस्ट ऑफिसात कारकुन होते नंतर त्यांची अलिबाग येथे आणि नंतर कोलकाता येथे बदली झाली. गोपाळरावाचे व्यक्तीमत्व हे पुरोगामी होते त्या काळातही त्यांचा महिला शिक्षणाला पाठींबा होता. त्या काळात इतर पती आपल्या पत्नींना स्वयंपाक न केल्याबददल मारहाण करत. या उलट गोपाळराव आपल्या पत्नीला अभ्यास न करण्याबददल मारहाण करत ते स्वत: लोकहीत वादी शतपत्रे वाचत आनंदी बाईंना शिक्षणात रस आहे असे समजल्यावर ते आनंदीबाईंना पाठींबा देवू लागले.

आनंदीबाईच्या वैद्यकीय शिक्षणाच्या बाबतीत गोपाळरावांनी अमेरिकेत पत्रव्यवहार केला. परंतु हे शिक्षण घेण्यासाठी ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याची अट होती पण धर्मांनतर करण्याचे तर आनंदीबाईंना मान्य नव्हते गोपाळरावांच्या चिकाटीमुळे आनंदीबाईंना धर्म न स्विकारता 1883 मध्ये वयाच्या 19 व्या वर्षी विमेन्स्मेडिकल कॉलेज ऑफ नेन्सिव्हेनिया मध्ये प्रवेश मिळाला तेथे गेल्यावर अमेरिकेतील नवीन वातावरण आणि प्रवासातील दगदग यामुळे आनंदी बाईंची प्रकृती खराब झाली परंतु तेथील एक कारपेंटर जोडप्याने त्यांना मदत केली.

सुरवातीला तत्कालीन भारतीय समाजाकडून आनंदीबाईंना डॉक्टर होण्याला विरोध केला तेव्हा त्यांनी भारतामध्ये महिला डॉक्टरची किती आवश्यकता याचे प्रतिपादन केले आणि हे स्पष्ट सांगितले की मला यासाठी धर्मांतर करण्याची काहीच गरज नाही आहे त्या हिंदू धर्म आणि संस्कृतीचा त्या त्याग करणार नाहीत असे त्यांनी सांगितले त्यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यावर भारतात

## डॉक्टर आनंदी गोपाळ जोशी

येवून महिलांसाठी एक वैद्यकिय महाविद्यालय सुरू करायचे ठरवले. कष्टाच्या आणि जिददीच्या जारोवर अभ्यासक्रम दोन वर्षात पूर्ण करून मार्च इस 1886 मध्ये आनंदीबाईंनी एम डी ची पदवी मिळवली एम डी साठी त्यांनी हिंदू आर्य लोकांमधील प्रसुतीशास्त्र याविषयावर प्रबंध लिहिला. एम डी झाल्यावर व्हिक्टोरिया राणीकडून त्यांचे अभिनंदन झाले हा प्रवास करतांना त्यांना गोपळरावांचा पाठींबा होता तिच्या पदवीदान समारंभाला गोपाळराव स्वत: अमेरिकेत गेले होते. पंडित रमाबाई यांनी सुध्दा समारंभात भाग घेतला एम डी झाल्यावर आनंदीबाई जेव्हा भारतात आल्यावर त्यांना कोल्हापुरमधील अल्बर्ट एडवर्ड हॉस्पीटलमधील स्त्री कक्षाचा ताबा देण्यात आला.

**मृत्यू-**

वयाच्या विशीतच त्यांना क्षयरोग झाला होता पुढे काही महिन्यातच म्हणजे 26 फेब्रुवारी इस 1887 रोजी त्यांचा पुण्यात मृत्यु झाला.

केवळ 21 वर्षाच्या जीवन यात्रेत आनंदीबाईंनी भारतीय स्त्रीयांसाठी प्रेरणादायी जीवनदर्शन उभा केला. दुर्दैवाने आनंदीबाईच्या बुध्दिमत्तेचा आणि ज्ञानाचा फायदा जनतेला होवू शकला नाही. परंतु चुल आणि मुल म्हणजे आयुष्य आहे. अशा समजणा-या महिलांना त्या काळात आनंदीबाई जोशी चा आदर्श मिळाला एकीकडे सावित्रीबाई व ज्योतीबा फुले स्त्रीशिक्षणासाठी प्रयत्न करत असतांना आनंदी गोपाळ जोडपे आपले ध्येय प्राप्त करण्यासाठी झटत होते मनात जिदद आणि चिकाटी असेल तर कोणतेही काम अशक्य नाही हे आनंदी गोपाळ जोशी या जोडप्याने सिध्द करून दाखवले समाजात राहुन काम करायचे असेल तर अडथळे येणारच.

आनंदीबाई स्वत: डॉक्टर होवूनही कुणा देशभगिनीवर उपचार करण्याची संधी आनंदीबाईंना मिळालीच नाही. तिकडे अमेरिकेत मात्र कारपेंटर यांनी आपल्या कुटूंबाच्या स्मशानात त्याचे लहानसे थडगे बांधले त्यावर आनंदी जोशी एक तरूण हिंदू ब्राम्हण कन्या परदेशात शिक्षण घेवून डॉक्टर पदवी मिळविणारी महिली भारतीय पहिली स्त्री अशी अक्षरे कोरून तिचे स्मारक केले.

आनंदी बाईच्या कतृत्वाला नमन आहे मला असे म्हणावेसे वाटते की,

भारताची पहिली महिला डॉक्टर डॉ.आनंदी बाई जोशी बालपणीचे नाव यमुना साधे-भोळे महाराष्ट्राच्या मातीमधले एक सुंदर पाऊल होते नवव्या वर्षी लग्न झाले गोपाळरावांची साथीने, ज्ञानाची पेटवली दिपज्योती चौदाव्या वर्षी लागले मातेचे पद,परंतु विधीच्या लेखी होते काही वेगळेच दहा दिवसात बाळ गेले, प्राण झाले कासावीस वैद्यकीय उपचाराविना दु:खाचा डोंगर कोसळला त्या दु:खाच्या वादळातुन एक नवी ज्योत पेटली.

महिलंच्या आरोग्यासाठी तिने प्रतिज्ञा घेतली

रूढी-परपरांच्या भिंती तोडून, ज्ञानाचा सागर ओलांडला परदेशात जाऊन तिने वैद्यकीय शिक्षणाचा मार्ग निवडला कुचेष्टा अपमान आणि कडाक्यांची थंडी तिने कधीही मानली नाही कसल्याही संकटांची माघारी पेन्सिल्व्हेनियाच्या कॉलेजमधुन एम डी ची पदवी मिळविली

पहिल्या भारतीय महिला डॉक्टर म्हणून भारतात किर्ती पसरवली.आयुष्यात तिने साध्य केले कार्य महान आनंदीबाईच्या त्यागाला शतकोटी प्रणाम आजही त्याची संघर्षाचा, देते आम्हा प्रेरणा भारतीय स्त्री च्या प्रगतीची तिच खरी रचना

## महिला सबलीकरण

भूषण ईश्वर भंडारी
SYBA

1.ती आहे शक्ती
ती देवी आहे ती आहे शक्ती
तीची प्रत्येक वाढ आहे प्रगती
तीला आता सीमामध्ये बांधू नका
ती नवीन इतिहास रचू शकते
संकटाशी ती लढेल, संकटांना भेदेल
घरासह ती आभाळही सांभाळेल
स्वप्ने तिची पंख लावून उडतील
सशक्त, विकसित समाज घडवतील

2.स्त्री शक्ती स्वतंत्र नारी
नाही ती अबला, ती आहे सबला
जिदद तिच्या मनात, ताकद तिच्या मनगटात
स्वार्थी जगाला दाखवून देईन
ती आहे स्वाभीमानी, ती आहे स्वतंत्र
कुणा एकाची सावली नाही
स्वत:चा प्रकाश ती स्वत्: च आहे
शिक्षणाने तिने गगन ठेंगणे केले
नारी शक्तीने हे जग पुन्हा जिंकले

3.आत्मनिर्भर नारी
आर्थिक उन्नतीतून सक्षमीकरण
महीलांनी साधले आहे आत्मनिर्भरतेचे धोरण
कौशल्य्आणि जिददीच्या जोरावर
ती मजल मारते, उच्चशिखरावर
ती स्वावलंबी होवून समाज सुधारते
तीची प्रगती म्हणजे देशाची प्ररगती
तीच आहे ख-या अर्थाने समाजाची उन्नती

**पंडिता रमाबाई**

पंडिता रमाबाई यांचा जन्म्23 एप्रिल 1858 मध्ये कर्नाटक राज्यात झाला. त्यांच्या वडीलांचे नाव अनंतशास्त्री हे पुरोगामी विचारांचे होते व आई लक्ष्मीबाई डोंगरे होते. बाल विवाहास त्यांच्या विरोध होता.

त्यांनी पत्नी लक्ष्मीबाई व मूलगी रमाबाई यांस वेद शास्त्राचे शिक्षण दिले होते. त्यांच्या संस्कृतीवरील प्रभुत्वामुळे कोलकता येथील सिनेट हॉलमध्ये त्यांचा पंडिता व सरस्वती या बिरूदावली बहाल करून गौरव करण्यात आला. त्यांना मराठी, कन्न्ड, गुजराती, बंगाली हिंदी, इंग्लिश, संस्कृत हिब्रु या भाषा अवगत होत्या बालविवाह पुर्नविवाहास बंदी केशवपन, अनिष्ठ रूढीपासुन स्त्रियांना मुक्त करण्यासाठी त्यांनी आर्य महिला समाजाची स्थापना केली होती.

1889 रोजी त्यांनी मुंबईला विधवाकरिता शारदा सदन नावाची संस्था काढली. त्यांनी केशवपनाविरूध्द प्रचार केला. त्यांनी गरजू महिलांसाठी प्रीतिसदन शारदासदन शांतीसदन उभे केले. ब्रिटीश राज्यवस्थेतील सर्वाच्चपुरस्कार केसर-ए-हिंदने गौरविण्यात आले पुढे 1989 मध्ये त्यांच्यावर टपाल तिकीटेही काढण्यात आले. पंडिता रमाबाई यांचे इ.स.1922 मध्ये केडगाव पुणे येथे निधन झाले.

## सुनीता विल्यम्स

घोडे अनुष्का गंगाराम
"F.Y.B.A

सुनीता विल्यम्स हिनं अवकाशातील सहा महिन्यांच्या वास्तव्यात जगभरातल्या अनेकांचं लक्ष वेधून घेतलं आहे. २७ तास १७ मिनिटांचा स्पेसवॉक करून तिनं महिलांच्या अवकाश प्रवासात विक्रमी नोंद केली आहे.

एका असामान्य स्त्रीची ही कथा आहे. समर्पण, निष्ठा, स्पर्धात्मक विचारधारा, आणि सकारात्मक दृष्टिकोनामुळे, पशुवैदय बनवण्याची इच्छा असलेल्या मुलीचं रूपांतर झालं एका यशस्वी अंतराळवीरामध्ये आणि आता ती झाली आहे एक आदर्श.

सुनीता एका प्रेमळू कुटुंबात लहानाची मोठी झाली. सुनीताच्या यशाचा अभिमान बाळगणाऱ्या तिच्यातल्या उपजत गुणांना वाव दिला, पाठिंबा सुनीतानं अपरिमित कष्ट करून उत्तमतेकडे वाटचाल केली. अमेरिकन भूमीची मूल्यं जपणाऱ्या आणि भारतीयत्वाच्या खुणा दाखवणाऱ्या सुनिताचे वडील डॉ. दीपक पंड्या हे एक नावाजलेले प्रसिद्ध न्यूरीमैनाटांमिस्ट, तर आई उर्जालिन बीनी पंड्या या युरोपियन वारसा जपणाऱ्या !

सुनीता सागरात रमली आहे, समुद्रतळाशी जाऊन आली आहे. लढाईवर गेली आदि, मानवतावादी मोहिमांसाठी गेली आहे, अवकाशात उसळी मारून पुन्हा पृथ्वीवर विसावली आहे. ९ डिसेंबर २००६ साली त्यांनी अंतराळात त्यांचा पहिला प्रवास केला. या प्रवासात त्यांनी एकूण १९५ दिवस सुखरूप घालवले.

अंतराळात जाण्याचा प्रवास खूप प्रेरणादायक आहे. त्यांच्या या अनोख्या प्रवासातून आपल्याला खूप काही शिकायला मिळते. एखादया व्यक्तीमध्ये जिध्द, चिकाटी, साहस आशावाद या गोष्टी असतील, तर ती व्यक्ती कोणत्याही क्षेत्तात नक्कीच यश मिळवू शकते.

सुनीता विल्यम्स यांच्या कामगिरीमुळे त्या केवळ अमेरिकेतच नाही, तर संपूर्ण जगभरातील भारतीयांसाठी गौरवशाली व प्रेरणादायी ठरल्या आहेत. या कर्तृत्वामुळे आजच्या तरुण पिढीला त्यांची प्रेरणा मिळते.

"मी कल्पनाचाच वारसा पुढे नेत आहे. ती एक खूप चांगली व्यक्ती आणि मैत्रीण होती. मी तिच्याकडूनन जीवनाबाबत खूप काही शिकले ती स्वः ला ब्रहमांवची नागरिक म्हणायची. अशा प्रकारची तिची दूरदृष्टी होती."

अगदी बालवयातच अवकाशात उंच झेप घेण्याचे स्वप्न कल्पनाने पहिले आणि आपली सर्व शक्ती पणाला लावून त्या स्वप्नाचा पाठपुरावा केला. मुलींनी फारसे शिक्षण घेण्याची प्रथा नसलेल्या कुटुंबात जन्मलेल्या कल्पनाला तिच्या आई - वडिलांनी मात्र साथ दिली. तिला उच्च शिक्षणासाठी अमेरिकला पाठविले. तिने अंतराळवीरांसाठीची नासाची प्रवेश परीक्षा बुध्दिमत्ता, प्रचंड, धाडस, हुशारी व अफाट दिली व यांच्या जोरावर अंतराळवीरांच्या ग्रुपमध्ये निवडही झाली.

अत्यंत अवघड प्रशिक्षणाला तिला सामोरे जावे लागले तरीही तीव्र महत्वाकांक्षेच्या जोरावर अंतराळ - प्रवास करणारी ती पहिली भारतीय महिला ठरली.

जिथे कल्पनाचा प्रवास संपतो तिथे सुनीताचा सुरू होतो. अमेरिकेत राहणाऱ्या पण वंशाने भारतीय असणाऱ्या सुनीतालाही अंतराळविश्वाबद्दल प्रचंड, आकर्षक. अंतराळात शून्य गुरुत्वाकर्षण असणा-या

## सुनीता विल्यम्स

घोडे अनुष्का गंगाराम
"F.Y.B.A

अंतराळात वास्तव्य करणे, आपले दैनंदिन कार्य-क्रम उरकणे, तेथील वातावरणात विविध प्रयोग करणे हे एक मोठे आव्हानच असते. मात्र सुनीताने हे आव्हान नुसते पेललेच नाही तर सर्वात जास्त वेळ 'स्पेस वॉक' करणारी स्त्री म्हणून विक्रमही नोंदवला. भारतीय संस्कारांवर आणि विचारांवर पुरेपूर श्रध्दा असणाऱ्या सुनीताने भारताचे नाव खरोखरच उज्ज्वल केले.

'लैंडिंग स्पॉट सापडला आणि एकच जल्लोष करण्यात आला. 127 दिवसांच्या या अंतराळ मोहिमेची कमान सुनीताच्या खांदयावर होती. सुनीता विल्यम्स : अंतराळू संशोधनातील योगदान आणि प्रेरणादायी वाटचाल थक्क करणारी आहे.

भारतीय वेळेनुसार सकाळी 1 वाजून 90 मिनिटांनी सुनीता आणि तिचे अन्य सहकारी 'सोयूज अंतराळ यानातून कझाकिस्तानमधील अश्लिक स्टेशनवर सुरक्षित उतरले. अपेक्षित 35 किलोमीटर दूरवर उतरले, मात्र काहीही अघटित घडले नाही, काही वेळातच त्यांचा

# नारी आहे शक्ती, तिच्यामुळेच प्रगती!

# • महिलांचा सन्मान—

# हीच खरी संस्कृती, हीच खरी प्रगती!

## महिला सक्षमीकरण काळाची गरज

नंदिनी सत्यनारायण येनगंटी
SYB.COM

नारी आहे, अबला नाही
युगायुगाची शान ती.
आहे सक्षम होत सफल
आहे दैवी वरदान ती.

अस म्हणत आज महिला सक्षमीकरणासाठी आपल्याला काहीन काही उपाययोजना करण्याची गरज आहे. महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना शिक्षित करणे तसेच त्यांना त्यांचा देश समाज आणि कुंटुबांशी संबंधीत निर्णय घेण्यास सक्षम बनवणे.

भारत समाज आणि कुंटुबांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महिला सक्षमीकरण्याची गरज आहे. सक्षमीकरण महिलांना त्याच्या वैयक्तिक विकासासाठी तसेच सामाजिक विकासासाठी देतात, महिला हा समाजाचा कणा आहे. म्हणूनच बालपणापासून त्यांचा विकास होणे आवश्यक आहे.

घडविण्यास राष्ट्राचा विकास
मुलीचा शिक्षणांचा हवा ध्यास,

महीलाना जागरूक करण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या हक्कांबद्द्दल जागरूक करण्यासाठी अनेक जागरूकता कार्यक्रम चालवले जातात, त्याचबरोबर समाजात होणाऱ्या अत्याचारांपासून स्त्रियांचे संरक्षण करण्यासाठी अनेक कायदे देखील करण्यात करण्यात आले आहेत. आंतराष्ट्रीय महिला दिन मदर्स डे, दरवर्षी साजरा केला जातो. महिला सक्षमी करण खरा अर्थ असा आहे की महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव देण्याबाबत त्यांना त्यांचे सर्व निर्णय स्वत: घेण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. त्यांच्यावर होत असलेला अत्याच्यार आवाज उठवणे.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी म्हटले आहे की, जागृत करण्यासाठी महिलांनी जागरूक असणे आवश्यक आहे जेव्हा एखादी स्त्री आपले पाऊल पुढे टाकते तेव्हा तिचे कुटूंबही प्रगती करते, तिचे गावही पुढे येते. आणि सर्वाचा विकास होतो."

प्रदिर्घ संघर्षानतंर स्त्रियांना मालमत्तेचा हक्क मतदानाचा, अधिकार, नागरी हक्क, विवाह आाणि नोकरीच्या बाबतीत कायदेशीर संरक्षण मिळाले आहे. महिला आणि किशोरवयीन मुलीच्या संरक्षणासाठी बेटी बचाओ बेटी पढ़ाओ-उज्ज्वला योजना सरकार किशोरी कौशल्य योजना या सारख्या अनेक कल्याणकाशी योजना सरकार चालवत आहेत.

खरोखरच सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी महिलांना त्यांच्या स्वतःच्या हक्काबद्दल जागरूक असणे आवश्यक आहे. महिलांना त्यांच्या आजूबाजूला त्यांच्या समाजात आणि देशात काय घडत आहे याची जाणीव असावी.

तू प्रेरणा, तू करुणा, तूच आहेस विश्वास
प्रत्येक नव-जीवनाचा आधारही
तूच,प्रत्येक दिवसासाठी खास आहेस तू.

आपल्या देशात प्रतिभावन महिलांची उदाहरणे कमी नाहीत. इंदिरा गांधी, कल्पना चावला, झाशीची राणी.. पीटी उषा इत्यादी महिलांची काही उदाहरणे आहेत. ज्यांना दयाळूपणा आणि शौर्य दाखवून या देशाला

## महिला सक्षमीकरण

नंदिनी सत्नारायण येनगंटी
SYB.COM

अभिमान दिला आहे. महिलांना सामाजिक आणि कौटूंबिक अनेक आत्याचारांना सामोरे जावे लागतात, अनेक क्षेत्रात समान काम करूनही महिलांना पुरुषांपेक्षा कमी मोबदला दिला जातो. या पद्धतीचा आत्मा समाजातील स्त्री आणि पुरुषांमधील असमानतेची रेषा काढतो.

महिलांच्या प्रगतीमुळे असंख्य अडथळे येण्याचे कारण कुठेतरी सामाजिक दृष्य जाणीवपूर्वक किंवा नकळत जबाबदार आहे. अनेक गावामध्ये अजूनही मुलींना शिक्षणाची सुविधा दिली जात नाही. भारतात महिलांचा शैक्षणिक दर पुरुषाच्या तुलनेत कमी आहे. या जागे रुढीवादी समाजाचा विचार आहे. जो महिलांना पुढे जाण्यापासून रोखतो.

स्त्री एक व्याख्या कधीही कोणाला न समजणारी

कधीही कोणास न उमगलेली आणि कधीही कुणास न जाणवलेली.

महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना स्वतःचे नर्णय घेण्यास सक्षम बनवणे. अनेक शतकापूर्वी स्त्रियांचे अस्त्वित्व अस्तित्वात नव्हते. पण जसजसा वेळ निघाला. तसतसे स्त्रियांना त्यांचे अस्तित्व आणि शक्ती कळली. तेव्हापासून आजपर्यंत महिलांच्या सामाजिक उन्नती होत आहे. पूर्वी च्याकाळी स्त्रियांना निर्णय घेण्यांची किंवा खुल्या आकाशात उडण्याचे पाहण्याची परवानगी नव्हती. आपल्या देशात स्त्री शक्ती समाजाची परंपरा शतकानुशतके चालू आहे. महिलांना नेहमी त्याच्यांवर अवलंबून राहाव लागत असे त्याच कारणामुळे आज महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली जात आहे. महिला सक्षमी करूण खरा अर्थ

स्त्री पुरुष समानतेला प्राधान्य देत भारतभरात महिला सक्षमीकरणाला सतत प्रोस्ताहन दिले जातात. भारत देशासाठी आवश्यक आहे की महिला शारिरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्टया सशक्त होतील. देशाला सशक्त बनवण्यासाठी आपण आधी महिलांवर होणारे अत्याचार हिंसा वाचवली, पहिजे जेणेकरूण महिलांचा विकास होईल आणि ते देशाच्या विकासात आपली भूमिका बजावू शकतील.

स्त्री निभावते अनेक भूमिका....
तरी करत नाही कसली अपेक्षा,
एकदा रहा पाठीमागे उभे तिच्या.
तुम्हाला ती देईल फक्त प्रेम आणि माया,

महिला सक्षमीकरण सरकारने बेटी पढ़ाओ, बेटी बचाओ , सारख्या अनेक महिला योजना सुरू केल्या आहेत. जेणेकरुण मुलीच्या शिक्षणात कोणताही अडथळे येऊ नये. शहरी भागात महिला अभिमान आणि नोकरीमुळे करत आहेत. परतु ग्रामीण

## महिला सक्षमीकरण

नंदिनी सत्यनारायण येनगंटी
S.Y.B.COM

भागातील महिलांच्या निरक्षरतेमुळे ते शेती आणि रोजंदारी करू आपले उदरनिवार्ह करत आहेत. आणि इतर अनेक ठिकणी अजून असे आढळून आले आहे. की गुणवत्ता असूनही महिलांना पुरुषा पेक्षा कमी उत्पन्न दिले जाते. पुरुषांना जेवढे अधिकार दिले आहेत. तेवढेच अधिकार महिलांनी दिले पाहीजे.

स्त्रियांना या अत्याचार आणि समस्यापासून मुक्त करण्यासाठी आपल्याला खूप पुढे जायचे आहे. महिलांना त्यांचे हक्क मिळण्यासाठी, सर्वप्रथम समाजातील महिलांप्रती अगोदर चुकीची मानसिकता मिटवावी लागेल. जर विचार बदलेल, तरच बदल होईल भारत देशात दिवसेदिवस घडणा-या हुंडा प्रथेमुळे स्त्रियांच्या हत्या आपल्याला हादरवून सोडतात. लैंगिक हिंसा, स्त्रीभ्रूणहत्या ज्यामध्ये तिचा न जन्मलेल्या मुलीला पोटात मारण्यास भाग पाडले जातात. स्त्रीभ्रूणहत्या हा गुन्हा आहे. त्यामुळे मुलींची संख्या वाढत नाही. हे स्त्रियांविरुद्ध एक प्रकारची नकारात्मक मानसिकता दर्शवते.

काळ बदलला, तू ही बदललीस
चुल - मुलं चाकोरीबद्ध दिशा सोडून
प्रगती पथावर निघालीस.

असे कोणतेही काम नाही जे स्त्रिया करू शकत् नाहीत. आजकाल स्त्रिया घर आणि कार्यालयात स्वतंत्रपणे सांभाळू शकतात असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे महिलांनी योग्य अर्थाने स्त्रियांनी लायकी सिध्द केली नाही सक्षमीकरण तेव्हाच शक्य आहे, जेव्हा आपण महिलांची सुरक्षा आणि शिक्षण सुनिश्चित करू आणि त्याचबरोबर त्यांच्या विचारांनाही तितकेच प्राधान्य देऊ शकतो. पुरुषांना जितक्या संधी आणि अधिकार दिले जातात, तितकेच स्त्रियांनाही समान संधी मिळायला हव्यात. भारतात महिला सक्षमीकरणाची सर्वात जास्त गरज आहे. भारतातील अनेक भागात महिला अजूनही सुरक्षित नाही. महिलांना अनेक प्रसंगी उच्च शिक्षण घेण्याची परवानगी नाही.

आज जोपर्यंत समाजाची मानसिकता बदलत नाही तो पर्यंत कायदयांची कठोर अंबलबजावनी केली गेली पाहिजे अगदी त्याच प्रकारे आज स्पेशल नेटच्या साईड वरून स्त्रियांचे संरक्षणाचे आणि सुरशिक्षतेचे महत्त्व पटवून दिले गेले पाहिजे. स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी नवनवीन उपाययोजना जाहिर केल्या जातात मात्र या राज्यस्तरावरील उपाय योजना जो पर्यंत सामजिक समर्थन मिळत नाही तो पर्यंत प्रत्येक स्तरावर स्त्रीला तिची लढाई एकटयानेच लढायची आहे.

नारी तुच आहे तुझ्या नवक्रांतीची निशानी
चल उठ. हो खंबीर तूच रणरागिणी,

## सोशल मीडियाचा महिलांवर होणारा परिणाम

पालकर स्नेहल
BBACCA

आजचे युग हे डिजिटल युग म्हणून ओळखले जाते. मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडिया हे आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. फेसबुक, इन्स्टाग्राम, यूट्यूब, व्हॉट्सअॅप, ट्विटर अशा विविध माध्यमांमुळे जग जवळ आले आहे. विशेषतः महिलांच्या जीवनात सोशल मीडियाने मोठा बदल घडवून आणला आहे. या बदलाचे सकारात्मक तसेच नकारात्मक असे दोन्ही परिणाम दिसून येतात.

**सकारात्मक परिणाम**

**१. आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकास**

सोशल मीडियामुळे महिलांना स्वतःचे विचार मांडण्यासाठी एक व्यासपीठ मिळाले आहे. अनेक महिला आपल्या कला, कौशल्य, व्यवसाय किंवा सामाजिक कार्याची माहिती जगासमोर मांडत आहेत. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढत आहे.

**२. शिक्षण आणि माहितीचा प्रसार**

महिलांना विविध क्षेत्रातील माहिती सहज उपलब्ध होत आहे. ऑनलाइन कोर्सेस, वेबिनार, प्रेरणादायी व्हिडिओ यांच्या माध्यमातून महिला नवीन कौशल्ये शिकत आहेत. ग्रामीण भागातील महिलांनाही याचा मोठा फायदा होत आहे.

**३. व्यवसाय आणि रोजगाराच्या संधी**

आज अनेक महिला सोशल मीडियाच्या मदतीने घरबसल्या व्यवसाय करत आहेत. घरगुती पदार्थ, कपडे, हस्तकला, ब्युटी प्रॉडक्ट्स यांची विक्री ऑनलाइन माध्यमातून

मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळत आहे.

**४. सामाजिक जागरूकता**

महिलांवरील अन्याय, अत्याचार, आरोग्य, शिक्षण, महिला हक्क यांसारख्या विषयांवर सोशल मीडियामुळे जागरूकता वाढली आहे. अनेक सामाजिक चळवळींना सोशल मीडियामुळे बळ मिळाले आहे.

**नकारात्मक परिणाम**

**१. मानसिक ताण आणि तुलना**

सोशल मीडियावर इतरांचे आकर्षक जीवन पाहून अनेक महिलांमध्ये स्वतःबद्दल न्यूनगंड निर्माण होतो. सतत तुलना केल्यामुळे मानसिक ताण, चिंता आणि नैराश्य वाढू शकते.

**२. गोपनीयतेचा धोका**

काही वेळा महिलांची वैयक्तिक माहिती किंवा फोटो चुकीच्या पद्धतीने वापरले जातात, सायबर क्राईम, फेक अकाउंड, ऑनलाइन छळ यांसारख्या समस्या वाढत आहेत.

## सोशल मीडियाचा महिलांवर होणारा परिणाम

**पालकर स्नेहल**
**BBACCA**

सोशल मीडिया हे एक प्रभावी साधन आहे. त्याचा योग्य वापर केल्यास महिलांच्या प्रगतीसाठी तो अत्यंत उपयुक्त ठरू शकतो. शिक्षण, रोजगार, आत्मविश्वास आणि सामाजिक सहभाग वाढवण्यासाठी सोशल मीडिया महत्त्वाची भूमिका बजावत आहे. मात्र त्याचा वापर मर्यादित आणि सजगपणे करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर करताना सुरक्षितता, गोपनीयता आणि मानसिक आरोग्य यांची काळजी घेतल्यास सोशल मीडिया महिलांच्या सक्षमीकरणाचे प्रभावी माध्यम ठरू शकते.

**३. वेळेचा अपव्यय**

अतिप्रमाणात सोशल मीडिया वापरल्यामुळे वेळेचा अपव्यय होतो. याचा परिणाम वैयक्तिक जीवन, कुटुंब आणि आरोग्यावरही होऊ शकतो.

**४. चुकीची माहिती आणि प्रभाव**

कधी कधी सोशल मीडियावर अफवा किंवा चुकीची माहिती पसरवली जाते. त्याचा महिलांच्या विचारांवर आणि निर्णयक्षमतेवर चुकीचा परिणाम होऊ शकतो.

- **नारीशक्तीची हीच हाक, समान हक्क हा जन्मसिद्ध हक्क!**
- **शिका, पुढे चला, स्वप्नांना नवी दिशा द्या!**
- **सशक्त महिला, उज्ज्वल भारत!**
- **स्त्रीचा सन्मान, राष्ट्राची ओळख महान!**
- **महिला सक्षम, समाज सक्षम!**

# ENGLISH SECTION

## ESSAY ON MOTHER

Vivek Prasad Dulam
S.Y.B.A

*** WHAT MOMS DO ? ***

My mom talks to me about many things one of the things she talks tome about is what will happen when I grow up. She tells me what to do in case of an emergency. And one day I had a really bad day with my friends and she told me that to do about it.

*** MOTHER'S LOVE ***

The role of the mother in our lives is always important and precious than other involves in our life of course we are truly loved and card for by our mothers every moment throughout our life.

*** MOTHER AND DAUGHTER RELATIONSHIP ***

The relationship between mother and daughter is different from that of mother and a son. This relationship can be unnerving to others, especially when mother and daughter swap clothes promoting the uncertain compliment, you look like sisters!

*** MOTHER'S DAY ***

One of the most popular ways people celebrate Mother's day is by giving their mother a card and boutique of flowers. As it is a holiday, some people prefer to go out for a picnic to celebrate this festival in schools, kids dedicate poems to their mothers and also perform various roles on this day.

My mother is not simply a world in fact it is a whole universe in itself.

Mother is the symbol of love, care and sacrifice. She is the most important person in everyone's life. As for me my mother is the most precious gift of God for me.

My mother is the person who has the most impact in my life. She is my first teacher, guide and my best friend. She takes care of everyone in our family. She teaches me good habits and moral values. She understands me and helps me to solve my problems.

My mother is my pride she is my greatest motivation because she always encourages me I tell my secrets to her. I always wonder how she manages everything perfectly.

My mother is an inspiration to me, her devotion, hardwork, love and faith inspires me to do more, to learn more and to reach my goals in life.

I love my mo ich and I always pray for the he ong life of my mother.

*** POEM ***

**“ MOTHER”……**

A mother loves right from the start no matter
if her children are near or far apart

A mother give never-ending love
She gives us comfort and peace
life a beautiful dove.

for us she will always do her best,
even when we put her patience to the test,
she wipes our tears
chases away our fears,

Encourages us to follow a dream
No matter how far fetched it may sent
Her gifts can never compare to any other
I am so honoured to call her my mother

Looking back on another year
I was so lucy to have a mother so dear.
So Mom, on your special day, relax and enjoy
And always know that I couldn't
have asked for any other
more incrediable person to call my mother
A Mother is one who understands
The things you say and to
Who always overlooks your faults and
Sees the best in you

A Mother is one whose special love inspires
You day by da
Who fills your heart with gladness in her warm and thoughtful way

A Mother is all theses things and more
The greatest Treasure known
And the dearest Mother in
All the world is the one I
Call my own…..
**M”** is for the million things she gave me,
**O”** means only that she's growings old,
**T”** is for the tears she shed to save me,
**H”** is for her heart of purest gold,
**E”** is for eyes, with love-light shining,
**R”** means rights, and right she'll always be,

Put them all together, they spell
“MOTHER”
A word that means the world to me.

**" MOTHER"……**

A mother loves right from the start no matter
if her children are near or far apart

A mother give never-ending love
She gives us comfort and peace
life a beautiful dove.

for us she will always do her best,
even when we put her patience to the test,
she wipes our tears
chases away our fears,

Encourages us to follow a dream
No matter how far fetched it may sent
Her gifts can never compare to any other
I am so honoured to call her my mother

Looking back on another year
I was so lucy to have a mother so dear.
So Mom, on your special day, relax and enjoy
And always know that I couldn't
have asked for any other
more incrediable person to call my mother

A Mother is one who understands
The things you say and to
Who always overlooks your faults and
Sees the best in you

A Mother is one whose special love inspires
You day by da

Who fills your heart with gladness in her
warm and thoughtful way

A Mother is all theses things and more
The greatest Treasure known
And the dearest Mother in
All the world is the one I
Call my own…..

**M"** is for the million things she gave me,
**O"** means only that she's growings old,
**T"** is for the tears she shed to save me,
**H"** is for her heart of purest gold,
**E"** is for eyes, with love-light shining,
**R"** means rights, and right she'll always be,

Put them all together, they spell "MOTHER"
A word that means the world to me.

Many people will come and pass from your life but family will always stay at your side no matter what situation you have to face the family will always support you especially in your bad times. But when we talk about one specific person in your family who supports you unconditionally. That one person is always you mother like everyone's mother. My mother is the one who supports and encourages me to achieve the goals of my life. She taught me to always have faith in myself and in my work. Because it's the faith of a person by which he or she can achieve.

Physically impossible goals in their life. The mother works hard day and night to ensure that we get a quality education. She also take care of all the members of our family. The mother is a real leader for me, as she is always there to protect me and she always helps to make a difference between good and bad deeds. The Mother sacrificed everything for me and my family she just wants to keep everyone happy in my family. She always prays for the good health of our family. For me my mother is everything I can't define for me my mother is everything I can't define my love for my mother.

She always loves me infinitely as she is the best mom in the world.

The mother is sweet, loving and kind. My mother wakes up every day and tells the maid what we want for breakfast, lunch and dinner. Then she reminds us to jon the online platform for school. In hindi period she helps me survive during the time she gives me the pancake and gives my sister bread poha, after school we sit on the dinning table and eat our lunch my other keep us company when me and my sister eat our food by 1:00 my mother had a meeting. Me and my sister played games and had fun after finishing our studies.

After my mother's meeting she asked me English literature and at the end I did so well she gave me hugges and Kisses I was hungry my mother told the maid to make me chicken nuggets. We soon finished English but then the mom said. I had to revise English. I finished and instead of asking me my mother said to make my life easier. She took out hindi picture composition worksheets, she said to do them tomorrow. We watched videos on the Kargil war and had many discussions but soon I got hungry and asked for dinner. Then I at my dinner and me my dinner and me my mother and my.

# अहवाल विभाग

## प्रशासकीय अहवाल

श्री संतोष मुनोत
कार्यालयीन अधिक्षक

श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत-नेवासकर सार्वजनिक, ट्रस्टचे के जी. कला व वाणिज्य महाविद्यालयाचा " प्रशासन विभाग हा सर्व घटकांना विशेषतः विद्यार्थी, विद्यार्थिनींना गुणवत्तापूर्ण तत्पर सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे. या विभागात साधारणतः सामान्य प्रशासन, ग्रंथालय इ.चा समावेश होतो, विद्यार्थी - विद्यार्थिनींच्या प्रवेशापासून ते पदवी प्राप्त होईपर्यतच्या प्रवासात प्रशासन विभागाची महत्वपूर्ण भूमिका असते. विद्यार्थी-विद्यार्थिनी, पालक यांच्या समस्या समजून घेऊन त्यांचे समाधान, पूर्ण निराकारण करण्याचा प्रयत्न हा विभाग नेहमीच करतो. महाविद्यालयाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून अहमदनगर शहरातील प्रतिष्ठित अशा महिलांना त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल कै. सौ. इचरजबाई हस्तीमलजी मुनोत उद्योजकता विकास पुरस्कार-२०२६ प्रदान केला. समाजाच्या विकासात् महत्वपूर्ण योगदान देणा-या महिलांच्या गौरवासाठी समर्पित असणारा हा पुरस्कार सन्माननीय सन्माननीय श्रीमती मीनाताई मुनोत, सन्मा.डॉ.मार्सिया वॉरन, सन्मा.उषाताई देशमुख व सन्मा.सौ रुपाली मुनोत यांना देण्यात झाला. यात प्रशासकीय विभागाने सर्वांच्या सहकार्याने उत्कृष्ट काम केले, महाविद्यालयात पुढीलप्रमाणे अभ्यासक्रमांचे अध्यापन केले जाते.

1. बीए- सर्व आवश्यक व वैकल्पिक विषय.
2. बी.कॉम - सर्व आवश्यक वैकल्पिक विषय.
3. बी.कॉम (सीए) - सर्व आवश्यक व वैद्यकिय विषय.
4. बी.कॉम (बी.एम.) - सर्व आवश्यक व वैकल्पिक विषय.-

## मराठी विभाग अहवाल

**डॉ.वर्षा कीर्तने**
(मराठी विभाग प्रमुख)

महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून मराठी विषय प्रथम वर्ष कला शाखेस शिकविण्यास सुरुवात झाली. तसेच शै. वर्ष २०१५-१६ पासून मराठी विषय प्रथम वर्ष वाणिज्य शाखेस व विशेषस्तरावर शिकविण्यास सुरुवात झाली. मराठी विभाग वर्षभर विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करतो, विद्यार्थी सर्व कार्यक्रमात वर्षभर उत्स्फूर्तपणे भाग घेतात. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्ताने 'माध्यम जागृती उपक्रमाचे आयोजन केले होते. या अंतर्गत सहभागी विद्यार्थ्यांनी 90.4 FM नगर रेडिओ स्टेशनला भेट दिली. या कार्यक्रमांतर्गत विविध क्षेत्रातील मान्यवरांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यात जेष्ठ पत्रकार श्री-भूषण देशमुख, शिल्पा रसाळ, श्री मकरंद घोडके, डॉ. स्वाती मुनोत अशा विविध मान्यवरांनी मिडिया क्षेत्राची माहिती दिली. मराठी विभागाने कुसुमाग्रज जयंती व 'मराठी भाषा गौरव दिन' निमित्ताने 'माझी स्वाक्षरी, माझा अभिमान ही मराठी स्वाक्षरी स्पर्धा आयोजित केली होती या आगळ्या वेगळ्या उपक्रमात विद्यार्थ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत विद्यार्थ्यांनी विविध महाविद्यालयीन स्पर्धांमध्ये सहभाग नोंदविला तसेच 'अविष्कार स्पर्धेत सहभाग घेतला. सर्व उत्तीर्ण व सहभागी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. स्वाती मुनोत व विश्वस्त संचालक श्री. किशोर मुनोत यांनी अभिनंदन केले. व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मराठी विभागातील प्राध्यापक विविध चर्चासत्रांमध्ये सहभाग नोंदवितात व शोध निबंध सादर करतात. मराठी विभागप्रमुख डॉ. वर्षा कीर्तने यांनी दादा पाटील महाविद्यालय, कर्जत आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत 'आधुनिक जीवनशैली आणि लोकसंस्कृतीवरील परिणाम' या विषयावर शोध निबंध प्रकाशित झाला. श्री सद्गुरु गंगागिरी महाराज सायन्स, गौतम आर्टस् ॲण्ड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव येथे एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभाग नोंदवला व 'महाराष्ट्रातील संत साहित्य आणि कृत्रिम बुध्दिमत्ता नव्या दृष्टीकोनांचा आढावा या विषयावरील शोध निबंध प्रकाशित झाला. आर्टस् ऑफ कॉमर्स कॉलेज, बेलापूर एक दिवसीय आंतरराष्ट्रीय सेमिनार मध्ये 'महिला सक्षमीकरणात संत कवयित्रींचे योगदान याविषयावरील शोध निबंध प्रकाशित झाला

आहे. तसेच पेमराज सारडा महाविद्यालय आयोजित लोककला व लोकसंस्कृती तसेच आदिवासी यात 'कीर्तनः एक कला' याविषयावर शोध निबंध वाचन केले. तसेच त्रिमुर्ती कला व वाणिज्य महाविद्यालय नेवासा फाटा,अशोकनगर व आदिनाथनगर येथे बहि:शाल व्याख्यान दिले. याबद्दल डॉ. स्वाती मुनोत, संस्थेचे विश्वस्त संचालक मान.श्री. किशोरजी मुनोत यांनी अभिनंदन केले. विद्यार्थ्यांना विभागातील सर्व प्राध्यापकांचे वेळोवळी मार्गदर्शन लाभते. महाविद्यालय स्तरावर अविष्कार स्पर्धेचे आयोजन केले होते. यात विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला तसेच न्यू आर्टस कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालय, अहिल्यानगर येथे झोनल लेव्हलच्या अविष्कार स्पर्धेत विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या विभागाला परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत, संस्थेचे विश्वस्त संचालक श्री. किशोरजी मुनोत् यांचे वेळोवेळी बहुमोल असे मार्गदर्शन लाभते. तसेच त्यामुळे मराठी विभागाला कला शाखेतील सर्व कार्यक्रम यशस्वीपणे पार पडतात. तसेच महाविद्यालयातील सर्व सहकारी प्राध्यापकांचे वेळोवेळी सहकार्य मिळते.

- **महिलांना द्या समान अधिकार, विकास होईल झपाट्याने साकार!**
- **नारी आहे प्रेरणा, विकासाची चेतना!**
- **महिलांचे शिक्षण, राष्ट्राचे भूषण!**
- **महिला सक्षमीकरण, विकासाचा नवा निर्धार!**
- **स्त्रीचा सन्मान, प्रत्येकाचा अभिमान!**
- **नारीला द्या संधी, यशाची उघडा दारे!**
- **महिलांचा आत्मविश्वास, समाजाचा विकास!**
- **नारीचा सन्मान, देशाचा स्वाभिमान!**

## वाणिज्य विभाग

प्रा.डॉ. प्रशांत खोपटीकर
अध्यक्ष वाणिज्य विभाग

के. जी. कला व वाणिज्य रात्र महाविदयालयात सन 2015-16 पासून हा विभाग कार्यरत आहे या विभागामार्फत बी कॉम, प्रथम, द्वितीय आणि तृतीय विदयार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. महाविदयालयात गुरूपौर्णिमा, शिक्षकदिन साजरा करण्यात आला यावेळी कॉलेजचे प्राचार्या डॉ.स्वाती मुनोत तसेच कॉलेजचे विश्वस्त श्री किशोरजी मुनोत सर यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विदयार्थ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले यात विदयार्थ्यांचा सहभाग मोठा होता वाणिज्य विभागअकौंटसी व्यावसायिक व्वस्थापन, मार्केटींग, बँकीग इकॉमर्स इत्यादी विविध विषय शिकवले जातात. तसेच या विभागामार्फत विदयार्थ्यांना नौकरी मिळून देण्यासाठी प्रयत्न केले जातात. कॉलेजच्या प्राचार्या डॉ स्वाती मुनोत आणि विश्वस्त शोरजी मुनोतसर यांचे बहुमोल सहकार्य व मार्गदर्शन मिळते.

## शिक्षित महिला, समृद्ध कुटुंब!

- महिलांच्या प्रगतीतच देशाची भरभराट!
- नारीला द्या बळ, देश होईल सबळ!
- महिला सक्षम तर भविष्य सक्षम!
- प्रत्येक मुलगी शिकली, भारताची वाट उजळली!
- नारीशक्तीचा गौरव, प्रगतीचा उत्सव!
- महिलांचा विकास, राष्ट्राचा विकास!
- नारीच्या पंखांना द्या उंच भरारी!
- स्त्री आहे शक्ती, तिच्यातच प्रगती!
- महिलांना द्या सन्मान, वाढेल देशाचा मान!

## ग्रंथालय अहवाल

**रासकर हर्षाली गिरीष**
(ग्रंथपाल)

अहमदनगर येथील के. जी कला व वाणिज्य महाविद्यालयातील ग्रंथालयाची स्थापना महाविद्यालय स्थापनेपासून 2007 पासून झाली आहे, सदर ग्रंथालयात शैक्षणिक पाठ्यपुस्तके, क्रमिक पुस्तके तसेच विविध प्रबंध, शोध निबंध विपूल साहित्यामध्ये विविध कथा, कादब-या, विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. तसेच स्पर्धा परीक्षांची वेगवेगळ्या विषयाची पुस्तके तसेच अनेक विषयाची संदर्भ पुस्तके उपलब्ध आहेत व विद्यार्थी त्या पुस्तकांचा वापर करतात तसेच दैनंदिन वाचनाकरिता विविध भाषिक अर्थात मराठी, इंग्रजी वृत्तपत्रे ग्रंथालयात विविध शैक्षणिक क्रमिक पुस्तके नियतकालिके महाविद्यालयातील प्रोजेक्ट, अवांतर वाचनीय पुस्तके अशी ग्रंथ संपदा उपलब्ध असून शैक्षणिक वर्ष 2018-19 पासून ग्रंथालयात वृद्धी सॉफ्टवेअर हे संगणकीय सॉफ्टवेअर घेतले असून त्याद्वारे सर्व पुस्तकांची नोंदणी व वाटप हे संगणकीय सॉफ्टवेअर द्वारे केले जाते तसेच या वर्षी सरकारने महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी"वाचन संकल्प महाराष्ट्र या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी सामूहिक पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा आणि ग्रंथ प्रदर्शनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. तसेच जागतिक पुस्तक दिन 23 एप्रिल कार्यक्रमांतर्गत ग्रंथ प्रदर्शन कार्यक्रमही आयोजित केला होता. तसेच राष्ट्रीय ग्रंथपाल दिन 12 ऑगस्ट हा पदमश्री डॉ. एस आर रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी साजरा केला जातो. ग्रंथ संपदेमध्ये जास्तीत जास्त पुस्तके आलेले असून संगणकीय सुविधमुळे,ते अधिक सुसज्ज झालेले' आहे. ग्रंथालयात विद्यार्थी, शिक्षक सर्वांसाठी वाचनाची उत्तम सोय असून अधिकाधिक विद्यार्थी याचा लाभ घेत आहेत. शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी ग्रंथालयास भेट दिली असून महाविद्यालयात प्राचार्य डॉ. स्वाती मुनोत यांच्या मार्गदर्शनात ग्रंथालय अधिकाधिक प्रगती साधत आहे

# के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय

## विद्यार्थी विकास मंडळ

प्रा. डॉ. वर्षा सी. कीर्तने
विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये संस्थेचे विश्वस्त संचालक मा श्री किशोरजी मुनोत व परिसर संचालिका डॉ. स्वाती मुनोत यांच्या मार्गदर्शना अंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ आणि के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

दि. ७ व ८ ऑक्टोबर २०२५ रोजी निर्भय कन्या अभियान या दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते या कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे विश्वस्त संचालक किशोरजी मुनोत यांनी केले. पहिल्या सत्रात सौ रश्मी दसरे यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करून स्वावलंबी कसे व्हावे या विषयावर प्रेरणादायी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रात प्रा.डॉ. स्वाती म्हणून यांनी 'तुमचे व्यक्तिमत्व स्व विकासाची शक्ती' या विषयावर दृकश्राव्य माध्यमांच्या साह्याने विद्यार्थिनींना व्यक्तिमत्व विकासाच्या विविध पैलूंचे सखोल मार्गदर्शन केले. तर दुसऱ्या दिवशी तायक्कांदो प्रशिक्षक अल्ताफ अन्वर खान यांनी विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण दिले.

व्यवसाय समुपदेशन अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते सी.ए सौ धनश्री कुलकर्णी तसेच प्रा सागर कोहक यांनी विद्यार्थ्यांना व्यवसायपर मार्गदर्शक केले. प्रा डॉ. स्वाती मुनोत यांनी आपल्या मनोगत व्यवसायातील संधी विषयी मार्गदर्शन केले.

स्वच्छ भारत अभियान तसेच दुर्गोत्सव अंतर्गत महाराष्ट्रातील विविध ऐतिहासिक किल्ल्यांना मानवंदना देण्याचा उपक्रम राबविण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा व वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी अभिमान, संशोधन वृत्ती व प्रभावी अभिव्यक्ती कौशल्य विकसित झाले.
तसेच पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती आणि एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव निमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय विचारसरणी, सामाजिक मूल्ये आणि राष्ट्रनिर्माणातील नागरिकांची भूमिका याविषयी सखोल माहिती मिळाली.

कारगिल विजय दिन निमित्त देशभक्तीपर गायन स्पर्धा आयोजित करून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा आणि सैनिकांप्रती आदरभाव जागृत करण्यात आला. याशिवाय जागतिक एड्स दिन निमित्त घोषवाक्य स्पर्धेचे आयोजन करून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता, सामाजिक उत्तरदायित्व आणि जनजागृतीची भावना विकसित करण्यात आली.

हे सर्व उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच सामाजिक विकासासाठी हे उपक्रम अत्यंत उपयुक्त व परिणामकारक ठरले.

विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत राबवल्या गेलेल्या सर्व कार्यक्रमांना संस्थेचे विश्वस्त संचालक मा. श्री किशोर जी मनोत परिसर संचालक डॉ. स्वाती मुनोत यांनी मार्गदर्शन केले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले. सर्व कार्यक्रमांना विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालवी

# के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय

## नगर सह्याद्री

### सावित्रीबाई फुले यांची जयंती केजी महाविद्यालयात साजरी



अहिल्यानगर । नगर सह्याद्री

येथील के. जी. महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्वाती मुनोत यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले त्यांच्या शिक्षणातील तसेच यांचे सामाजिक कार्यातील योगदान विशद केले. प्रा. स्नेहल बोरावके यांनी सावित्रीबाई फुले यांच्याविषयी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आरती खेडकर यांनी केले. सौ. हर्षाली रासकर यांनी आभार मानले. या प्रसंगी महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक संतोष मुनोत, प्रा. डॉ. वर्षा कीर्तने, मनोज म्हंकाळे, सविता केदारी यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## समाचार



### के.जी. महाविद्यालय येथे 'वंदे मातरम्' गायन संपन्न

समाचार/नगर-दि.८

के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने ७ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४.०० वाजता सामूहिक वंदे मातरम् गायन कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास प्राचार्य, प्राध्यापकवर्ग तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची भूमिका विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. सविता चव्हाण यांनी स्पष्ट केली. महाविद्यालयांचे कार्यालय अधीक्षक श्री. संतोष मुनोत यांनी विद्यार्थ्यांना वंदे मातरम या राष्ट्रगीताच्या वर्धापन दिनानिमित्त मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. वर्षा कीर्तने यांनी विद्यार्थ्यांना वंदे मातरम या राष्ट्रगीताचा मतितार्थ समजावून सांगितला. त्यानंतर सर्वांनी राष्ट्रभावनेने एकत्रितपणे वंदे मातरम चे गायन केले. विद्यार्थ्यांनी देशभक्तीची भावना व्यक्त करत एकतेचा संदेश दिला. आभार प्रा. स्नेहल बोरावके यांनी मानले. या कार्यक्रमास प्रा. डॉ. प्रशांत खोपटीकर, प्रा. आरती खेडकर, सौ. हर्षाली रासकर व विद्यार्थी उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.

08 Nov 2025 - Page 7

## नगर सह्याद्री

### केजी महाविद्यालयात अंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा



अहिल्यानगर । नगर सह्याद्री

आंतरराष्ट्रीय योगा दिनानिमित्त के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात योगाचे आयोजन करण्यात आले होते. यास विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. प्रा. अनिरुद्ध भागवत यांनी विद्यार्थ्यांना योगाचे धडे दिले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक संतोष मुनोत हेही उपस्थित होते. प्रा. भागवत यांनी योगाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. योग आयुष्यात किती महत्त्वाचा आहे आणि त्याचे फायदे काय आहेत यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सुखी जीवनाचा राजमार्ग म्हणजे योग असे त्यांनी विद्यार्थ्यांना आपल्या मार्गदर्शनातून सांगितले. प्रा. भागवत यांनी योगाचे प्रात्यक्षिकही विद्यार्थ्यांना करून दाखविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. वर्षा कीर्तने यांनी केले. प्रा. आरती खेडकर यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रा. स्नेहल बोरावके, सौ. हर्षाली रासकर व विद्यार्थी उपस्थित होते.

## नगर सह्याद्री

### 'केजी कला, वाणिज्य' तर्फे नवीन शैक्षणिक धोरणाबाबत मार्गदर्शन



अहिल्यानगर । नगर सह्याद्री

येथील के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात स्कूल कनेक्ट २.० संपर्क अभियान अंतर्गत पंडित नेहरू हिंदी विद्यालयातील नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे विश्वस्त संचालक किशोर मुनोत यांनी विद्यार्थ्यांना वस्तूंच्या उगमापासून त्या विक्रीस जाईपर्यंत त्यांना कोणत्या प्रक्रियेतून जावे लागते व त्या प्रक्रियांदरम्यान असणाऱ्या व्यावसायिक संधींविषयी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने उच्च शैक्षणिक क्षेत्रात होणाऱ्या नवीन विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत व्यावसायिक संधींविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी पंडित नेहरू हिंदी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. धीवर, कविता शर्मा, श्रीमती भोसले, श्री. परदेशी आदी उपस्थित होते. महाविद्यालयातील प्रा. डॉ. वर्षा कीर्तने, प्रा. स्नेहल बोरावके, प्रा. सविता चव्हाण, सौ. अमृता मुळे, सौ. हर्षाली रासकर व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## नगर सह्याद्री

### स्पर्धेच्या युगात संवाद नेतृत्व व स्किल महत्त्वाचे : मुनोत

#### डॉ. स्वाती मुनोत यांच्या 'अनलॉकिंग सक्सेस द कम्प्लीट मॅन्युअल फॉर सॉफ्ट'चे प्रकाशन

अहिल्यानगर । नगर सह्याद्री



आजच्या स्पर्धात्मक युगात फक्त शैक्षणिक गुणवत्तेवर यश ठरत नाही तर संवाद नेतृत्व आणि सहकार्य यासारख्या सॉफ्ट स्किल्स महत्त्वाच्या ठरतात. डॉ. स्वाती मुनोत यांचे पुस्तक नव्या पिढीला त्यासाठी योग्य दिशादर्शक ठरेल अशी अपेक्षा सहकार व सामाजिक क्षेत्रांतील ज्येष्ठ मार्गदर्शक हस्तीमलजी मुनोत यांनी व्यक्त केली.

हस्तीमलजी मुनोत यांच्या हस्ते प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी लिहिलेल्या अनलॉकिंग सक्सेस द कम्प्लीट मॅन्युअल फॉर सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महाविद्यालयाच्या आयक्यूएसी समितीतील ॲड. पत्लोड, नगर मर्चंट्स बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पुराणिक, महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक संतोष मुनोत, प्रा. डॉ. वर्षा कीर्तने, प्रा. स्नेहल बोरावके, प्रा. आरती खेडकर, प्रा. सविता चव्हाण, सौ. हर्षाली रासकर आदी उपस्थित होते.

हे पुस्तक संवाद कौशल्य, टीमवर्क, वेळेचे व्यवस्थापन, नेतृत्व, भावनिक बुद्धिमत्ता, संवाद माध्यमांचा प्रभावी वापर आणि करिअरमध्ये यश मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या अनेक मुद्रित कौशल्यांचा सखोल उ... प्रशिक्षण क्षेत्रांत तीन दशके अनुभव असलेल्या प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांचे मार्गदर्शन या पुस्तकाद्वारे विद्यार्थ्यांपासून ते कर्मचारी शिक्षक प्रशिक्षक आणि उद्योजक यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

शैक्षणिक ,व्यावसायिक आणि सामाजिक क्षेत्रांतील गरजांनुसार मांडलेली समर्पक प्रकरणे, विद्यार्थ्यांपासून ते प्रशिक्षणार्थी कर्मचारी, शिक्षक आणि उद्योजक ...ाठी उपयक्त व भारतातील राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या पार्श्वभूमीवर योग्य ठरणारी मार्गदर्शक सामग्री व उदाहरणासहित सोपी प्रवाही आणि व्यावहारिक शैली हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहेत.

संस्थेचे विश्वस्त किशोर मुनोत यांनी, हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या आणि व्यावसायिकांच्या गरजा समजून घेऊन अत्यंत शास्त्रशुद्ध आणि अनुभव सिद्ध दृष्टिकोन ठेवून प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी लिखाण केल्याचे दिसते. त्यामुळे हे पुस्तक केवळ एक वाचनीय साहित्य न राहता एक प्रेरणादायी आणि मार्गदर्शक साधन बनेल असा विश्वास व्यक्त केला. या पुस्तक प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने मृदू कौशल्यांचे महत्त्व अधोरेखित झाले असून नव्या युगातील यशाचा मार्ग या पुस्तकामुळे अधिक सुलभ होणार आहे. असा विश्वास अनेकांनी व्यक्त केला.

## दैनिक आकर्षण

### के.जी. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या वतीने महिला गौरव पुरस्काराचे वितरण सोहळा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

### के. जी. कला व वाणिज्य महाविद्यालयात निर्भय कन्या अभियान कार्यशाळा उत्साहात



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

## नगर सह्याद्री

### केजी कॉलेज येथील कार्यशाळेत 'व्यवसायांतील संधी'वर मार्गदर्शन



अहिल्यानगर । नगर सह्याद्री

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व केजी कॉलेज मधील विद्यार्थी कल्याण विभागांतर्गत महाविद्यालयात व्यवसाय समुपदेशन अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी धनश्री कुलकर्णी (सीएस) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सागर कोहक यांनी ही विद्यार्थ्यांना व्यवसाय पर मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्वाती मुनोत यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात व्यवसायांतील संधींविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. वर्षा कीर्तने, प्रा. स्नेहल बोरावके, कार्यालय अधीक्षक संतोष मुनोत, डॉ. राहुल पोरवाल हेही उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. आरती खेडकर यांनी केले. सौ. हर्षाली रासकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

26 Dec 2025 - Page 2

## नवा मराठा



के. जी.कला व वाणिज्य महाविद्यालयात कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला.

### के. जी. महाविद्यालयात कारगिल विजय दिन साजरा

नगर - के. जी.कला व वाणिज्य महाविद्यालयात कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला.

या प्रसंगी महाविद्यालयाच्या परिसर संचालिका प्रा. डॉ. स्वाती मुनोत यांनी कारगिलच्या युद्धात आपले सैनिक हजारो फूट उंच पर्वतरांगांवर ऑक्सिजनच्या कमतरतेमध्ये शत्रूच्या गोळ्यांचा सामना करत देशाच्या रक्षणासाठी लढले. या सैनिकांचे ऋण आपण कधीही फेडू शकत नाही. असे विचार व्यक्त करून त्यांनी त्यांच्या शौर्याचा, त्यागाचा आणि पराक्रमाचा गौरव केला. कारगिल युद्धात शहीद झालेल्या सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना वृद्धिंगत व्हावी यासाठी कारगिल विजय दिनाच्या निमित्ताने वक्तृत्व स्पर्धा व देशभक्तीपर गायन स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाची भूमिका प्रा. सविता चव्हाण यांनी स्पष्ट केली. याप्रसंगी प्रा. डॉ. वर्षा कीर्तने, प्रा. स्नेहल बोरावके, प्रा. आरती खेडकर, सौ. हर्षाली रासकर व विद्यार्थी हजर होते.

# के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय

## Achievement 2025-26

| Sr. No. | Name | Title | Details |
|---|---|---|---|
| 01 | Dr. Swati Munot (Campus Director) | Waste to Resource : Lessons from Amager Resource Centre (Denmark) for India | International Refereed Research Journal |
| 02 | Dr. Swati Munot (Campus Director) | EnvironmentaHazards and Disaster Management | Peer Reviewed International Refereed Research Journal |
| 03 | Dr. Swati Munot (Campus Director) | **Reviewing** Green Growth and Sustainable Finace : A narrative Review of Economic Evidence and Policy Pathways | South Asian Journal of Social Studies and Economic |
| 04 | Dr. Swati Munot (Campus Director) | **Reviewing** Land Use Change and Biodiversity Loss : Investigating the Effects on Ecosystem Services | South Asian Journal of Social Studies and Economic |
| 05 | Dr. Varsha S. Kirtane | महाराष्ट्रातील संत साहित्य आणि कृत्रिम बुध्दिमत्ता-नव्या दृष्टीकोनांचा आढावा | SSGMS,GASC College Kopargaon |
| 06 | Dr. Varsha S. Kirtane | आधुनिक जीवनशैली आणि लोकसंस्कृती वरील परिणाम | Aadhat Multidisciplinary International Education Research Journal Vol. XV (Number I,pp.214 218) |
| 07 | Dr. Varsha S. Kirtane | Mahila Sakshmikarnat sant kavyirtinche yogadan | Peer Reviewed InternationalReferred Research Journal |
| 08 | Dr. Prashant Khoptikar | Tribal Women Empowerment through entrepreneurship | International Journal of Advance and applied research |
| 09 | Dr. Prashant Khoptikar | Empowerment and gender equality among tribal women | Young researcher Referred Research Journal |
| 10 | Prof. Snehal Boravake | Bridging The Digital Gap: Issues And Challenges In Implementing Computer Applications Undar NEP 2020 | International Journal of Advance and Innovative Research |

# के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय















# के.जी.कला व वाणिज्य (रात्र) महाविद्यालय


श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित

## केजी कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स

महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मान्यता प्राप्त महाविद्यालय

पंडित नेहरू हिंदी विद्यालय परिसर एलआयसी जवळ किल्ल्यासमोर अहिल्यानगर महाराष्ट्र

आय एस ओ १४००१- २००१५ व नॅक मान्यताप्राप्त. संपर्क. ०२४१ -२३२६९६०

E-mail : Kg.college@yahoo.com I www : kgcolleg.in

**शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश सुरू**

**पदवी अभ्यासक्रम**

| | |
|---|---|
| • बीए • | • बीकॉम • (प्रमुख विषय - बँकिंग अँड फायनान्स, कॉस्ट अँड वर्क अकाउंटिंग, मार्केटिंग, बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन) |
| • बीकॉम • कंप्यूटर एप्लीकेशन (पूर्वीचे बीसीए अभ्यासक्रम) | • बीबीए • बिझनेस मॅनेजमेंट (पूर्वीचे बीबीए) |

२०२४-२०२५ मध्ये नवीन शैक्षणिक धोरणानुसार यशस्वी अभ्यासक्रमाची निर्मिती अंतर्गत विद्यापीठीय अभ्यासक्रमाबरोबरच जीवनात यशस्वी करणारे अभ्यासक्रम.

- पत्रकारिता
- उद्योजकता विकास • टॅली
- ऑफिस ॲडमिनिस्ट्रेशन आणि ऑफिस ऑटोमेशन.
- ट्रॅव्हल अँड टुरिझम अभ्यासक्रम
- आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजनेअंतर्गत शहरातील विद्यार्थ्यांना फ्रंट लाईन कम्युनिकेशन व रिसेप्शनिस्ट अभ्यासक्रम.
- सॉफ्ट स्किल • पायथॉन
- शहरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत संगणक ज्ञानावर आधारित अभ्यासक्रम.

**महाविद्यालयाची वैशिष्ट्ये**

- महात्मा गांधी राष्ट्रीय परिषद ग्रामीण व उच्च शिक्षण भारत शिक्षण मंत्रालयाचे राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त महाविद्यालय • अद्ययावत संगणक लॅब • डिजिटल क्लासरूम व हॉल
- उद्योजकांची प्रत्यक्ष संवाद. • विद्यार्थी कल्याण उपक्रम • सुसज्ज ग्रंथालय • निसर्गरम्य परिसर

P2

संपर्क 9850136654, 9834756141

# के.जी. महाविद्यालयातील विविध उपक्रम























# के.जी. महाविद्यालयातील विविध उपक्रम









